REGISTERED N. No. 4

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................०२
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस....... ०१ ०६
दुसरे खेपेस.... ....०१

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ..................... 2 a
Advertisement
below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......3 a
Repetition Per line ... 2 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 3 AUGUST 1903 NO 30

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ३ माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३०

## शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

( रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळे बी. ए. यांनीं लिहिलेला निबंध. )

नंबर २

ह्या भागांतील १६ नाटकें कोणत्या क्रमानें लिहिलीं हें खात्रीनें सांगतां येत नाहीं. त्याचा विषयवारी क्रम लाविलेला वर दिला आहेच. त्यापैकीं शृंगारिक नाटकांमध्यें प्रणय जितका प्रस्फूट आहे तितका पुढील कोणत्याही प्रकरणात नाहीं. शुद्ध प्रणयाचें उज्वल स्वरूप दाखवून त्याचे दुष्ट परिणाम भिन्न भिन्न तऱ्हेनें कसे होतात हें दाखविलें आहे. ह्या प्रकरणांतील प्रणय केवळ अंध असून क्रीडालोलुप नाहीं. ह्या पुढील प्रकरणांत प्रणयवर्णन आहे परंतु यांतील प्रणय केवळ अंगभूत आहे सारभूत नाहीं. प्रणया संबंधानें love's labours Lost ह्या नाटकांत कवि ह्मणतो.

Never durst a poet touch a pen to write
Until his ink were tempered with love—sighs.

स्वतः शेक्सपीअरची अशीच स्थिती तरुणपणीं झाली असेल आणि त्याचवेळीं तो हीं नाटकें लिहीत असेल असें अनुमान करावयास हरकत नाहीं. शेक्सपीअरचें Romeo and Juliet.

ह्या शोकपर्यवसायी नाटकास Love's Song "प्रणयगीत" असें बहुतेक टीकाकार ह्मणतात हीं प्रणय प्रकरणें झाल्यावर मग ऐतिहासिक प्रकरणें त्यानें लिहिलीं. प्रणय प्रकरणांतून—कल्पना सृष्टींतून—निघून कवि ऐतिहासिक प्रकरणाकडे—सत्य सृष्टीकडे—कसा वळला हें कळत नाहीं. हीं प्रकरणें फार चांगलीं वठलीं आहेत. व हीं फार महत्वाचीं आहेत. त्यावेळीं इतिहासाकडे लोकांचें बिलकूल लक्ष नव्हते. अशा वेळीं ऐतिहासिक नाटकें लिहून लोकांचें इतिहासाकडे लक्ष वळविलें व त्यांना राजकीय शिक्षण, स्वदेशाभिमान वगैरे शिकविण्याचें यानें श्रेय घेतलें. अद्यापर्यंत हीं ऐतिहासिक नाटकें इंग्रजांना जुन्या इतिहासाचें स्मरण देतात. व हेनरीज् आणि एडवर्डस् राजे कसे होते तें दाखवितात. मार्लबरो आणि चॅथम सारख्या राजकारण पटु लोकांनीं शेक्सपीअर हा आमचा पहिला इतिहास शिक्षक आहे असें बोलून दाखविलें आहे. ह्या वरून ह्या नाटकांचें महत्व लक्ष्यांत येईल. दुसऱ्या भागांतील तिसऱ्या काळांमध्यें ४ आनंद पर्यवसायी नाटकें येतात यांचीं नांवें मागे दिलीं आहेतच. ह्या चार प्रकरणांमध्यें पूर्वीच्या आनंदपर्यवसायी नाटकापेक्षां शेक्सपीअरची कल्पनाशक्ती चातुर्य व हास्यरस हीं जास्त चांगलीं नजरेस येतात. ह्या नाटकांमध्यें गांभीर्योत्पादक प्रवेश क्वचितच आले आहेत. या आनंदपर्यवसायी नाटकांची गुरुकिल्ली "आत्मप्रेम" ही आहे. ह्या आत्मप्रेमानें त्या त्या भूमिका आत्मवंचन किंवा परवंचन करितात, आणि त्यामुळें पात्र स्वभावाचें परीक्षण चांगलें करितां येतें. प्रत्येक नाटकामध्यें ह्या तत्वाला अनुलक्षून कांहीं एक सिद्धांत केला आहे व त्या त्या अनुसंधानानें त्या त्या प्रसंगाला शोभण्या सारखीं पात्रें आणून स्वभाव परिपाक केलेला आहे.

ह्याच कालांत शेक्सपीअरनें स्फूट पद्यें लिहिलीं आहेत. याबद्दल विचार पूर्वीं झालाच आहे.

आतां तिसऱ्या आणि महत्ताच्या काळाकडे वळूं. हा काळ ह्मणजे १६०१ पासून १६१२ पर्यंतचा. ह्या काळांत शेक्सपीअरनें १४ नाटकें लिहिलीं, त्यांत ९ शोक पर्यवसायी आहेत व ५ आनंद पर्यवसायी आहेत याची सर्वप्रसिद्ध दुःखपर्यवसायी नाटकें ह्या भागांत आहेत. यावेळीं कवीचें लक्ष मनुष्याच्या अंतःकरणांतील दुष्ट प्रवृत्तीकडे आणि तिच्या सद्वृत्तीच्या कलहाकडे लागलें होतें. ह्या काळांतील नाटकांचीं नांवें.

1 Measure for Measure समान शासन
2 Othello अथेल्लो; झुंझारराव (देवल)
3 Hamlet हंबीरराव ( बरवे ); विकारविलसित ( प्रोफेसर अगरकर ) लक्ष्मीकांत ( कानिटकर ).
4 Macbeth मानाजीराव [ परांजपे ]
5 King Lear. अतिपीड चरित
6 Cymbeline तारा नाटक
7 Troilaus and Cressida.
8 Julius Ceasar
9 Autony Cleopatra वीरमणी आणि शृंगार सुंदरी.
10 Coriolames.
11 Timon of Athens.
12 The Tempest कितने
13 The Winter's Tale मोहविलसित; विकल्पविमोचन
14 Henry VIII.

दुसऱ्या भागाच्या अंतीं आणि तिसऱ्या भागाच्या आरंभीं शेक्सपीअरची कल्पनाःशक्ति फारच उर्जित दशेंत होती. १५९८ पासून १६०३ पर्यंतच्या ५ वर्षांत दर साल २ नाटकें त्यानें लिहिलीं. व पुढें १६१२ पर्यंत यानें सरासरीनें दरसाल एक नाटक लिहिलें असें ह्या नाटकांच्या काळ निर्णयावरून समजतें.

ह्या काळांतील आणि याच्या मागील काळांतील नाटकांची जर तुलना केली तर असें दिसतें कीं या काळांत शोकपर्यवसायी किंवा निदान करुणरसप्रधान नाटकें पुष्कळच तयार झालीं. दुसऱ्या भागांतील १६ नाटकांपैकीं ऐतिहासिक वजा करितां—बाकीं दुःखपर्यवसायी नाटकें ४ च आहेत; परंतु तिसऱ्या काळांतील १४ पैकीं ९ तर अत्यंत महत्वाचीं असीं शोकपर्यवसायीं असून बाकीचीं ५ जरी आनंदपर्यवसायीं आहेत तरी करुणरसांनीं इतकीं ओथंबलीं आहेत कीं शेवटच्या प्रवेशांतील आनंदानें मागील दुःखाचा परिहार होत नाहीं; आणि वाचणाऱ्याच्या किंवा पाहणाऱ्याच्या मनावर शोकपर्यवसायी नाटकानें जसा परिणाम होंतो तसा ह्या नाटकांनीं होतो. ह्या नाटकांमध्यें हास्यरस उत्पन्न करण्या सारख्या शब्दांवरील कोट्या, उच्छृंखल भाषणें वगैरे प्रकार फारच क्वचित आढळतात. ह्यांतील विचार उदात्त व कल्पना गंभीर आहेत. प्रत्येक प्रकरणांत एका विविक्षित कल्पनेलाँ प्रधान पद दिलेलें आहे व तिच्या अंगभूत इतर रचना आहेत. बऱ्याच प्रकरणांचा विषय नैसर्गिक ह्मणजे संसारी बंधानांचें विमोचन, छळ, असत्य वंचना आणि उपकारी मित्र किंवा नातेवाईक ह्या बद्दलची कृतघ्नता हे किंवा अशा प्रकारचे आहेत. ह्याच कालामध्यें असे दुःखपूरित विचार कवीच्या मनांत कां आले, ह्यांचीं कारणें अनेकजणांनीं अनेक तऱ्हेनें सांगितलीं आहेत. त्या पैकीं मुख्य—त्याचा पुत्र Hamlet किंवा Hanr t ह्याचा १५९६ त झालेला मृत्यु हें होय. ह्याच मुलाच्या स्मारका करितां ह्यानें आपलें प्रसिद्ध Hamlet नाटक लिहिलें; ह्या शिवाय मित्रनाश आणि कांहीं राजकीय कारणेंही आहेत. दुसऱ्या काळांतील नाटकें हीं, प्रणय, मैत्री, स्वदेशाभिमान व या सारखेच तारुण्यांत उत्पन्न होणारे मनोविकार यांनीं भरलेलीं आहेत; व तिसऱ्या काळांतील नाटकें मनुष्याला पोक्तपणीं जे अनुभव मिळतात आणि आयुष्य क्रमःसंबंधानें व यांत येणाऱ्या अनेक संकटासंबंधानें जे मोठे मोठे प्रश्न त्याच्या मनांत येतात ते सोडविण्या बद्दलच्या कल्पनांनीं भरलेलीं आहेत.

अशा रीतीनें त्याच्या एकंदर नाट्य कलेचा साधरण विचार झाला. आतां त्याचा काळ आणि त्यांत त्यानें काय केलें तें पाहूं.

कोणत्याही देशांत नाट्यकलेचा आरंभ धर्मापासूनच व्हावयाचा. निरनिराळ्या धार्मिक सणांच्या आणि उत्सवांच्या वेळीं देवादिकांनीं केलेल्या कृत्यांची प्रतिकृति करून धार्मिक लोक आपलें मनोरंजन पुरातन कालापासून करीत आले आहेत. आमच्या इकडे दशावतारांचीं नाटकें पाहिलेले लोक अद्याप हयात आहेत. उत्तरेकडे लोकांतील रामलीलेचे खेळ अद्याप चालू आहेतच. त्या प्रमाणेंच इंग्लंडांत ईस्टर वगैरे सणाचे वेळीं येशू ख्रिस्ताचे चौकटीवर केलेले कांठी. मरन व नंतर झालेलें पुनरुत्थापन ह्याचे प्रयोग व जुन्या व नव्या करारांतील साधुसंतांच्या चरित्रांतील भागांचे प्रयोग होत असत. ह्यांस Mysteries ह्मणजे ईश्वरलीला असें ह्मणत. ह्या वेळचीं नाटकगृहें ह्मणजे ख्रिस्त मंदिरें व नाटककार ह्मणजे धर्मगुरु, पुढें हळूं हळूं साधु संताच्या उत्सवांच्या वेळीं हे किंवा अशाच प्रकारचे खेळ भररस्त्यांतही होऊं लागले, यांस Miracle Plays ह्मणजे "अद्भुत प्रकरणे" ह्मणत. ह्यांत सामान्य जन आणि किरकोळ कामधंदा करणारे शिल्पी हे नट असत. पुढें १५ व्या शतकामध्यें हीं नाटकें मागें पडलीं आणि Moralities नीति प्रकरणें. ह्या नांवाचीं रूपकें प्रचारात आलीं. ह्या रूपकामध्यें विषय धार्मिकच असत; परंतु मनुष्याचे उच्च नीच मनोविकार मृत्यु, सत्य, न्याय वगैरे देवतारूपानीं दाखविलीं जात होतीं ह्या रूपकाचा मुख्य विषय उच्चनीच मनोविकारांचा झगडा आणि यांचे मनुष्याच्या मनावर परिणाम, हा असे. हळूं हळूं ह्या खेळांतील धार्मिक तत्वें नाहींशीं होऊन जीवित सुखाकडे त्यांचा कल होऊं लागला. हीं नाटकें ह्मणजे संस्कृतांतील प्रबोध चंद्रोदया सारखीं असतील. हीं नाटकें मुख्यत्वें पाठशाळांतुन होत असत.

ह्या वर निर्दिष्ट केलेल्या दोन्ही प्रयोगामध्यें धार्मिक तत्व अंतर्भूत असल्यानें सामान्य जीविताचें चित्र त्यांत चांगलें रेखाटलें जात नसे. हें चित्र पूर्ण करण्याला हास्यरसाची मदत पाहिजे होती. ह्मणून हास्यरस प्रधान प्रयोग हळूं हळूं सुरू झाले. यांची सुरवात राजदरबारीं झाली. कारण, पवाडे ह्मणणारे, खुषमस्करे, भाट, गोष्टी सांगणारे वगैरे मंडळींचा भरणा राजदरबारींच असावयाचा. हीं प्रहसनें पुढें पुढें फारच लोकाळलीं यांस Comic Interludes ( हास्यरस प्रहसनें ) असें ह्मणत. आठव्या हेनरीच्या वेळीं, ह्या सर्व प्रकारांचा एकच गप्पा गोंधळ झाला होता, आणि लोकांमध्यें नाटकें पाहण्याची इच्छा फार प्रबल झाली होती. सर्व तऱ्हेचे लोक एका ठिकाणीं मिळून आपली करमणूक करून घेत.

तरी त्यावेळ पावेतों रंगभूमीला कांहीं विविक्षित स्वरूप आलें नव्हतें. नटक्रिया हा एक धंदा मानला जात नसे आणि त्या वेळीं नाट्यग्रंथ लेखनही सुरू झालें नव्हतें. सरदार मंडळीचे आश्रित राजदरबारीं खेळ करीत, व कधीं देशांतही खेळ करीत फिरत असत.

ह्याच सुमारास जुन्या भाषा आणि जुन्या कला ह्यांचें पुनरुज्जीवन झालें. त्यामुळें इंग्लंडांतील नाट्य कलेला चांगलीच मदत मिळाली. लॅटिन आणि ग्रीक भाषेंतील नाट्य ग्रंथ वाचण्याची लोकांस गोडी वाटूं लागली व त्यामुळें त्यांच्या आवडींत चांगली सुधारणा झाली. पुढें इलिझाबेथ राणी

दींवर आल्यावर ह्या केलेला फार साहन मिळालें. गादीवर बसल्या नंतर ० वर्षांनीं शेक्सपीअरचा अभ्युदय झा. परंतु दरम्यानच्या या ३० वर्षांत ० नवीन नाटकें लिहिलीं गेलीं व णीपुढें त्यांचे प्रयोग करण्यांत आले. या रून शेक्सपीअरचा उदय झाला ते वेळीं कांचीं मनें चांगलीं नाटकें ग्रहण करण्या- तयार झालेलीं होतीं.

( पुढें चालेल. )

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुद्ध १० शके १८२९

## राष्ट्रीय सभा.

( अध्यक्षांची निवड )

यंदाची राष्ट्रीय सभा मद्रासेस भरणार आहे. या सभेला जी औद्योगिक प्रदर्शनाची शाखा जोडण्यांत आली आहे तिच्या संबंधानें मद्रास इलाख्यांत मोठी चळवळ सुरूं आहे. या प्रदर्शनाच्या संस्थेला खुद्द मद्रास सरकारनें चांगला आश्रय देण्याचें मनावर घेतलें आहे. लार्ड आम्टहिल्ल गव्हरनर साहेब यांनीं आपल्या पदरून दोनशे रुपये वर्गणीही दिली आहे. राष्ट्रीय सभेच्या या उपांगभूत संस्थेला राजाश्रय मिळत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. अलिकडील राजकीय चळवळीची दिशा बरीच बदलली आहे. इतक्या वर्षांच्या अनुभवानें असें पक्कें दिसून आलें कीं सरकारांतून आपल्या देशाला कांहीं हक्क मिळतील अशी उमेद नाहीं आणि विलायतच्या लोकांस इंडियाची खरी स्थिती कळविण्यासाठीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी आदिकरून मंडळींनीं आपल्या समजुतीप्रमाणें मोहिम विलायतेसही नेली होती पण त्यापासून कांहीं म्हणण्या सारखा लाभ झाला नाहीं. आपल्या पायावर आपण उभें राहावें, आपल्या देशाची सांपत्तिक स्थिति व्यापारधंद्याच्या व यांत्रिक शक्तीच्या द्वारानीं सुधारावी आणि नंतर सरकारच आपली मागणी सुखानें कबूल करील. सध्यांच्या पंगुपणानें आम्ही सरकारी कृपेला अधिकाधिक पात्र होत चाललों आहे. कालगतीनें औद्योगिक प्रदर्शनादि संस्था राष्ट्रीय सभेचें मुख्य अंग बनली आहे आणि हीच संस्था भावी मार्गाच्या खाणाखुणा शोधीत जाईल.

मद्रासची यंदाची सभा फार टोलेजंग होईल असा रंग प्रस्तुतच्या तयारी वरून दिसतो. या समारंभासाठीं अध्यक्ष कोणाला निवडावें अशा विषयीं मोठा प्रश्न पडला आहे. आसामचे माजी कमिशनर सर काटन साहेब व तसेंच नामदार पाल साहेब या दोघांपैकीं एकजण अध्यक्ष होतील तर फार बरें होईल; पण चालूं पार्लमेंट मोडून दुसरें पार्लमेंट बनण्याचा रंग असल्यामुळें या उभय लोकमान्य गृहस्थांस इंडियाच्या विनंतीला मान देतां येत नाहीं. हे दोघेही पार्लमेंटांत सभासद होण्या विषयीं खटपट करणार आहेत तेव्हां त्यांस तिकडे विजयश्री मिळाली तरी देखील ती गोष्ट आम्हांस विशेष आनंदाची वाटणार आहे. आतां अध्यक्षाच्या महास्थानीं विराजमान होण्यासाठीं इंडियांतीलच कोणी लोकमान्य गृहस्थ निवडावा लागणार आहे. सध्यां कांहीं नांवेंही पुढें करण्यांत आलीं आहेत. कलकत्त्याचे बाबू कालीचरण बानर्जी, मुंबईचे नामदार गोपाळ कृष्ण गोखले, व नामदार पारख व वऱ्हाडचे राव बहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर इत्यादि गृहस्थांचीं नांवें अध्यक्षांच्या नेमणुकी संबंधानें पुढें करण्यांत आलीं आहेत. कित्येकांच्या मतानें "रिव्हू आफ रिव्ह्यूव" या मासिक पुस्तकाचे कर्ते मि० स्टीड यांस हा बहुमान द्यावा. यांचा लौकिक फार मोठा आहे पण त्यांची निवड होण्या इतका संबंध यांचा या देशाशीं अजून जडला नाहीं असाही एक आक्षेप आहे. कोणत्या व्यक्तीला हा बहुमान द्यावा असा प्रश्न असेल तर आम्ही म्हणतों कीं सध्यां पुढें आलेल्या नांवापैकीं प्रत्येकजण या महापदाला अगदीं सत्पात्र आहे. बाबू कलीचरण बानर्जी हे नम्र पतकरतील तर नामदार गोखले यांस नेमण्या विषयीं ज्ञानप्रकाशकर्ते मोठ्या आग्रहानें शिफारस करीत आहेत. ही सूचना सोळा आणे पसंत आहे. राजश्री गोखले यांची मनोहर भाषणसरणी, निर्दोष विचारपद्धति, समग्र माहितींतील त्यांनीं काढलेला मथितार्थ हीं फार वर्णनीय असतात. कै० न्यायमूर्ती रानडे यांचें हे पट्ट शिष्य आहेत आणि ते पुष्कळ अंशीं शिष्याच्या नात्यानें व आपल्या गुणांनीं अध्यक्षाच्या महास्थानाला उत्कृष्टपणें लायक आहेत, तथापि आम्ही या प्रश्नाचा निकाल प्रांताच्या दृष्टीनें निराळ्या प्रकारचा सुचवित आहों. अध्यक्षपणाचा बहुमान अजून या प्रांताला मिळावयाचा आहे. या प्रांतानें राष्ट्रसेवेंत पुष्कळ मोठमोठ्या इलाख्यांशी टक्कर मारली आहे. मागें विलायतेस मोहिम नेली होती तेव्हां या प्रांतांतील दोन नामांकित गृहस्थ म्हणजे राजश्री मुधोळकर व जोशी हे उभयतां गेले होते. वऱ्हाडानें एका साली राष्ट्रीय सभेच्या बैठकीचा उत्कृष्ट योग घडवून आणिला होता या व अशाच अनेक गोष्टी विचारांत घेण्यांत येतील तर आम्ही म्हणतो कीं, यंदाचा मान वऱ्हाडाला देण्यांत यावा. व्यक्तिपरत्वें तो कोणाला आमच्याइकडे द्यावा असाच प्रश्न निघेल तेव्हां प्रांतिक, लोकमतानें याचा निकाल सहजीं होण्यासारखा आहे.

## खर्चाची गदा.

( दक्षिण आफ्रिकेंत ठेवण्याच्या लष्करी ठाण्याचा खर्च )

दक्षिण आफ्रिकेंतलें बोअर युद्ध चालूं असतां इंग्लंडच्या सैन्याच्या व्यवस्थेंत व शिक्षणांत पुष्कळ चुका आहेत असें आढळून आलें. इंग्रजी साम्राज्याचें संरक्षण करण्याकरितां जें सैन्य ठेविलें आहे त्याचा पुष्कळसा भाग खुद्द इंग्लंड मध्यें ठेविला आहे. व ऑस्ट्रेलिया, केप कॉलोनी, कॅनडा इत्यादि वसाहतींत स्थानिक संरक्षणास जरूर इतकेंच थोडेंसें सैन्य ठेविलें असतें. या व्यवस्थेपासून अशी एक मोठी अडचण उत्पन्न होते कीं एखाद्या वसाहतींत युद्ध सुरूं झालें व तें तेथील स्थानिक सैन्याला झेंपेनासें झालें म्हणजे त्याच्या मदतीला लागेल तें सैन्य इंग्लंडांतून पाठवावें लागतें. आतां इंग्लंड हा देश वसाहतीं पासून फारच दूर व एका बाजूला पडल्यामुळें तेथून सैन्य आगबोटींनें रणांगणावर नेण्यास वेळ व खर्च फार लागतात. या गोष्टीचा अनुभव नुकताच झालेल्या दक्षिण आफ्रिकेंतल्या युद्धांत इंग्लंडला चांगलाच आल्यामुळें, इंग्रजी मुत्सद्दी ही अडचण दूर करण्याच्या विचारास लागले. व या प्रश्नाचा एकदां समाधानकारक निकाल करावा म्हणून प्रधान मंडळानीं एक डिफेन्स कमिटी ( ब्रिटिश साम्राज्याचें उत्तम रीतीनें संरक्षण करण्याकरितां कोणत्या गोष्टींची जरूर आहे हें वाटाघाट करून सुचविण्या करितां ) नेमिली. तींत इंग्लंडांतले प्रसिद्ध मुत्सद्दी, व योद्धे नेमले. या कमिटीनें एक अशी सूचना केली कीं ब्रिटिश साम्राज्याच्या कोणत्याहि भागांत युद्ध सुरूं झालें असतां तेथें कुमक तावडतोब जाऊन पोहोंचावी म्हणून ब्रिटिश साम्राज्याच्या मध्य मार्गीं असलेल्या एखाद्या देशांत हल्लीं इंग्लंडांत ठेविलेल्या सैन्याचा कांहीं भाग ठेवावा. व हे सैन्य ठेवण्यास दक्षिण अफ्रिका हा देश फार सोईचा आहे असेंहि या कमिटीनें सुचविलें. ब्रिटिश साम्राज्याचें संरक्षण करण्यास उत्तम उपाय कोणते एवढेंच सुचविण्याचें काम या कमिटीकडे असल्यामुळ तिनें नुसती एवढीच सूचना केली. पण इंग्लंडांतील प्रधान मंडळावर दोन जबाबदाऱ्या आहेत. एक तर साम्राज्याचें संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहेच पण डिफेन्स कमिटीवर नाहीं अशी दुसरी सैन्याचा खर्च भागविण्यास लागणारा पैसा उत्पन्न करण्याचीहि आणखी एक जबाबदारी त्यांच्यावर आहे. दक्षिण अफ्रिकेंतील युद्धास चार साडेचार अब्ज रुपये खर्च लागल्यामुळें इंग्लंडांतील लोकांवर अगोदरच करांचें ओझें असह्य झालें आहे व लोक प्रधान मंडळावर नाराज झाले आहेत. त्यांत आणखी सैन्य वाढवून फौज खात्यावर दरसाल होणारा खर्च कायमचा वाढविला तर वर्ष साहा महिन्यांनीं होणाऱ्या पार्लमेंटच्या निवडणुकींत त्यांना यश येण्याची मुळींच आशा करायला नको.

या बिकट अडचणींतून पार पडण्याची प्रधान मंडळानें खाशी तोड काढिली आहे. ती ही कीं इंग्लंडांत हल्लीं असलेल्या फौजेंतील २५००० सैन्य दक्षिण अफ्रिकेंत ठेवावें व याचा निम्मा म्हणजे १२५०० शिपायांचा सुमारें अडीच कोट रुपये सालिना खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून द्यावा. या प्रमाणें हिंदुस्थानच्या तिजोरीला हात घालण्याची सबब अशी सांगण्यांत येत आहे कीं रशिया जर हिंदुस्थानावर स्वारी करील तर हें सैन्य हिंदुस्थानांतील सैन्याच्या मदतीस हिंदुस्थानच्या बचावाकरितां पाठवितां येईल. ही सबब भगदीं पोकळ आहे व साम्राज्याच्या संरक्षणाचा खर्च इंग्लंडास सोसवेनासा झाल्यामुळें या खर्चाचा बराचसा भाग गरीब व अनाथ हिंदुस्थानच्या तिजोरींतून घेण्य इतका मोठा अन्याय करण्याचा विचार इंग्लंडांच्या मनांत आला आहे. या दोन गोष्टी गेल्या ३।४ वर्षांतील इतिहासाचें ज्यानें सूक्ष्मपणें निरीक्षण केलें आहे त्यास तेव्हांच स्पष्ट दिसतील. ५७ सालच्या बंडाच्या वेळीं इंग्लंडांतून हिंदुस्थानच्या संरक्षणा करितां थोडेंसें सैन्य आणिलें होते तेव्हां पासून आज ४६ वर्षांत हिंदुस्थानच्या बचावा करितां एक देखील शिपाई हिंदुस्थानांत इंग्लंडांतून अगर दुसऱ्या कोठून आणावा लागला नाहीं. उलट ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणाकरितां किंवा या साम्राज्याची इभ्रत कायम राखण्या करितां इंग्लंडला गेल्या ५० वर्षांत ज्या लढाया कराव्या लागल्या त्यांतल्या पुष्कळ लढायांत हिंदुस्थानांतून सैन्य पाठविलें गेलें होतें. क्रिमियाची लढाई, सुदनची लढाई, चीनशीं लढाई आफ्रिकेंतलें युद्ध, हल्लीं चालूं असलेलें सोमाली लोकांशीं युद्ध इत्यादि युद्धांत हिंदुस्थानांतलें सैन्य पाठविलें गेलें होतें व सोमाली युद्धांत अजूनहि हिंदुस्थानचें सैन्य लढत आहे. या कामावर हिंदुस्थानांतलें सैन्य पाठविलें गेल्यामुळें इंग्लंडच्या शत्रूंनीं हिंदुस्थानवर स्वारी केली आहे, किंवा इंग्लंडच्या हिंदुस्थानांतल्या प्रजेनेंच बंड केलें आहे, असें तर कधीं झालें आहे काय? तर तसेंहि कधीं झाल्याचें निदान आम्हाला माहित नाहीं मग हिंदुस्थान सरकारच्या लष्करी खात्यांतील गुप्त बातमी काढणाऱ्या शाखेनें (Intelligence department) हिंदुस्थान सरकारास व विलायत सरकारास काय बातमी दिली असेल ती त्यांची त्यांना ठाऊक सरकारला लागत असलेल्या गुप्त बातम्या समजण्यास ज्यांना मार्ग नाहीं अशा आमच्या सारख्यांना तर असें स्पष्ट दिसत आहे कीं ज्या अर्थी हिंदुस्थानावर कोणाहि देशानें इतक्या वर्षांत स्वारी केली नाहीं व हिंदुस्थानांतहि कोठें बंड झाल्याचें कोणाचे ऐकिवांत नाहीं तर उलट एकेका वेळेस दहा दहा हजार सैन्य हिंदुस्थानांतून दुसऱ्या देशांत पाठविलें असतां हिंदुस्थानचा कारभार यथास्थित चालतो, कोठें दंगाधोपा होत नाहीं व हिंदुस्थानचा कारभार पाहणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रकृति स्वस्थ होऊन आल्यामुळे न दुरुस्त झाल्याचें ऐकूं येत नाहीं व दिसतहि नाहीं त्या अर्थी हिंदुस्थानांतलें निदान १० दहा हजार सैन्य तरी हिंदुस्थानांत जरूर नसतां निरर्थक ठेविलें जात आहे इतकेंच नाहीं तर ज्या अर्थी इतक्या सैन्याचा उपयोग एक दोन वर्षांआड साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांच्या संरक्षणाकडे होतो या अर्थी हिंदुस्थानांत हल्लीं असलेल्या फौजेंतील निदान १० हजार तरी सैन्याचा खर्च इंग्लंडनें सोसला पाहिजे. असें असतां वर लिहिल्या प्रमाणें हिंदुस्थानांतल्या १०००० शिपायांचा खर्च हिंदुस्थानवरचा काढून इंग्लंडनें स्वतः सोसण्या ऐवजीं आपल्या फायद्या करितांच ठेविलेल्या फौजेचा खर्च आपल्यास सोसेनासा झाला म्हणून त्यांतील कांहीं हिस्सा हिंदुस्थानावर लादण्याची खटपट इंग्लंडांतील प्रधान करितात

तेव्हां या अन्यायाला कशाची उपमा द्यावी हें आह्मांला समजत नाहीं.

व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन हे न्यायप्रिय व सत्यवक्ते आहेत असें ह्यांनीं कांहीं प्रसंगीं आपल्या कृत्यांनीं दाखविलें आहे. हिंदुस्थान देश किती दारिद्री आहे व त्यांच्यावर कराचें ओझें किती जबर आहे हेंहि ह्यांना ५ वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवानें कळून चुकलें आहे. करितां आमची त्यांना हिंदुस्थानच्या गरीब प्रजेच्या तर्फे अशी सविनय प्रार्थना आहे कीं इंग्लिश प्रधानां प्रमाणें त्यांनीं स्वार्थाचे आधीन न होतां हिंदुस्थानवर हा नवीन खर्च लादणें ह्मणजे अन्याय व जुलूम होय हें जाणून प्रधान मंडळाचा हा बेत चालूं देऊं नये. लॉर्ड कर्झन साहेब हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या गोड व पाल्हाळिक भाषणांनीं ह्यांच्या पासून आमच्या गरीब देशाचें पुष्कळ हित होईल म्हणून आशा उत्पन्न झाली होती व त्यांच्या पांच वर्षांच्या कारकिर्दींत ह्यांनीं केलेल्या कृत्यांवरून ती बहुतेक लयासही गेली आहे; तरी निदान हिंदुस्थानचें हें एक काम जरी त्यांनीं केलें तरी हिंदुस्थानची प्रजा त्यांचे उपकार आजन्म विसरणार नाहीं. ह्यांना विलायत सरकारला असें स्पष्ट सांगतां देण्या सारखें आहे कीं, जेव्हां जेव्हां हिंदुस्थानांतील सैन्य साम्राज्याच्या लढाया मारण्याकरितां बाहेर देशीं पाठविलें जातें तेव्हां तेव्हां त्या सैन्याचा ज्यादा खर्च (Extraordinary expenses) मात्र विलायत सरकार देते व नेहमीचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून दिला जातो. त्याचप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंत ठेवण्याच्या ह्या नवीन सैन्याची गरज हिंदुस्थानास दुर्दैवानें एखादे वेळीं पडलीच तर त्या वेळचा त्या सैन्याचा ज्यादा खर्च मात्र हिंदुस्थान देईल पण एरवीं बाकीचा सर्व खर्च विलायत सरकारनें सोसला पाहिजे.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 3 1903

Some important measures are on the legislative anvil of our local municipality. We have every reason to thank our city fathers for their mature and prudential deliberations in this connection. The matter of proposing some additional taxation has been a tardy and protracted procedure; but we are glad that there is no undue haste shown so as to leave a chance of repenting at leisure. Our readers are aware that we published a few days ago the proposal of levying an octroi duty in a comprehensive scheme. Objections were invited to that measure and we then expressed our emphatic disapproval about it in so far as it omitted to benefit by the large and prosperous growth of the cotton industry within the municipal limits. In the absence of a tax on the cotton trade in some form or another, we did not see the utility of an octroi duty. The Octroi is an objectionable tax. It should be avoided in all possible ways. It is a source of income that should be the last resort of all lccal bodies. In this view of the matter our acceptance of the octroi proposal was a half—hearted consent. We see that the municipality cannot get over the financial stress unless it hits upon new sources of income. The finances are already minimized by the withdrawal of some important branches of income by the local government. However the side of expenditure knows no possible curtailments. The present economy verges on the brink of starving the essential departments of the municipality. Important sanitary measures have to be put off. There are thus larger demands for more expenditure and there is hardly one thing that can be neglected with impunity. The difficulty of meeting the growth in expenditure is very much pressing; but there is as well the other necessity of avoiding the Octroi tax. We are glad that our opinion did weigh with the Municipal Committee and the latter have now found out a middle path of imposing an octroi duty on all goods received at the Railway station and of levying a moderate tax on the cotton ginned and the bales of cotton. This new proposal meets the difficulty in an efficient manner. It does away with the cumbrous machinery of collecting the Octroi duty as proposed in the original proposal. The Railway invoices are a sufficient guarantee for the weights and desoription of goods. And there are thus very few chances for bribery and corruption which is often times the adiunct of an Octroi taxation. We think that the new modications in the original is a welcome feature and we hope that the latest proposal will meet with the approval of the local government.

To

The Editor of the Berar Samachar
Akola

Sir,

The other day Rev. Mr. Blair dwelt at length on the tendency of the Christian Religion to furthet the cause of humanity, where it had spread. The creed as originally preached by the Man of Sorrows, was no doubt a creed of peace. But it is doubtful if the preaching of Christ is followed in practice by the modern civilized nations professing that creed; and here I quote my authority, in support of the above view. Mr. William Lecky in his Book called "The Map of Life" makes the following observations.

"After eighteen hundred years' profession of the creed of peace, Christendom is an armed camp. Never or hardly ever, in times of peace had the mere prepartions of war absorbed so large a proportion of its population and resources, and very seldom has so large an amount of its ability been mainly employed in inventing and in perfecting instruments of destruction. Those who will look on the world without illusion will be compelled to admit that the chief guarantees for its peace are to be found much less in moral than in purely selfish motives............ The judgments of nations in dealing with the aggressions of their neighbours are, it is true, very different from those which they form of aggressione by their own statesman or for their own benefit."

It is in this view only that the decree recently passed by Lord Alverston, in the case of British Exchequer *versus*. Indian finances ordering the latter to bear an additional burden caused by the increase in the salary of the British Soldier, can be upbled. The decision of the Australian colonies to refuse to employ the Natives of India, as lascars inspite of Mr. Chamberlain's appeal to their good sense and the unfair treatment which the Natives of India receive at the hands of the colonists in South Africa and else where, go to support the above view. But fortunately for the rulers as well as the ruled the gulf between the two has not become hopelessly wide; and hence there are pretty good chances for both the parties to meet on a common platform *e. g.* in social fetes such as cricket and other games, and thus learn to love and forgive each other. Attempts should therefore be made by both the sides, to *know* each other fairly; and then love and sympathy for each other will follow as a matter of necessity.

I/8/03

Yours truly
Fair play

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस पुष्कळ झाला. एकंदर १७।१८ इंच पर्जन्य झाला. हेंवत गर्मी विशेष आहे; सध्यां उघाडी पाहिजे त्याप्रमाणें शनिवारापासून उघाडी आहे, सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

राजा इंद्रकरण असफ-जहाई हैदराबाद हे आपल्या मंडळीसह आकोल्यास येऊन वाशिमच्या बालाजीला गेले, आणि तेथून परत आल्या नंतर परवां जानिवारीं नागपुरास रवाना झाले. उत्तर हिंदुस्थानांतील यात्रेच्या निमित्तानें हे बाहेर निघाले आहेत.

रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. यांस आकोल्याचे डेपुटी इनस्पेक्टर नेमून रा. रा. बळवंत विष्णु वैद्य यांस डायरेक्टरचे हेड क्लार्क नेमण्यांत आलें.

रा० रा० गोविंद भास्कर ओक, सेक्रेटरी जिल्हा बोर्ड, आकोला यांनीं काल सायंकाळीं बिरानीक प्लेगा संबंधानें व्याख्यान दिलें.

पायाचा मुहूर्त— उमरावतीच्या खानगी हायस्कुलाच्या इमारतीचा पाया रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या हातून गेल्या बुधवारच्या सुमुहूर्तावर बसविण्यात आला. या कार्यासाठीं कारंजाचे प्रसिद्ध सावकार काण्णव यांजकडून २० हजार रुपयांची देणगी देण्यांत आली आहे.

रा० रा० नारायण राघवेंद्र क्लार्क आफ कोर्ट वाशीम यांस दोन महिन्याची रजा मिळाल्यावरून रा० रा० नीळकंठ गोविंद देशपांडे यास त्यांची जागा देण्यांत आली.

चार सब डिपुटी इनस्पेक्टरच्या जागापैकीं दोन कमी करण्यांत आल्या होत्या पण अलिशान रेसिडेंट साहेबांनीं पुनः त्या मंजूर केल्या अन्वयें एक जागा उर्दू शाळेकडे मि. अबदुल्ला साहेब हेडमास्तर इलिचपूर यांस देण्यांत आली व एका जागीं रा० रा० जनार्दन केशव नगरकर यांस नेमून त्यांना बुलढाण्यास पाठविलें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८ |
| सोनें २४॥ | चांदी ६८॥। |
| ज्वारी ४० | जवस ९० |
| गहू | ८५ ते १०० |
| बाजरी | ५५ |
| मीठ | ३॥।= रु. मण |
| चणे | ३८- रु. मण |
| तूप | ८॥।= रु. मण |
| तेल | ५८= रु. मण |
| रुई | ५० |

दिवाणी दावा नंबर ६ क्लास २१

१९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सर्टिफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान— विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जडज्य आकोलें यांचे कोर्टांत.

अर्जदार— किसन गोपाळ जितमल आ० पा० जनक बाप नथमल रामप्रताप दुकान दानापूर.

सर्वांस या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार यानें मयत पारवतीबाई जवजे जीतमल हस्ते मंगणीराम तनसुकराय दुकान तेल्हारे याचेकडे हुंड्याचे व्यवहारावरून व्याजा सुद्धां रकम रुपये ३०९७८४ याचे कर्ज वसूल करण्या करितां सरटिफिकीट मिळावें ह्मणून तारीख १३ माहे जुलै सन १९०३ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व ह्या अर्जाचे चौकशीची तारीख २९ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं मुक्रर केली आहे तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटिफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २९ माहे जुलै सन १९०३ इसवी.

;V. N. Dandekar.
सिव्हील जडज आकोला.

## नोटीस

संभु लांडे कुणबी राहणार पारस तालुके बाळापूर यांस.

तानी मर्द नामु ती हल्लीं राहणार वकापूर तालुके आकोलें इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा लग्नाचा नवरा नामु वा। लक्ष्मण याचे व माझे न बनल्यामुळें मला त्यांनीं तुमचे मार्फत फारकती दिल्ही व त्याचे लग्नाचे खर्चाचे पैसें रुपये १२५ तुमचे कडून देवविले; व फारकतही तुमचे जवळ ठेविली. आतां मला दुसरा पाटाचा नवरा करणें असल्याने तुह्मी आपले रुपये घेऊन फारकत माझे स्वाधीन करावी असें तुह्मी वकापूर येथें तारीख ३०।७।०३ रोजीं आले तेव्हां कळविलें व त्या पूर्वीं माझा चुलत भाऊ मारुती आणि दत्तु व आते भाऊ पांडू यांनाही रुपये घेऊन पाठविले असतां ते तुह्मी न घेतां फारकत दिल्ही नाहीं व मनबरोबर पाट लावावा अशी तुमचे मनांत बदनीयत उत्पन्न झाली आहे. या साठीं या नोटिशीनें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत तुह्मी आपले रुपये १२५ घेऊन पावती द्यावी व फारकत लेख परत द्यावी. मी तुमचे बरोबर पाट लावण्यास खुष नाहीं. असें न झाल्यास पुढें तुमचे रुपयांचा मजवर दावा चालणार नाहीं. पैं तुह्मी फारकत परत न दिली तरी तुमचे शिवाय कोणा बरोबर पाट लावल्या वाचून राहणार नाहीं. कळावें ता० २।८।०३

सही
तानी मर्द नामु इची बांगडी.

## नोटीस

बेशमी तुकाराम वा. आनंदाबारी राहणार मांजरी हल्ली बार्शीटाकळी यांस:

नोटीस देण्यांत येतें कीं, आपण ह्मणता कीं मी माझे बायकोस ह्मणजे तुमचें बहिणीस नेण्यास आलो होतो ती गोष्ट खोटी आहे. व आपण लिहिता कीं १०० रुपये व चांदी ५० तोळे व सोन्याच्या बाळया ६ माशाच्या हेंही लिहिणें खोटें आहे कारण त्यावेळेस माझे बहिणीचे गंधर्व होण्याचे आगोदर नांदकी मुकाजी वा. कृष्णाजी बारी व कृष्णा वा. झांगो बारी हे होते यांचे समक्ष आपण रुपये मला दिले नाहींत व मी दिपवाळीस नेण्याचेपूर्वीं आपण माझे बहिणीचे अंगावर असलेले डागीने लोकांचे मागून आणले असल्यामुळें वापस देण्याकरितां काढून घेतले हे सगळ्या पेटाळांतील लोकांस माहीत आहेच व मग मी ज्या दिवशी माझे बहिणीस दिवाळीस नेले त्या दिवशी रात्र नव्हती दिवस होता त्यावेळेस तिचे अंगावर एक डागीना नव्हता हे मन्नुसिंग रजपुत, गणुआला अगरवाला व किसन सोनार वगैरे इसमास माहीत आहे आपण ज्या अर्थी ह्मणता कीं मला १०० रुपये व डागिने दिले त्याअर्थीं आपण गंधर्वाचे वेळेस आपण आपले सहीची प्रामेसरी नोट पंचासमक्ष लिहून दिली ते कां? तर आपण माझे खावटीच्या व नोटीशीच्या पैशाची १५ दिवसाचे आंत सोय करावी न केल्यास कायद्या प्रमाणें तजविज करून कोर्ट मारफत फिर्याद करून पैसा भरून घेतला जाईल कळावें तारीख २९।७।०३ इसवी.

सही

किसन दावला बारी राहणार

बार्शीटाकळी दस्तुर

खुद्द.

---

## वर्तमानसार

काबूल येथें अमीर साहेबांनीं एक कालेज स्थापिलें आहे त्या करितां त्यांनीं पंजाबातील मुसलमान ग्राज्युएट नेले आहेत. प्रिन्सिपालास ३०० रुपये पगार ठरविण्यांत आला आहे आणि अगदीं शेवटची जागा १५० रुपयाची आहे.

इंग्रजी कालेजांत जे अभ्यास इंग्रजी भाषेंत शिकविले जातात तेच देशी भाषांतून शिकविणारें एक कालेज गायकवाड हे स्थापन करण्याच्या विचारांत आहेत असें समजतें. उद्योग फार चांगला आहे व फलद्रूप होईल अशी आशा आहे.

हैद्राबादेकडे फार पाऊस पडल्य मुळें ५० तळीं फुटलीं असें सांगतात.

हैद्राबादेस एक गुरखा शिपाई पिसाळला व भर बाजारांत त्यानें एकास तरवारीनें ठार मारलें व नऊ जणांस जखमी केलें!

लेफ्टे. रिकफर्ड व ड्रांट यांस कलकत्त्यास लेफ्टे. अर्नेस यांनीं पकडून कैद करून बंगलूरास नेलें असें २१ ची तार सांगते. त्यांनीं खोट्या सह्या केल्या आहेत असें दिसतें. गोरे लोकही असें नीच कृत्य करितात?

अलिपूर येथील सेशन कोर्टांत बिस्तु बावरी नांवाच्या एका नेटिवांस एच. ए. मार्टिस नांवाच्या एका साहेबानें ठार मारल्याचा खटला चालला होता वगैरे हकीकत मागें दिलीच आहे. त्या खटल्याचा निकाल लागून ज्युरीनें एकमतानें 'ह्यानें खून केला' असें ठरविलें. अर्थात आतां त्यास फांशीची अगर काळ्यापाण्याची शिक्षा झाली असेल असें वाचकांस वाटत असेल पण गोऱ्या कातडीस फांशीची दोरी भिते हें विसरतां कामा नये. त्या खुनी साहेबांस फक्त ३ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली आहे!

काश्मीरांत श्रीनगराकडे गेल्या आठवड्यांत अतिशय पाऊस पडला श्रीनगरमध्यें जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. लोक होड्यांत बाहेरें घराच्या खालच्या मजल्यावर कोणीही बसूं नये असा हुकूम करण्यांत आला होता तार आफिसांची अगदीं गैर सोय झाली आहे असें सिमल्याच्या तारा सांगतात. ठा. अ.

लॉर्ड नार्थकोट गोशाळा— सन १९०० सालीं ना० लार्ड नार्थकोट साहेब यांनीं स्वातःचे १५००० रुपये खर्चून गुजरोथेतील खरोडी गांवीं गोशाळा स्थापन केली होती; त्या गोशाळेस त्यांनीं आणखी ९००० रुपये या संस्थेस दिले. मिळून २४००० रुपये दिले असून इतर वर्गणी २९७९२ रुपये जमली. माडें ठरवून २१५१ एकर जमीन गोशाळेकरितां घेतली आहे. ज्ञा. च.

पुण्याचे रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी हे विधवा पुनर्विवाहाबद्दल तडजोड सुचवितात कीं "विधवा पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध आहे पण त्या सारख्याच शास्त्रनिषिद्धत्वाचा आरोप आणतां येण्यासारख्या दुसऱ्या अनेक चाली रीति आज आपल्या समाजांत रूढ नाहींत काय? त्याबद्दल कालमानाकडे नजर देऊन जशी चालढकल आजपर्यंत होत आली आहे तशीच पुनर्विवाहाची अवश्यकता ध्यानीं आणून ह्या बाबतींतही व्हावी. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें विधवेशीं पुनर्विवाह लावणारास नको तर श्राद्धीं ब्राह्मण बसवूं नये. पुनरूढ विधवेस नको तर मंगलकार्यांत मंगलविधि करण्यास परवानगी देऊं नये, पण यापेक्षां जास्त तटबंदी करण्याची गरज नाहीं. बोलून चालून विधुर पुरुषाच्या पुनर्विवाहाप्रमाणेंच विधवेचा पुनर्विवाहही आपद्धर्मच आहे आणि याच समजुतीनें तो प्रचारांत यावा. सु०

मुंबई येथें नवीन स्थापन झालेल्या हिंदू एज्युकेशन फंडांतून दरमहा ५० रुपयांची स्कालरशिप घेऊन रा० रा० गोविंद नारायण परांजपे बी. ए. हे व्यवहारिक रसायनशास्त्र (Applied Chemistry.) हा विषय शिकण्याकरितां जपानास चालते झाले. रा० परांजपे हे अक्कलकोटचे रहिवाशी असून त्यांचा अभ्यास दक्षिण हैद्राबाद येथील कालेजांत झालेला आहे.

प्रो० छत्रे यांची सर्कस— अमेरिकेंतून परत येऊन हल्लीं चिनांत शांघाय टिनसिन व पेकिन या मोठमोठें शहरीं फिरत आहे. त्यांच्या सर्कशीची तिकडे फार वाहावा होत आहे. इं० प्र०

न्यायाच्या कोर्टांत काळा गोरा हा भेद, सैन्यांत तोच प्रकार, रेल्वेत तीच पद्धति, सरकारी नोकरींत तेच रडगाणें आणि आतां शिक्षणखात्यांतही या पक्षपाताचा प्रवेश होऊं पहात आहे. पंजाबांत कांहीं युरोपियन पाठशाळेंत व युरोपियन विद्यार्थ्यांस अधिक स्कॉलरशिपा ठेवण्याची मंजुरी मिळालेली आहे. मो०

सौ० सगुणाबाई देव ह्मणतात कीं आमच्या शाळांतून Kindergarten अथवा बालोद्यान हा विषय आह्मी शिकवीत असतो तोही अत्यंत महत्वाचा आहे. मुलें ह्मणजे मानवी फुलेंच होत. त्यांच्या मानसिकवृत्तींत नीट जोपासना केली ह्मणजे पुढच्या वयांत त्यांचा उत्तम विकास होतो.

तिबेटमध्यें आपला नेटाने शिरकाव करण्य साठीं तिबेटच्या थंड हवेंत आपल्या लष्कराची छावणी करण्यासाठीं, अगर इतर कांहीं राजकीय अगर लष्करी कारणासाठीं काश्मीर प्रांत इंग्लंड आपल्या ताब्यांत घेणार होते, अशी चोहोंकडून दाट वदंता होती परंतु ती खोटी व अगदीं निराधार आहे असें अलाहाबादचें 'पायोनियर' पत्र एका गुप्तदूतीच्या 'अधिकारा' नें उच्चैः स्वरानें सांगत आहे. बातमी खोटी झाली तर आनंदच आहे.

"धि बाम्बे मोलाबक्षम्यूझिक स्कूल" चे प्रिन्सिपाल प्रो. शिवराम सदाशिव मनोहर यांचें "स्वरप्रस्तार" नांवाचें बीजगणितांतील Law of Permutations चे आधारें पुस्तक तयार केलें आहे, ह्या पुस्तकांत दिलेल्या स्वरप्रस्ताराचें वाचनानें स्वरज्ञान होण्यास सुलभ मार्ग झाला आहे.

मिलिटरी डिपार्टमेंटनें (लष्करी खातें) एप्रिल महिन्यांत हुकूम सोडला आहे त्याचा सारांश हा आहे कीं, 'गव्हर्नर जनरल इन्कॉउन्सीलची आजपासून अशी मर्जी बाहत आहे कीं, लष्करी खात्यांतील ऑफिसामधील दरमहा २०० रुपये अगर त्याहून जास्त पगार असलेल्या खालीं दिलेल्या जागा 'नेटिव ऑफ इंडिया' नसलेल्या येट सोजर—क्लार्क' करितांच राखून ठेवण्यांत येतील.'

"इंडियन ओपिनीयन" नवाचें इंग्रजी तामीळ, हिंदी व गुजराथी अशा चार भाषेंत एक वर्तमानपत्र एका हिंदु गृहस्थानें आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील दर्बान शहरांत सुरू केलें आहे.

नाशिक जिल्ह्यांत मोखाडे पेठ्यांत सरकारानें सुमार दोनशे रुपयाचें धान्य सुगीवर खरेदी करून ठेविलें असून, तें आतां कोळी वगैरे गरीब लोकांना वाढीदिढीच्या रूपानें देण्याचें सरकारानें ठरविलें आहे असे कळतें!

गेल्या शुक्रवारीं कलकत्यास शिवाजी उत्सव झाला. तन्निमित्त भरलेल्या सभेचे अध्यक्ष बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी हे असून बाबू बिपिन चंद्रपाल, डाक्टर सरत मुलिक वगैरे लोकांचीं तेथें भाषणें झालीं. गतवर्षापेक्षां या उत्सवाचें मान यंदा कलकत्यास जास्त वाढलेलें दिसतें.

कोंडवाड्यांत अन्यायानें गुरें नेल्यामुळें जो दंड भरावा लागतो, त्याबद्दल नुकसानीचा दावाच करितां येत नाहीं, असा बेंगुर्ल्याचे सबा० जड्जानीं एक निकाल दिला होता. त्यावर झालेले अपिलांत, हायकोर्ट जज्ज यांनीं असें ठरविलें कीं, अशा प्रकारच्या नुकसानीचा दावा चालूं शकतो.

जर्मनींतील बर्लिन शहरीं कॅरोलिन पेश गोडा नांवाची एक स्त्री आहे तिजवर तेथें खटला होऊन तिला फांशीची शिक्षा झाली आहे. तिचीं आजपर्यंत पांच लग्नें झालीं असून, तिचे पहिले चार नवरे सोमलाचे विषप्रयोगानें मरण पावले! पांचव्या नवऱ्याच्या अन्नांतही तिनें विष घातल्याचें सिद्ध झाल्यावरून तिला ही शिक्षा झाली आहे.

हायकोर्टापुढें येणारे फौजदारी अपिलाचे खटले, जेव्हां अपील करणारे गरीब असतील तेव्हां हायकोर्टानें वकीलांनीं धर्मार्थ फुकट चालवावेत अशी नवीन पद्धति जस्टिस सर भाष्यम् अय्यंगार ह्यानीं नुकतीच मद्रासेस चालू केलेली असून तिचा प्रसार, आपल्या देशाचे इतर हायकोर्टाच्या जागींही होईल असें दिसत आहे.

मुंबई येथें रा० रा० बाळकृष्ण महादेव तांबट या नांवाचे मॅट्रिक परीक्षा पास झालेले व औद्योगिक शाळेंत शिकलेले गृहस्थ आहेत. त्यांणीं, पाणी जलद तापण्या सारखे व जळण थोडें लागेल असें बंब तयार केले आहेत.

सोलापूर जिल्ह्यांत मद्यपाशनाचें व्यसन दिवसेंदिवस वाढत चाललें आहे असें तिकडील शिंदीच्या मक्तेदाराच्या लिलावांतील रकमेवरून दिसतें. गेल्या सालीं सोलापूर शहरांतील शिंदीचा मक्ता १५,५५० रुपयांस झाला होता, तो यंदा ४३,२२५ रुपयांस झाला. तसेंच शहराशिवाय एकंदर जिल्ह्याचा मक्ता गुदस्ता १९०० रुपयांचा होता, तो यंदा ४९२१ रुपयांस झाला. याचा अर्थ, शिंदीचा खप इतका होत असावा असेंच ह्मणणें योग्य दिसतें.

मि० रॉबर्ट्स एम्. पी. यांनीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाचा खर्डा पार्लमेंट सभेपुढें वादविवादाकरितां लवकर आणावा ह्मणून सूचना केली होती, पण दुसऱ्या कामांच्या लबचीवर, आपणांस आजच तारीख नेमतां येत नाहीं, असा मुख्य प्रधान मि० बाल्फोअर यांनीं त्यांस जबाब दिला! हिंदुस्थानच्या काळजीचें त्यांना काय कारण?

बडोद्याच्या युवराजांना निंबाळकरांच्या घराण्यातील वधू करणार असें समजतें. वि. वि.

हल्लींचे कल्याण तालुक्याचे फौजदार रा० रा० नारायण दाजी केळूसकर यांनीं गेल्या वर्षीं मोरया भवारी नांवाचा दरोडेखोर ज्याला पकडण्यासाठीं सरकारांतून १०० रुपयांचें व दाजी बिटू शिंदे ज्याला पकडण्यासाठीं १००० रुपयांचें अशीं बक्षिसें लागलीं होतीं या दोघ नाही सदर फौजदार यांनीं मोठ्या मेहेनतीनें व शिताफीनें पकडून सरकारच्या स्वाधीन केलें आहे. रा. रा. नारायण दाजी केळुसकर यांना १०० रुपयें किंमतीची तरवार बक्षीस देण्याचें ठरविलें आहे. ज्ञा. च.

आजपर्यंत लक्षावधि उंदीर मारिले तरी हाँगकाँगचा प्लेग कमी होत नाहीं असा अनुभव आहे!

निजाम हद्दींतील सिंघराणी खाणीचीं जमीन पुनः खालीं खालीं दबूं लागली आहे!

नगरास असलेल्या ९९ बोअर कैद्यांनीं राजनिष्ठेची शपत घेतल्यामुळें त्यास दक्षिण आफ्रिकेंत पाठविण्यांत आलें.

मि० दयाराम गिडुमल यांस शेकब यांचे जागीं, सिंधचे जुडिशियल कमिशनर व सदर कोर्टाचे जज्ज नेमिलें.

मुंबई येथील ग्रँड मेडिकल कॉलेजांतील विद्यार्थी मि० दौलतराव गोपाळदास अडवानी हे एडिंबरो येथील एल्. आर. सी. पी. च्या परिक्षेंत पास झाले.

येत्या आगष्ट महिन्यांत पुणें येथें भरणारी महामेडन एज्युकेशनल कान्फरन्स, नामदार गव्हर्नर लॉर्ड नॉर्थकोट यांचे हस्तें उघडण्यांत येणार आहे असें कळतें.

बेल्जियम येथें खबुतरांच्या शर्यती फारच मोठ्या प्रमाणावर होत असतात. त्यांच्या अनुभवावरून, एक खबुतर एक दिवसांत पांचशें मैलपर्यंत सहज जाऊं शकतें असें समजतें.

ज्या माऱ्यांना विलायतेस जावयाचें असेल, त्यांनीं त्यापूर्वीं भगवद्गीतेवर हात ठेऊन 'मी धर्मविरुद्ध वागणार नाहीं, बरोबर नेलेल्या हिंदुस्थान इसमाच्याच हातचें अन्नपाणी घेणार नाहीं राहण्याची सोई निराळी घेईन,' या प्रमाणें आपल्या जातीपुढें शपथ घेऊन जावें.

## तिखाडी तेल काढण्या बद्दल )

तिखाडी तेल काढण्या बदल

या नोटिशीनें सर्वत्रांस जाहीर करण्यांत येतें कीं येत्या तीन वर्षां करितां ह्मणजे लिलावाचे तारखे पासून ते तारीख ३१ माहे मार्च सन १९०६ इसवी पावेतों वणी जिल्ह्यांतील स्टेट फॉरेस्ट मधील तिखाडी गवताचें तेल काढण्याचा मक्ता तारीख ८ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिस यवतमाळ येथें दिवसा १२ वाजतां लिलाव करण्यांत येईल या मक्तयाचे अटी व स्टेट फॉरेस्टचे विस्तीर्ण वगैरे बद्दलची माहिती पाहिजे असल्यास यवतमाळ येथील डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसमध्यें दररोज ११ वाजल्या पासून ४ वाजे पर्यंत पहाण्यास मिळत जाईल कळावे.

यवतमाळ ता. १४।७।०३ इसवी. } *S. SRINIVASALU* डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर जिल्हे वणी.

**NOTICE**

—:0:—

*FOR SALE*

2 Second hand steel Lancashire boilers in good condition 30 × 7 6 constructed by by Messrs Fawcet Preston & Co. for a working pressure of 60 lb. per square foot Working pressure altered in Boiler Certificate granted last year to 55 lb. per square foot. For particulars apply to.

Ralli Brothers Agency
Shegaon.

## विक्रीस तयार.

विक्रीस तयार—लँकेशायरचे पोलादी दोन वापरलेले बॉयलर ( इंजनें ) चांगल्या स्थितींत असून लांबी ३० फुट व व्यास ७॥ फुट आहे. हे बायलर मेसर्स फासेट प्रेस्टन आणि कंपनी यांनीं तयार केलेले आहेत व यांत प्रत्येक इंचाला ६० पौंड वजनाचा दाब बसण्याची शक्ती आहे. गुदस्त सालीं मिळालेल्या सरटी फिकीटांत याची शक्ती ५५ पौंडांची आहे असे दर्शविलें गेलें आहे. विशेष माहितीसाठीं "रॅली ब्रदर्स एजन्सी" शेगांव या पत्यावर पत्रव्यवहार करावा.

Ralli Brothers Agency
Shegaon.

## नाग, नरसं, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाटोडा व त्यांत बुध बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला


## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अगदी वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. ही वॉचें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ....................४०
१९ „ हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकदा स्प्रिंग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद कांटा असलेले ............२२
१९ „ हाफ हंटिंगचें............२०
१९ „ हंटिंगचें ............२०
१४ „ रिस्ट वॉच ............२

### इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ „ हंटिंग............२०
१४ „ रिस्टवॉच............२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग............३५
१८ व १९ „ ओपनफेस ............३०
१९ „ सेकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेले ............३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ............४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुळाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ति भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान सर्डी सोबत. रोखीनें किंवा व्ही पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०
२७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षे आंजर्ले वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून कांहीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सहीच्या पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, ग्वाल्हेर संस्थानांत लोकसंख्या कमी असल्यामुळें शेतीलायक पुष्कळ जमीन पडीत राहिली आहे, यापैकीं पुष्कळशी जमीन काळीभोर आहे व तींत गहूं साधारण पर्जन्य पडल्यानें होण्यासारखा आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं जमीन पडुवा ह्मणजे दुमट व रांकड ह्मणजे पथरीली आहे व या जमिनीत इरिगेशनच्या योगानें गहूं होण्या सारखा आहे.

जे लो० बाहेरून येथें वसाहत करण्यास येतील व जमिनीची लागवड करितील त्यांना सवलती दिल्या जातील त्या येणें प्रमाणें:—

( १ ) जो इसम १०० बीघे जमिनीची लागवड करील त्याला मौरूसी हक्क दिला जाईल व त्यांजपासून इतर शेतकऱ्यापेक्षां रुपयांत एक आणा कमी महसूल जमिनीवर घेतला जाईल.

( २ ) जो इसम १०० बिघ्यांहून जास्त जमिनीची लागवड करील त्याजला त्या जमिनीवर जमीदारी हक्क दिला जाईल ह्मणजे बंदोबस्ताचे वेळीं जो आकार ठरविला जाईल तो त्याजकडून घेतला जाईल.

( ३ ) जो कोणी इसम नवीन गांव वसवून १००० बीघे जमिनीची लागवड करील त्याला जमिदारी हक्क मिळून सरकार मार्फत एक पाणी पिण्यासाठीं विहीर जरूर असल्यास त्या गांवांत बांधून दिली जाईल,

( ४ ) अथवा जर कोणा इसमास एक किंवा अधिक गैर आबाद गांव घेणें असेल तर त्यांनीं दरखास्त दिल्यावर त्याजला आणखीन कांहीं विशेष सवलती हुजूर दरबार मंजुरीनें दिल्या जातील.

( ५ ) जमिनीचा पट्टा घेणार इसमानें तीनसालांत पट्ट्यातील जमिनी पैकीं १/४, जमिनीची लागवड केली पाहिजे व सहा सालांत अर्ध्या जमिनीची लागवड केली पाहिजे व दहा सालांत त्या सर्व जमिनीची ह्मणजे गायरान व घरासाठीं राखून ठेविलेली जमीन खेरीज करून बाकी सर्व जमिनीची लागवड केली पाहिजे

( ६ ) अशा लागवड केलेल्या जमिनीवर ६ वर्षे पावेतों कांहीं महसूल घेतला जाणार नाहीं नंतर पुढें तीन साल पावेतो अर्धा महसूल घेतला जाईल व त्यानंतर पुढल्या वर्षा पासून ह्मणजे दहाव्या वर्षापासून पूर्ण महसूल घेतला जाईल.

( ७ ) घरें बांधण्यासाठीं व शेती साठीं नांगर वगैरे करण्यासाठीं जंगलांतून जें लांकूड घेतलें जाईल, तें फुकट दिलें जाईल. नवीन रैयतेसाठीं वर्षे ६ पावेतो सायरचा महसूल त्या लांकडावर माफ केला जाईल. पुढें अशा लांकडाच्या प्रत्येक गाडीवर ≈॥ प्रमाणें सायरचा महसूल घेतला जाईल.

( ८ ) याहून आणखी कांहीं इतर माहिती विचारणें असल्यास तिजबद्दल सूबे साहेब जिल्हा किंवा सेक्रेटरी सदर बोर्ड आफ रेव्हेन्यू यांचे कडे अर्ज करावा ह्मणजे मिळेल.

| | |
|---|---|
| लश्कर ग्वाल्हेर ता. १८ माहे जुलई सन १९०३ इसवी. | दामोदर हरी कुंठे सेक्रेटरी सदर बोर्ड आफ रे. ग्वाल्हेर स्टेट. |

---


## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P . Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du- under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the re-payment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*


---


*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युनीक्षर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णांचे अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.



## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५०६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्टवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई



## मुंबई बँकची सव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

| | |
|---|---|
| मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ | J. Kinniburgh एजंट |



अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोकप्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी युउपक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर.


---


## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग यापासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा.


---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

आकोल्यातील लोकांस.................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह......... २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकांस............................ २
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........०१ ०६
पेपेरेस.............०१

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 ass
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 10 AUGUST 1903 NO 31

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १० माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३१

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्य आणि पिठोरी किंवा पाटोडा व त्यांत बुध बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हु चित्रांचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पमणें पडेल. व टपालखर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनाबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला

दि० किरकोळ मु० नंबर २ सन १८
१९०३

वि. विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हील जडज्य अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार

पनुबाई जवजे सुखा गुजराथी ब्राह्मण रा दहिहंडे तालुके अकोट.

अज्ञान

गंगाबाई जवजे कृष्णाराम गुजराथी ब्राह्मण दहिहंडे

अज्ञान गंगाबाई जवजे कृष्णाराम गुजराथी दहिहंडे यांचे स्वतःचे किंवा इस्टेटीचे अगर दोघांचे पालन करण्यास आपणास पालनकर्ता नेमण्या बद्दल अगर ठरविण्या बद्दल अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची चौकशीची तारीख २९ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजी नेमिली आहे तरी या कोर्टानें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदारा शिवाय जे इतर नातलग मित्र, आप्त किंवा सदर्हू अज्ञानाचे कोणी व्हावें अशी ज्याची इच्छा असेल अगर जे अज्ञानाचे शरीराचे अगर इस्टेटीचे अगर दोहोंचे पालनकर्ता नेमण्या बद्दल अगर ठरविण्या बद्दल इच्छित असतील त्यांनी खुद या कोर्टात आमचे समोर सदर्हू तारखेस हजर व्हावें. आणि अपत्यास पालनकर्ता कां नेमावें किंवा कां ठरविलें जावें या बद्दल जे कांहीं दस्तऐवज अगर तोंडी पुरावे असतील ते हजर करण्या करितां तयार ठेवावे.

ही नोटीस आज तारीख ६ माहे आगष्ट व कोर्टाचे शिक्क्यानिशीं दिली आहे तारीख ६।८।१९०३ इ.

V. N. Dandekar
सिव्हील जडज्य.

## नोटिस

नामुजी वल्लद लक्ष्मण सातरकर जात कुणबी राहणार धानेर ता. बाळापूर यास—

तानी मर्द नामुजी हल्लीं राहणार वकापूर ता. आकोलें इजकडून देण्यांत येते कीं तुमचे बरोबर माझें लग्न झालें असून तुमचें व माझें न बनल्यानें सुमारें तीन माहे त्यापूर्वीं तुह्मी मजला शंभू लांडे कुणबी राहणार पारस यांचे मार्फत फारकत देऊन रुपये १२९ लग्नाचे खर्चाबद्दल घेतले यामुळें तुमचा व माझा कोणतेच प्रकारें संबंध राहिला नाहीं हल्लीं मी कोणाशीं तरी पाट लावण्याचे विचारांत आहे सदरहू माझें करण्यास तुमची किंवा दुसरे कोणाची हरकत न येतां विना झालेल्या फारकतीच्या उलट गोष्टी पुढें न यावयाह्मणून या नोटीशीनें सुचवीत आहे तरी तुमची कांहीं हरकत असल्यास नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत कळवावें ह्मणजे त्याबद्दल योग्य रीतीनें निकाल करून घेतां येईल व तुह्मी कांहा जबाब न दिल्यास तुमची कांहीं हरकत नाहीं असें समजून मी पाट लावून घेईन पुढें तुमची तकरार चालणार नाहीं यासाठीं आगाऊ कळविलें आहे कळावें ता. २।८।०३ इ०

सही

निशाणी तानी मर्द नामू ईची बांगडी.

## नोटिस

बेशमी तुकाराम वा सोदाजी पाटील वस्ती बेलुरा बुजरुक यांस.

खाली सही करणार यजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी दिलेली जाहिर नोटीस पाहण्यांत आली. तुमच्या पुंजीपैकी २॥ रुपये येणें शिल्लक आहेत. हें तुह्माला माहित असतां विनाकारण नोटीस छापवून माझ्या संबंधानें गिल्ला केला आहे. २॥ रुपये आणि या नोटीशीचा खर्च मिळून सर्व रकम आणून द्यावी व पूर्जी परत न्यावी कळावें. ६ आगष्ट १९०३ इसवी.

सही

शंभु वा इण्णाजी माकरे राहणार बेलुरा बुजरुख निशाणी वखर.

## नोटीस

बेशमी नानू वल्लद भवानी पाटील राहणार ... खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमचा वसूल संपूर्ण आल्यावरून तुमचा पूर्जी परत केला असतांही तुह्मी विनाकारण मला छापील नोटीस दिली तर ही नोटीस पोचतांच तिच्या खर्चाची रकम आणून द्यावी. तसें न केल्यास कोर्ट मार्फत कोर्टखर्चा सुद्धां वसूल केली जाईल. कळावें. ता० ६।८।०३ इ.

सही

शंभु वा इण्णाजी माकरे राहणार बेलुरा बुजरुक निशाणी.

## NOTICE
—:0:—
*FOR SALE*

2 Second hand steel Lancashire boilers in good condition 30 × 7.6 constructed by by Messrs Fawcet Preston & Co. for a working pressure of 60 lb. per square foot Working pressure altered in Boiler Certificate granted last year to 55 lb. per square foot. For particulars apply to

Ralli Brothers Agency
Shegaon.

## विक्रीस तयार.

विक्रीस तयार—लँकेशायरचे पोलादी दोन वापरलेले बॉयलर (इंजनें) चांगल्या स्थितींत असून लांबी ३० फुट व व्यास ७॥ फुट आहे. हे बायलर मेसर्स फासेट प्रेस्टन आणि कंपनी यांनीं तयार केलेले आहेत व यांत प्रत्येक इंचाला ६० पौंड वजनाचा दाब बसण्याची शक्ती आहे. गुदस्त साली मिळालेल्या सरटीफिकेटांत यांची शक्ती ५५ पौंडांची आहे असे दर्शविलें गेलें आहे विशेष माहितीसाठीं "रॅली ब्रदर्स एजन्सी" शेगांव या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

Ralli Baothers Ageny
Shegaon.

छापत आहे!

## लवकरच प्रसिद्ध होणार!

सरस्वतीप्रकाशमाला
किरण दुसरें!
रा० रा० रामचंद्र यशवंत वेसकर
(राणी संयोगिता नाटकाचे कर्ते) कृत.

## प्रतापशाली
## प्रतापसिंह

एक वीररस परिप्लुत पंचांकी नाटक.

वरील नाटकाचें कथानक चटकदार व संस्मरणीय असून यांत वीररस प्रधान आहे. नाटक कित्येक कोमल अंतःकरणाच्या वाचकांना आणि प्रेक्षकांना सर्वतोपरी रुचत नाहीं असा अनुभव आल्यावरून या नाटकांत कांहीं ठिकाणीं हास्य व शृंगार या दोन्हीं रसांना जागा दिली आहे.

फक्त तारीख १५ सप्टेंबर पूर्वीं नांवें रजिष्टर करणारांसच किंमत ८ आणे. पुढें १२ आणे.

K. D. CHAUHAN
संपादक सरस्वती प्रकाश
उमरावती.

## शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

(रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळे बी. ए. यांनीं लिहिलेला निबंध:)

नंबर ४

शेक्सपिअरच्या समकालीन नाट्यग्रंथलेखक—ज्यांचीं नाटकें अद्याप अस्तित्वांत आहेत—अनेक होते, त्यांपैकीं मार्लो, ग्रीन, आणि पील हे मुख्य आहेत. हे तिन्हीही भरयुवी होऊन शेक्सपीअरचा चांगला अभ्युदय होण्यापूर्वींच मरण पावले, जरी ते पुढें जिवंत राहते तरी शेक्सपीअरशी उत्तम कोटी दळतीना, असें बहुतेक ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. त्यांत मार्लो कदाचित् शेक्सपीअरच्या तोडीचा निपजला असतां असें कांहीं ग्रंथकार ह्मणतात.

शेक्सपीअरच्या पूर्वी नाट्यकला ओबडधोबड स्थितींत होती, तिला शेक्सपीअरनेंच हातीं धरून सुस्थितीस आणलें. त्यानें समकालीन ग्रंथकारांवर ताण केली. त्यांच्या अंगीं व्यक्तिपरत्वें भिन्न गुण होते, परंतु शेक्सपीअरच्या अंगीं ते सर्व गुण एकवट झाले होते. त्यानें, पुरातन कालापासून नाट्यकलेंत जीं रूपांतरें झालीं यांच्यातील गुणांचा उपयोग करून घेऊन विकास केला. Mysteries and Miracle plays सारख्या धार्मिक खेळांपासून त्यानें गांभीर्य संपादन केलें Moralities नैतिक प्रकरणांपासून नीतीचा जोर आणि मनोविकारांचें प्राबल्य मिळविलें. Comic Interludes सारख्या प्रहसनांपासून वृत्तिवैचित्र्य व स्वभाववैचित्र्याची रचना आणि हास्यरसाची सामग्री मिळविली. मध्य कालच्या (Middle ages) ज्ञानसंग्रहापासून त्याला ऐतिहासिक वगैरे विषय नाटक रूपानें जगापुढें आणण्यास मिळाले आणि तत्कालीन स्थिती पासून, धार्मिक, शास्त्रीय, राजकीय आणि औद्योगिक उन्नतीमुळें एकवटून गेलेल्या जनसमुहाची मानसिक स्थिति आणि त्या मुळें त्यांच्या आवडीमध्ये झालेला फरक हा त्यास कळला.

…स पुष्कळ उपयोग झाला. अशा रीतीनें नाट्यकला उर्जित अवस्थेस आली; तिच्या सहवासानें नाट्यग्रंथ व नाटकगृहें हीं अस्तित्वांत आलीं. होशी एलिझाबेथ राणीचा आश्रय, आणि तिच्या मरणा नंतर जेम्स राजाचें पाठबळ, थोर सरदार मंडळीची मदत, नेत्रसुखाभिरुचि सामान्य जनांची हौस अशी सामुग्री मिळाल्यावर रंगभूमि ऊर्जित दशेला आली यांत नवल काय? ह्या कलेसंबंधानें ह्या वेळीं इंग्लंड मध्यें जो उत्साह नजरेस आला, तसा दुसऱ्या कोणत्याही देशांत आणि कोणत्याही काळीं आला असेल असें वाटत नाहीं. पूर्वी ही कला बाल्य दशेंत आणि तिच्या साधनानें शिल्पी लोक कामधंदा संपल्यावर केवळ करमणूक करून ते किंवा सरदार लोकांचे नोकर आपल्या यजमानांची किंवा दरबारी लोकांची करमणूक करीत किंवा पाटशाळेंतील विद्यार्थी आपल्या गुरुजनांपुढें किंवा धर्मालयांतून धार्मिक उत्सवाच्या वेळीं करमणूक करीत ती कला आतां सामान्य जनसंमर्दामध्यें आणि सगळ्या देशभर पसरली. Mysteries & Moralities मधील धार्मिक आणि नैतिक गांभीर्य जाऊन त्याच्या ऐवजीं थट्टामस्करी आणि हास्यविनोदाचे प्रकार होऊं लागले. ललित कलांना आणि अभिनयाला जास्त महत्व आलें. आदितवारचा दिवस जो केवळ ईश्वरसेवेंत घालवावयाचा तो नाटकगृहांत जाऊं लागला. ही स्थिति नाहींशी करण्याकरितां Puritan लोकांनीं पुष्कळ खटपटी केल्या. शेवटीं कायदा करण्या पर्यंत मजल येऊन ठेपली, आणि सरकारी परवान्या वाचून नाटकगृहें बांधूं नयेत आणि खेळ करूं नयेत असें ठरलें. पहिलें नाटकगृह १५७४ मध्यें James Burbage यानें Black Friars ह्या भागांत बांधिलें; १५७८ पर्यंत ८ नाटकगृहें एकट्या लंडन मध्यें झालीं; १६०० पर्यंत ११ झालीं; आणि जेम्स राजा गादीवर बसला त्यावेळीं म्हणजे १६०३ मध्यें १७ होतीं; इतकीं नाटकगृहें आज मितीस लंडन शहर इतकें वाढलें आहे, तरी देखील नाहीत, ह्यावरून ह्या कलेला त्या वेळेस किती महत्व आलें होतें हें समजेल.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य २ शके १८२५

# इजिप्शिअन कपाशीची लागवड

नंबर २

इजिप्शिअन कापसाची लागवड करण्या आला होता, परंतु त्यावेळीं खरीपाच्या पेन्या प्रमाणें सदहू कापसाची लागवड करण्याचा प्रयत्न केल्यामुळें तो निष्फळ झाला असें मि० टाटा ह्यांनी मत असल्याबद्दल आम्ही पूर्वीच कळविलें आहे. सिंध प्रांतांत सिंधु नदीचे कालवे इजिप्त देशांतील नाईल नदीच्या कालव्या प्रमाणें असल्यामुळें, त्या कालव्या पासून सदहू कापसाच्या लागवडीस बरीच मदत होण्याचा संभव आहे म्हणून ह्या कापसाची लागवड सरकारानें ह्या प्रांतांत करून पहावी असें मे. टाटा ह्यांचें मत आहे, व इतर प्रांतांतून रब्बीच्या पेन्या प्रमाणें त्याची लागवड करण्याचा प्रयत्न ह्या पूर्वी केला नसल्यास तोही करून पहावा. व असा प्रयत्न पूर्वी केला असल्यास त्याला यश किंवा अपयश आलें ह्या संबंधाचा खुलासा कोणी देशभक्त करितील तर आपणावर फार उपकार होतील असें मि० टाटा ह्यांचें म्हणणे आहे. सारांश मि० टाटा ह्यांनी सुचविल्या प्रमाणें ज्यांना ऐपत असेल त्यांनीं सदहू कापसाची लागवड करण्याचा जरूर प्रयत्न करावा, व केलेल्या प्रयत्नास कितपत यश येतें ह्याबद्दल आमच्याकडे माहिती पाठविल्यास तिज पासून मि० टाटा ह्यांस बराच उपयोग होणार आहे.

इजिप्त देशांत बसिअन प्रकारच्या कापसाची लागवड करतांना खालीं लिहिलेल्या गोष्टीकडे विशेष नजर पोहोंचविण्याची वहिवाट आहे.—

१ ह्या कापसाचा पेरा मार्च महिन्याच्या १ ल्या तारखे पासून ३१ तारखे पर्यंत करण्यांत यावा.

२ कपाशी पेरण्या पूर्वी दहा दहा दिवसांच्या अंतरानें जमीन तीन वेळा नांगरून काढावी. असें केल्यानें जमिनीस नवा वाराचा लाभ होतो. व नंतर सदहू जमिनींत तास पाडावे. प्रत्येक तास १० इंच रुंद असून तितकाच खोल असावा व दर ताला मध्यें १ यार्ड अंतर असावें.

३ नंतर पेरणीच्या वेळीं, एकेक फुटाच्या अंतरानें कपाशीचें बीं पेरण्यांत यावें. पेरणी करितांना प्रत्येक ठिकाणीं दहा दहा सरकीच्या बिया पेरण्यांत याव्या, व पुढें त्या रुजून रोपें ४।६ इंच उंच झाल्या नंतर मातील चांगलीं वाढलेलीं अशीं फक्त दोन रोपें ठेवून बाकीचीं उपटून टाकावीं.

४ बीं पेरल्या पासून पीक पदरात पडे पर्यंत खालीं लिहिल्या प्रमाणें वेळोवेळीं सदहू पिकास पाणी देण्याची व्यवस्था ठेवावी:-

(१) बी पेरल्या बरोबर,

(२) पुढें १०।१६ दिवसांनीं म्हणजे बीं रुजून वर आल्यावर,

(३) पुढें १६।२० दिवसांनीं दवऱ्याच्या योगानें कपाशीच्या झाडांच्या मुळा भवतील माती मोकळी करावी व नंतर निंदण करावें.

(४) पुढें १० दिवसांनीं पिकास पुनः पाणी यावें व जमीन कोरडी झाली म्हणजे पुनः दवरा करावा, व ह्याच सुमारास (पूर्वीच नांगरण्याचे वेळीं खत घातलें नसल्यास) झाडांच्या मुळाशीं खत घालावें.

पुनः पिकास पाणी द्यावें व ह्या नंतर १०।१६ दिवसांनीं पाणी देण्यांत यावें.

(६) इजिप्त देशांत कापसाचें पहिलें पीक सप्टेंबर महिन्याचे सुमारास पदरांत पडतें त्यानंतर व दुसरें पीक पदरांत येण्यापूर्वी फक्त एक वेळ पाणी देण्यांत यावें.

वर जे नियम दर्शविले आहेत ते सर्वच हिंदुस्थानांत लागू पडतीलच असा संभव नाहीं. पेरणीच्या काला संबंधानें बदल करण्याची सूचना मि० टाटा ह्यांनीं केलीच आहे. ह्याशिवाय ज्यांची जमीन काळी भोर आहे त्यांनीं पावसाळा संपल्या बरोबर बी पेरावें व हिवाळ्यांत पाणी न देतां पीक कसें काय येतें याचा अनुभव घेऊन पहावा असें मि० टाटा ह्यांचें म्हणणें आहे. ह्या शिवाय पाणी देण्या संबंधानें बरोबर जे फेरफार करावयाचे ते ठिकठिकाणचे हवामान व जमिनीची स्थिती ह्यास अनुसरून करण्यांत यावेत ह्या बाबतींत सर्व हवाला आपल्या अनुभविक कुणबी शेतकऱ्यावर सोंपवावा असें मि० टाटा यांनी जे मत प्रदर्शित केलें आहे त्याचा अनुभव त्यांनीं ह्या पूर्वी स्वतः घेऊन पाहिला नाहीं ही गोष्ट खरी आहे तरी हिंदुस्थान देशांतील हवामान व जमिनीची स्थिति हीं प्रांतानिहाय निरनिराळी असल्यामुळें ह्या गोष्टीचा अनुभव घेण्य करितां जितक्या निरनिराळ्या प्रांतांतून प्रयत्न करण्यांत येतील तितकें इष्ट आहे अशा हेतूनें मि० टाटा ह्यांनीं आपलें मत प्रसिद्ध केलें आहे. सबब सदहू बाबतींत सुशिक्षित देशभक्तांनीं प्रयत्न करून आपला अनुभव आम्हांस कळवावा अशी पुनः त्यांस विनंती करून ह्या विषयाचा निरोप घेतों.

---

टाइम्स ऑफ इंडिआ पत्राच्या अलिकडील अंकात खालील आशयाचे विचार प्रसिद्ध झाले आहेत. डच अर्थ शास्त्रवेत्ते डॉ. पिअर्सन ह्यांची "अर्थ शास्त्राचीं मूलतत्त्वें" ह्या ग्रंथाचें भाषांतर इंग्लिश भाषेंत नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे; त्यांत धान्याच्या किंमती व मजूरी ह्यां विषयीं विचार करितांना डॉ. पिअर्सन ह्यांनीं असें मत प्रदर्शित केलें आहे कीं धान्याच्या किंमती बरोबर मजूरी ही चढाओढीनें सहजच वाढत जाते; ह्या करितां मजुरदार लोकांस संप वगैरे करण्याची खटपट करावी लागत नाहीं. डॉ. पिअर्सन ह्यांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ युरोप खंडांतील निरनिराळ्या देशांतुन धान्याच्या किंमती व मजूरी ह्यांचे गेल्या ६० वर्षांतील प्रमाण दाखविणारे आंकडे प्रसिद्ध केले आहेत; परंतु एवढ्या वरून हा सार्वत्रिक नियम नव्हे एवढें सिद्ध करण्या करितां धान्याच्या किंमती व मजूरी ह्या संबंधानें आपल्या देशांत वेळोवेळीं बदलत जाणारें प्रमाण बस आहे. अलिकडे आपल्या देशांत जे नवीन कारखाने सुरू होऊं लागले आहेत त्यांतील मजुरांच्या मजुरीचें प्रमाण कांहीं अंशानें वाढलें आहे ही गोष्ट खरी आहे; परंतु साधारणतः खेड्या पाड्यातुन शेतकीवर उपजीविका करणारे जे लोक आहेत त्यांची मजुरी न वाढतां त्यांना लागणारे जे पदार्थ लागतात त्यांच्या किंमती मात्र पूर्वीच्या मानानें वाढत चाललेल्या आहेत असें आपल्या अनुभ-

पाळ दुसऱ्या प्रांतांत पाठविण्याची सोय झाल्यामुळें भर दुष्काळांत सुद्धां धान्याची टंचाई पडत नाहीं व दोन्ही प्रांतांत धान्याच्या भावांत फारसा फरक रहात नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे परंतु त्याच प्रमाणें ज्या प्रांतांत मजुरी कमी आहे त्या प्रांतांतील मजुरांनां स्वहितार्थ दुसऱ्या प्रांतांत जाण्याची इच्छा होत नसल्यामुळें ते आपल्या पूर्वीच्याच ठिकाणीं आपल्या वडिलांपासून ठरलेल्या मजुरीवर आपला उदरनिर्वाह करण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु इकडे धान्याचे भाव दिवसें दिवस वाढत चालल्यामुळें त्यांची स्थिति जास्त जास्त खालावत चालली आहे.

ह्यावरून एक महत्वाचा मुद्दा विचारी मनुष्याच्या ध्यानांत आल्या वांचून राहणार नाहीं. सध्यांतील शेतकरी स्वहिताकडे दृष्टी न देतां तो नेहमीच्या वहिवाटी प्रमाणें आपल्या हक्काच चिकटून राहातो ह्याचें कारण याचें अज्ञान होय. तें घालविण्या करितां सरकारानें व लोकांनीं प्रथम प्रयत्न केला पाहिजे. परंतु प्राथमिक शिक्षणाचा बोजा अलिकडे सरकारानें डिस्ट्रिक्ट बोर्डस व म्युनिसिपालिट्या ह्या लोकानयुक्त संस्थावर सोंपविला असल्यामुळें यांनीं ह्या उपयुक्त कामीं कंबर बांधणें हें त्यांचे आदि कर्तव्य होय. नवीन पोस्ट आफिसें, व तार ऑफिसें, उभारणें ह्या पासून जरी लोकांस फायदा आहे तरी हीं कामें त्रिपुरूल्या स्थानिक स्वराज्याच्या आटोक्यांतील नसून, सरकारच्या आटोक्यांतील आहेत. शिवाय ह्यां पासून लोकांस पाठ्यांतील लोकांस जो लाभ होणार आहे त्या पेक्षां अगणित लाभ त्यांनां ज्ञानामृत पाजल्यानें होणार आहे. ह्या करितां आमच्या लोकनियुक्त संस्थानीं आपला जितका पैसा ज्ञानवृद्धीकडे देतां येईल, तितका तो देण्या विषयीं तयार असावें अशी आमची त्यांस विनंती आहे.

---

वायव्य कडील प्रांतांत अलिकडे स्थापन झालेल्या काशी येथील शेतकरी लोकांच्या पेढीचा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून सरकारी अधिकारी वकील आणि इतर स्वतंत्र धंद्यांतील लोक यांनां एक नुजीनें शेतकरी लोकांच्या कसें उपयोगी पडता येईल हें कळण्या सारखें आहे. काशी येथील पेढीचे सभासद होण्यापूर्वी प्रत्येक शेतकऱ्यास ४ आणे प्रमाणें फी द्यावी लागते; व ही फीची रक्कम गंगाजळी किंवा रिझर्व फंड म्हणून सांठवून ठेवण्यांत येते व कर्जाऊ रक्कम देण्याकरितां सदहू पेढी दहा रुपयांची एकेक ह्या प्रमाणें कर्जाऊ नोटा (Debentures) काढते ह्या नोटा बहुत करून मध्यम स्थितींतील जमीनदार लोकांमध्यें खपतात. सदहू नोटांवर व्याज दरसाल दर शेकडा ६ रुपये पेढी देते, ह्या प्रमाणें जी रक्कम वसूल होते ती रक्कम पेढीच्या सभासदांना मात्र शेतीच्या कामा करितां पुनः कर्जाऊ देण्यांत येते. ह्या रुपयावर व्याज दर रुपयास दर महिन्यास पाव आणा प्रमाणें घेण्यांत येते. रुपयाच्या फेडी करितां असा-

## जाहिर खबर


### खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भूलून पैसे खर्चू नका.

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणे यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अगदी वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपलीस्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवुन तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखी मदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ....................४०
१९ „ हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारेंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८

१९ „ मध्यमगी सेकंद काटा असलें ................२२
१९ „ हाफ् हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंग ....................२०
१४ „ रिस्ट वॉच ................२०

### इनामेल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस ............२०
१९ „ हंटिंग....................२०
१४ „ रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग....................३५
१८ व १९ „ ओपनफेस ............३०
१९ „ सेकंद काट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीसेकंद कांटा असलेलें ................३५
१९ „ ओपनफेस्सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ................४९

लेडीज वॉचीस १, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० प.

### सी. हिनीग आणि कंपनी.

ओरिजनल निनीयन स्कोप पेटंट वॉचसचे सोल एजंट.

हार्नबी रोड, मुंबई


---


ॐनमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारार त्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व

मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ४६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

**सूचना**——अलीकडे २।३ वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यानीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी


---

## बक्षीस

हरवलेला किंवा चोरीस गेलेला दागीना

( सांपडून देण्यासाठीं )

आमच्या बंगल्यांतून थोडे दिवसापूर्वी एक दागिना हरपला आहे. तो दागिना ह्मणजे सोन्याचा जडावाचा ब्रूच. हा लेडीचा दागिना आहे. यांत फिक्या हिरव्या रंगाचा पारदर्शक नीलमणी आठ आणी एवढा पण चौकोनी असा बसविला आहे. हें रत्न विलायती असून दागिन्याची किंमत १०० रुपये अंदाजानें आहे.

दागिन्याची बरोबर माहिती कोणी लावून देईल किंवा कोणी तो आणून देईल तर त्याला चांगलें इनाम आह्मी देऊं आणि हा दागिना कोठून व कसा आणिला या विषयीं कांहींच विचारणा करण्यांत येणार नाहीं असें आह्मी आश्वासन देतों.

आकोला १८।९।०३.

( सही ) बी. क्रे.

असिस्टंट कमिशनर.

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office.—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

---

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कर्मात्तिजक गोळ्या ४२ ची सीसी वं. रु.१॥.

तापावर एग्युर्वस्चर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गनकर्णांचे आणि सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमेरीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजनुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

## जाहिरात

गीताभाष्य. पु तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण्यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांतसंपेल. वर्षाची अ. व ५०६ पहिल्या २० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मासह बक्षिस.

का० वा० लेले वाई

## मुंबई बॅंकर्ची सव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुप या प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी युउपक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. रा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी. नें मागवा.

पत्ता–संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज,
० कोल्हापूर

## दन्तकुसुमाकर

खालीं हिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाढ्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीका दातो मे दिखाते है हम।
चोट डंके वहरेक मर्ज उडावे हम॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडें होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट वें सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस
आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

पाहिजे. ज्या इसमांनीं कर्जा करितां मागणी केली असेल, त्यां पैकीं किती जणांस व किती कर्ज देणें वाजवी होईल व त्याप्रमाणे त्यांच्या करितां जामीन होऊं इच्छिणार इसम लायक आहेत किंवा नाहींत हें ठरविण्याचें काम त्या गांवच्या किंवा जवळपास च्या चार सभासदांच्या कमिटीकडे सोंपविलें असतें. ह्या पद्धतीनें ज्या इसमांनीं पेढी च्या नोटा खरेदी केल्या असतात, त पेढीच्या कल्याणा करितां अनायावेच प्रयत्न करितात; व क्वचित् प्रसंगीं ते एखाद्या कुळा करितां जामीनही राहतात. कुळास रक्कम कर्जाऊ देतानां तो प्रामाणिक आहे किंवा नाहीं ह्या संबंधानें त्याचे शेजारी पाजारी व त्याचे वकील ह्यांच्या मतास सहजच मान देण्यांत येतो; कारण शेजाऱ्यांच्या अनुकूळ मता पेक्षां कोणतीही चांगली हमी अमामीनें देणें शक्य नाहीं. ही पेढी प्रथमतः स्थापन करण्यांत आली त्यावेळीं पेढीचें काम चांगलें चालणार नाहीं अशी भीति पुष्कळांस वाटत होती. परंतु सदर्हू पेढीचा पहिला वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून ह्या पेढीचें काम चांगलें समाधानक रीतीनें चाललें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या येथें इंडस्ट्रिअल असोसिएशनच्या आश्रया खालीं अशाच तऱ्हेच्या पेढ्या जिल्ह्यानिहाय स्थापन करण्याची खटपट सुरू आहे; त्यांनीं काशा पेढीचे नियम आणविल्यास त्यापासून त्यांना बराच फायदा होण्याचा संभव आहे.

---

## नंदनवन

सिव्हील स्टेशन म्हणजे आमच्या मुन्सिपालिटीचा इंद्रलोक होय. या प्राच्य मागाचे इंद्र एकदां इतके असंतुष्ट झाले कीं त्यांस गाड्या बैलांचा देखील आवाज सहा होईना. पुढें असें वाटलें कीं प्लेगाच्या दिवसांत त्यांच्या नंदनवनाच्या पूर्वेला कांहीं झोपड्या दिसूं लागल्या. इंद्राच्या दृष्टीला ही भूलोकची वस्ती अर्थात् आवडली नाहीं. नंदनवनाची शोभा वाढविण्या साठीं सुमारें ४० एकर जमीन उमरीच्या जंगलांतील द्यावी असा आमच्या नागरिक देवांचा संकेत ठरला आणि त्या संकेताला अनुरूप असा ठराव अलिशान नामदार रेसिडेंटांनीं आपल्या जाहिर हुकूमानें प्रसिद्ध केला आहे.

सत्ता ही अजब शक्ति आहे, एका मर्दाच्या परवानगीनें ज्या झोंपड्या उभारण्यांत आल्या त्या आतां सिव्हील स्टेशनच्या रमणीयतेसाठीं काढण्यांत येत आहेत. झोंपड्या असलेलीं दोन्ही शेतें सरकारानीं आपल्याकडे कुळाकडून परत घेतलीं आहेत. प्लेगाच्या दिवसांत नंदनवनाच्या एक मैल परिघाच्या आसमंतांत देखील झोंपड्या असतां कामा नयेत असा येथील सरकारी धन्वन्तरीचा अभिप्राय पडला. लागलीच ही गोष्ट करण्यासाठीं प्रांतिक महाविष्णूनीं आपल्या १८९४ च्या १ ले आक्टोबरचें सुदर्शनचक्र हैदराबादेहून सोडून दिलें. असो; या रीतीनें सत्ताश्री विजयी झाली ही मोठी आनंदाची गोष्ट होय!

---

The Berar Samachar

MONDAY AUGUST 10 1903

We are concerned to learn that plague has broken out at Basim which had remained unaffected so long. Every one will therefore naturally be anxious to see what policy is going to be followed by the Local authorities, in stamping it out. Looking at the history of the plague policy of Government in the neighbouring Presidency during the last seven years one cannot but see the different lines taken up by the Government from time to time. During the first four years *i. e.* from 1896 to 1900 the Bombay Government as advised by their medical advisers vigorously followed a policy of coercion. But to their surprise they found that their policy did not prove effective in the end, to say nothing of the fact that it was not favourably received by the general public for whose welfare, it was intended. The Plague Commission which was appointed at the close of this period to investigate into the then plague policy, threw cold water over the policy and recommended in its stead, a policy of partial coercion—which has been followed in all the parts of the country during the last three years. The change in the policy has no doubt pacified the public mind to a certain extent. But the measures which the Government have been still adopting for stamping out the plague, have attained but little success because during the last year it spread to various parts of the country which it had not reached before, and worked a havoc not equalled in any of the past seven years. Under these circumstances the Bombay Corporation and other Municipalities in that Presidency which have spent vast sums of money on these measures during the past seven years, in the hope of stamping it out, have naturally begun to grow suspicions about the wisdom in continuing the policy. At such a moment, the words of Dr. Turner, who is the Chief Medical adviser of the Bombay corporation and who can therefore be safely relied upon as regards medical opinion, on the subject, says that disinfection has proved an *absolute* failure in stamping out plague in Bombay because the houses, which were disinfected from year to year, have been again affected every year, with plague. Under these circumstances, he is of opinion that steps should better be taken for improving the general sanitation of Bombay. "Red Cap" who contributed thirteen articles on Common Sense Plague policy, which have recently appeared in the Pioneer, also advocates a change in the policy, though on a different ground. He thinks that the policy of coercion to whatever extent coercion may be followed, is viewed with suspicion by the general public who conceal plague cases and cause plague to spread. He thinks that the general public should be allowed absolute liberty as regards the measures to be undertaken for stamping out plague. But he insists upon government the duty of educating the public minds, by *persuasion*. Education this imparted combined with self interest, will, in his opinion, lead the public to adopt the necessary measures in course of time. Accepting either of the views suggested above, our local authorities will, it is hoped, think well before they advise the Municipalities and the District Boards in the Province, to follow the policy which is disliked by the people and which, according to the best medical opinion available at present, is attended with but little success. The money and the energy thus saved, will be better utilised in improving the sanitation in villages and towns.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पाऊस उघडल्यामुळें पिकें चांगलीं जोमदार आहेत. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक असावयाला पाहिजे होतें पण वाशिमास प्लेग उद्भवून चार पांच माणसें मृत झाल्याची वार्ता आली आहे. प्लेगाची आपदा ईश्वरानेंच दूर करावी.

यवतमाळचे ए० अ० कमिशनर राय बहादूर नवगोपाळ सरकार यांस १ ले वर्ग माजिस्ट्रेटाचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. मल्लप्पा रामप्पा आक्टिंग एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर यांनी हिंदुस्थानी भाषेची लोअर स्टॅंडर्डची परिक्षा पास झाली.

रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनी कर्मयोगावर चांगलें सरस व्याख्यान दिलें विषयाची मांडणी चांगली सुगम केली होती.

वऱ्हाड मल्ल-समाजाचा वार्षिक रिपोर्ट रा. रा. रामचंद्र सदाशिव ढेके यांनीं प्रसिद्ध केला आहे त्यावरून समाजाची जमा ११८३ रुपये १५ आणे ६ पै आहे. चालू सालची वर्गणी पाठविण्या विषयीं विनंती केलेली आहे.

चालू सालचें विद्यार्थ्यांचें परिषद् येत्या डिसेंबरच्या २ रे तारखेला उमरावतीस भरणार आहे.

रा० रा० व्यंकटराव रंगराव देशपांडे इन्स्पेक्टर, नोंदणी खातें हे नऊ महिन्या या रजेवर जाणार असून त्यांच्या जागीं रा. रा. आप्पाजी बळवंत सब रजिस्ट्रार, उमरावती यास बढती देणार आहेत.

मि० ग्रेसी साहेब यांस एलिचपुरास एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमल्यामुळें त्यांच्या पोलिस इनस्पेक्टरच्या जागीं मि० सूर्ती यांस नेमण्यांत आलें.

तारीख १६ सप्टेंबर पासून उमरावतीला लोअर हायरच्या परिक्षा सुरू होतील

तारीख ३ सप्टेंबर पासून उमरावतीस वकिलीची परीक्षा सुरू होईल. यंदा या परिक्षेला ३५ उमेदवार आहेत.

रा० रा० गणेश बापूजी उटगीकर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यानीं आपली रजा आणखी सहा महिन्यांनीं वाढविली आहे.

बुलढाण्याच्या डोंगरांत मागील आठवड्यांत एका वाघानें दोन बैलांचा फडशा उडविला. रात्रीं बेरात्रीं जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनीं फार सावधगिरीनें जावें यावें. शिकारी लोक त्याला मारण्याच्या खटपटींत आहेत.

मागल्या मंगळवारीं पटवाऱ्यांच्या परिक्षेस आरंभ होऊन ती गुरुवारीं संपली. एकंदर उमेदवार ३९ होते पैकीं २३ पास झाले.

---

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००८ |
| सोनें | २४॥ | चांदी | ७० |
| ज्वारी | १९।४० | जवस | ९० |
| गहू | | | ८५ ते १०० |
| बाजरी | | | ९९ |
| मीठ | | ३।।।= | रु. मण |
| चणे | | ३८- | रु. मण |
| तूप | | ८ | रु. मण |
| तेल | | ५८= | रु. मण |
| रुई | | | ९० |

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर ७

सन १९०३

नादारी नियमान्वयें नादाराला नादर ठरविण्या विषयीं सावकारास नोटीशीचा नमुना.

जी

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्य साहेब जिल्हा वाशिम यांचे कोर्टांत.

सर्वत्रास नोटीस देण्यांत येते कीं, गुणाजी वल्लद कृष्णाजी गुळबस कुणबी राहणार मसला परगणें रिसोड ता० वाशीम हा नादार आहे असा आज ता० २३ माहे जुलई सन १९०३ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख २६ माहे सप्टेंबर सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारानीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीदारास समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदाराचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या याद्दो उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यानीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यांजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यानीं आठ आण्याचें स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ करावी. आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी. म्हणजे दावा रजिस्टरांत दाखल होईल. कळावें तारीख ६ माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

शिक्का

S. H. King
नादारी कोर्टाचे जज्य
जिल्हे वाशीम

---

## वर्तमानसार

आपले बादशहा यांनीं इंग्लंडच्या गरीब लोकांकरितां १०००० पौंड दिले.

धारवाड जिल्ह्यांतील पांचसहांशें एकर जमीन खालसा होणार अशरयाचें चिन्ह दिसतें.

श्रीमंत गायकवाड सरकार यांनीं मद्रास प्रदर्शनास ५०० रुपये दिलें.

लॉर्ड रोजबरीनीं सुचविल्याप्रमाणें लंडन येथें मोठें टेक्निकल स्कूल स्थापन होऊन त्या साठीं पांच लक्ष पौंडाची रक्कम वर्गणीनें जमली ह्मणजे लंडनचे कांउटीकाउन्सिल सुद्धां २० हजार पौंड देणार आहे.

मेल्बोर्न येथील डा० मॅकार्थी नांवाचा शास्त्रज्ञ आकाशांत ग्यासचा सारखा प्रवाह सोडून त्या योगानें मुसळधार पाऊस पाडतो, असें ह्मणतात! आजपर्यंत अशा प्रकारचे ५३ प्रयोग केले असून त्यांपैकीं ४७ मध्यें त्यास यश आलें. न्यूसाउथ वेल्समध्यें पाऊस पाडण्या साठीं त्यास पाचारण झालें आहे.

ब्रह्मदेशांत नुकताच इंग्रजी अंमल सुरू झाला. पण तितक्या अवधींत तेथील उद्योगधंदे संपुष्टांत यावयास लागले आहेत. तेथें एका चिनी मनुष्यानें चालविलेल्या कांचेच्या कारखान्याची विदेशी मालाच्या स्पर्धेमुळें समाप्ति झाली. तेथल्या रेशमाच्या कारखान्यांचीही हीच अवस्था झाली या रेशमाच्या कारखान्यावर हजारों स्त्रियांचा चरितार्थ चालत असे. परदेशी मालाच्या स्पर्धेत देशी उद्योगधंद्याची आहुती पडून देशांतला पैसा परदेशांत जावयास लागला ह्मणजे सुकाळ काय तो दुष्काळांचा हें सांगावयास नकोच.

धर्मश्रद्धेबद्दल प्रायश्चित—गेल्या महिन्याच्या १२ व्या तारखेस एका मुसलमानी टोळीची गोमांस असलेल्या तीन गाड्या नेण्यावर नेमणूक झाली. त्यांनीं नेमलेल्या स्थळापर्यंत गाड्या पोहोंचविल्यावर पुरुषोत्तमसिंग नांवाच्या रजपुत ब्राह्मणावर तें काम सोंपविण्यांत आलें. हा ब्राह्मण सैन्यांतील एका टोळीचा डफेदार होता. गाडींत गोमांस आहे हें कळतांच ब्राह्मणानें तें काम करण्यास आपली साफ नाखुषी दर्शविली. लष्करी नियमाप्रमाणें त्यानें हा हुकूम निमुटपणें पाळावयास पाहिजे होती, परंतु त्याचे धर्माचे आड ही गोष्ट आल्यामुळें त्यानें आपला वरिष्ठ मेजर महताबसिंग यास कळविली. त्यानें ही गोष्ट सार्जंट यास कळविली; या गाड्या ब्राह्मणानींच नेल्या पाहिजेत असा सार्जंट साहेबांनीं हुकूम फर्माविला. आपण व आपले अनुयायी ब्राह्मण असल्यामुळें आपणास व त्यास ही गोष्ट करितां येणार नाहीं असें पुरुषोत्तमानें नम्रपणानें सार्जंटसाहेबांच्या कानावर घातलें. नंतर सार्जंट साहेबांनीं ह्या गोष्टीचा रिपोर्ट मुख्य अधिकाऱ्याकडे कळविला. मुख्य अधिकाऱ्यांनीं सदर इसमास दुसरे दिवशीं सकाळीं आपल्या पुढें हजर राहण्यास सांगितलें. हुकुमाप्रमाणें हे इसम हजर झाले; व त्या गाड्याही तेथेंच आणून सोडल्या होत्या. तुझ्या हाताखालील लोक हें काम

फेंकण्यानंतर ' दुसरें कोणतेंहा काम आह्मी करूं. परंतु हें काम मात्र आमच्यानें कधींही होणार नाहीं ' असें आपल्या हाताखालच्या लोकांचें उत्तर मेजर साहेबांनीं अधिकाऱ्यांस कळविलें. अधिकाऱ्यांनीं निरनिराळ्या माणसांच्या जवळच्या घेतल्या त्यांतही हेंच निष्पन्न झालें. अधिकारी बहादरांनीं यावर जें तर्कशास्त्र लढविलें तें फारच वर्णनीय आहे. ' कच्च्या मासास धर्मांत प्रतिबंध असेल. पक्क्या मांसास तसा प्रतिबंध नाहीं. कारण, परवां नुकतेंच एका गृहस्थानें मला कातड्यानें बांधलेलें एक पुस्तक आणून दिलें ! ! या ' कोटिक्रमानें बिचाऱ्या मेजराची खात्री न झाल्यामुळें त्यानें हे काम आपणास व आपल्या लोकांस सांगू नये अशीच वरील अधिकाऱ्यास विनंती केली. परंतु, तिचा कांहीं उपयोग न होऊन पुरुषोत्तमसिंगास बडतर्फ करण्यांत आलें ! न्यायी सरकारच्या राज्यांत धर्मश्रद्धेबद्दल हें बक्षिस !

दुसरी एक गोष्ट याहीपेक्षां चमत्कारिक आहे गेल्या २४ व्या तारखेस एका साहेबांनीं भोजनोत्तर टेबलावरचें उष्टें काढण्यास एका ब्राह्मण नोकरास सांगितलें. हें काम करण्यास माझी स्वतःची हरकत नाहीं परंतु माझ्या जातीच्या लोकांस हें रुचणार नाहीं असें या नोकरानें साहेबांस सांगितलें. साहेबांनीं आपल्या वरिष्ठांस ही गोष्ट कळविली. अशा तऱ्हेचा प्रसंग आल्यास तुह्मी स्वतः काय कराल असा प्रश्न यांनीं आपल्या हातां खालील लोकांस व्यक्तिशः विचारला. ही गोष्ट आपणास कधींही आवडणार नाहीं असें उत्तर डफेदार केरसिंग यानें दिलें असावें, कारण पुढें त्यास लवकर नोकरीस मुकावें लागले! उच्च वर्णाच्या लोकांना लष्करी नोकरींतून अर्धचंद्र देण्याची तर ही युक्ति नसेलना?

बंकीपूर येथें श्रावण मासांत " शंबरी मेळा " नावाची भरत असलेली तीस हजार लोकांची यात्रा यंदा तेथील डिस्ट्रिक्ट जज्ज मि. होलवड यांनीं एकदम बंद केली! यात्रेच्या गलग्यामुळें साहेबाच्या गाडीचा घोडा बुजाला व कोचमनाला बरीच दुखापत झाली ह्मणून त्याचें प्रायश्चित्त यात्रेकरूस देणें योग्य नाहीं.

रशियातील मजुरांनीं एकाएकीं काम बंद पाडलें व दंगयास सुरवात केली. त्याच्या बंदोबस्तासाठीं सैन्य पाठवावें लागलें असें ता. ३० ची तार सांगते.

मुंबईस जान हिल नावाच्या सोल्जरानें २९ रुपये किंमतीचा हीअर आणि कंपनीचा माल चोरल्यामुळें त्याला मि० वर्झनदास छावलदास यांनीं एक महिन्याची सक्त कैदेची सजा दिली.

दरबान येथें प्रसिद्ध होणाऱ्या " इंडियन ओपिनियन " वरून असें दिसतें कीं बोअर लोकाचें स्वतंत्र राज्य होतें तेव्हां त्याच्या अमलाखालीं इंडियनाची जी स्थिती होती त्या पेक्षां ब्रिटिशसत्तेखालीं फारच वाईट झालेली आहे. बोअर लढाईच्या अगोदर त्यांना पुष्कळच सवलती असत परंतु आतां त्या सर्व नाहींशा झाल्या!

दुष्काळाचें भविष्य करणारें पाऊसाची

बोनली येथील राजा परमानंदसिंग यास ५००० रुपयाबद्दल फसविल्या वरून मि० रघुनाथ मिसर व मि. अनुरुद्ध यांजवर कलकत्यास खटला चालू आहे.

श्री० शिंदे सरकार सिमल्यास नुकतेच गेले आहेत. ही बातमी देतांना कांहीं हिंदी पत्रें ह्मणतात; संस्थानिक व लार्ड कर्झन यांचें नांव एकदम ऐकिलें कीं भीति उत्पन्न होते ! ग्वाल्हेरचें संस्थान कौलपत्र्यानें न घेतोत ह्मणजे झालें.

गेल्या वर्षीं एक लाख टन हाडें परदेशांत गेलीं. तितकीं किंवा त्यांपैकीं अर्धींमुर्धीं अह्मी आमच्या इकडे ठेवून यांचें खत बनविलें असतें, तर पुष्कळ उपयोग झाला असतां ! तसेंच गतसालीं एक कोटी रुपयांचें सरकी परदेशांत गेली तिचा उपयोग तेल काढण्याकडे वगैरे जसा तिकडे करण्यांत येतो तसा इकडे करण्यांत आल्यास, केवढा तरी नफा होण्याचा संभव आहे !

वि. वि.

अडचणीचे प्रसंग हा वैभवाचा पाया होय, या कसोटीला जो उतरेल तोच हिरा होय. याला भिऊन जो खचेल तो ठार बुडून सर्वस्वाला मुकेल. मरण हें जरी वाईट आहे, तरी तें सज्जनांना चांगलें आहे. कारण तें उच्च पुनर्जन्माचें द्वार आहे. तशीच अडचणीच्या प्रसंगाची गोष्ट समजावी.

आ० व०

कीर्तन—प्रो. चितामण गंगाधर भानु यांचे शेणव्याच्या ठाकूरद्वारीं शनिवारीं सुश्राव्य कीर्तन झालें.

एक पंथसे दो काम—उन्हाळ्या दिवसांत शाळेच्या मुलांना सुटीच्या ऐवजीं बागाईतीचें काम शिकवावें असा अमेरिकन लोकांनीं विचार चालविला आहे.

लढाईच्या बातमीदारासाठीं ठराव—लढाईवर जाणाऱ्या सैन्याबरोबर वर्तमानपत्राचे बातमीदार जातात त्याच्या अन्नवस्त्राबद्दल व कपडे वगैरेबद्दल रोख आकार घेण्यांत येत असे. परंतु यापुढें वर्तमानपत्रांचे जे बतमीदार लढाईवर जातील त्यांच्या खर्चाबद्दल त्या पत्राच्या मालकांनीं आगाऊ रुपये १००० अनामत ठेवावे व पुढें दरमहा महिन्यांनीं रकम ठेवावी. त्याचप्रमाणें या अनामत रकमेच्या वर जो खर्च होईल तो हिशेबाप्रमाणें त्यांनीं भरण्याची हमी द्यावी असें ठरविण्यांत आलें आहे.

बनारस येथें तांबोळी लोकांनीं वेश्यांस विड्याचीं पानें विकावयाचीं नाहींत असा नियम केला आहे.

आपल्या देशांतून कच्चा माल परदेशीं किती जातो व त्याचा पक्का माल बनून कसा येतो, हें दाखविण्यासाठीं नुसत्या अंबाडीचा निकास गेल्या ६ वर्षांत किती झाला त्याबद्दलचे आंकडे खालीं देतों.

१८९७-९८ ........ ४१९२७६३ ,,
१८९८-९९ ........ २७२६६३३ ,,
१८९९-१९०० ........ २९९०३०४ ,,
१९००-१९०१ ........ ३६१४९३२ ,,
१९०१-१९०२ ........ ४२६३९७० ,,
१९०२-१९०३ ........ ३२९४११४ ,,

या आंकड्यावरून यःकश्चित आंबाडी

त्यापासून किफायत करून घेण्याचें सामर्थ्य आमच्यांत कसें उरलें नाहीं तें स्पष्ट दिसतें.

चिनई राजपुत्र चिंग यानें अमेरिकन मिनिस्टरास असें कळविलें आहे कीं मांचुरियांतील शहरें परराष्ट्रांस मोकळी ठेवण्यांत येणार नाहींत.

मुंबईंत रा० रा० बाळकृष्ण महादेव तांबट नांवाच्या गृहस्थांनीं थोड्या सर्पणांत जलद पाणी तापण्याचें चंब काढले आहेत हे गृहस्थ मॅट्रिक पास असून मुंबईतील उद्योगशाळेंत यांनीं अभ्यास केला आहे. सोलापुरच्या शिवाजी मेटल वर्क्स मधील बंबापेक्षां यांत काय सुधारणा यांनीं केली आहे तें समजत नाहीं. अशा कल्पक गृहस्थास उत्तेजन मिळणें अगत्याचें आहे.

नागपूरचे प्रसिद्ध कंट्राक्टर रा० सा० राजाराम सिताराम दीक्षित यांचे चिरंजीव मोरेश्वर राजाराम दीक्षित हे विलायतेस बारिस्टरची परीक्षा पास झाले. नामदार हरी सिताराम दीक्षित यांचे हे पुतणे होत.

दक्षिण आफ्रिकेंत राहिलेल्या हिंदू लोकांनीं तेथें एक शिवालय बांधिलें असून त्याची अर्चा वगैरे नुकतीच करण्यांत आली.

अमेरिकेच्या येल युनिव्हर्सिटीच्या कायद्याच्या परीक्षेत चेंग हिन वंग नामक चिनई विद्यार्थी आणि जॉर्ज वूड्सन क फर्ड नांवाच एक सिद्दी हे पास झाले आहेत. शिवाय या सिद्दयास वक्तृत्वाबद्दलचे सन्मानही मिळाले आहेत.

ज्ञा. पं.

गेल्या दुष्काळांत मुंबई इलाख्यांत तांबे व पितळ भांड्याच्या रूपांत सन १८९९-१९०० सालांत गुजराथ व दक्षिण प्रांत मिळून ७४००० मण विकले गेले. याची किंमत सरासरीनें ४० लाखांवर होईल. बायकांनीं गळ्यांतली मंगळसूत्रें विकूनसुद्धां पोटाची खळी भरली व बारा वाजण्याची वेळ मागविण्याकरितां कित्येकांनीं पोटचीं पोरें सुद्धां विकलीं.

पुरुषापेक्षां बायकांची संख्या विलायतेंत १० लाखांनीं जास्त आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं विलायतेंत बऱ्याच बायका अविवाहित राहिल्या आहेत. कारण इतक्या बायकांना पति मिळणें अशक्य आहे.

इं. प.

अमृतबझार पत्रिकेचा बातमीदार लिहितो कीं, लॉर्ड किचनेर हिंदुस्थानचे सेनाधिपति हे काश्मीर व गिलजित प्रांतांत फेरफटका करून आले. आतां ते इतर प्रदेश ( श्रीनगर चित्रळ हुंजा वगैरे ) पहाण्यास जाणार आहेत. काश्मीर प्रांतांतून इंग्रज आगगाडीचा रस्ता बांधणार आहेत असें समजतें. पुढें महाराजांचें मन वळवून तेथें युरोपियन सैन्यासाठीं छावण्या ही बांधण्यांत येणार आहेत. ता० २२ च्या अंकांत 'पत्रिके'नें काश्मीर प्रांत सरकार घेणार ही बातमी खोटी आहे असें प्रसिद्ध केलें आहे. रेव्हेन्यूबद्दल व शिकारीसाठींच; फक्त व्हाइसराय तिकडे जाणार आहेत असें ह्मणतात.'

स. वि.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास........................८२

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत ८० १

दर ओळीस........८१८९

दुसरे खेपेस........८१

REGISTERED N. No. 4

Mofussil ... ... ... 2 ( with postage

All Subscriptions to be paid in advance,

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......2 as

Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 17 AUGUST 1903 NO 32

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १७ माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३२

छापत आहे!

## लवकरच प्रसिद्ध होणार!

सरस्वतीप्रकाशमाला

किरण दुसरें!

रा० रा० रामचंद्र यशवंत केसकर

( राणी संयोगिता नाटकाचे कर्ते ) कृत.

## प्रतापशाली प्रतापसिंह

एक वीररस परिप्लुत पंचांकी नाटक.

वरील नाटकाचें कथानक चटकदार व संस्मरणीय असून यांत वीररस प्रधान आहे. केवळ दुःख रस अथवा वीर रसच परिप्लुत नाटक किमेक कोमल अंतःकरणाच्या वाचकांना आणि प्रेक्षकांना सर्वतोपरि रुचत नाहीं असा अनुभव आल्यावरून या नाटकांत कांहीं ठिकाणीं हास्य व श्रृंगार या दोन्हीं रसांना जागा दिली आहे.

फक्त तारीख १५ सप्टेंबर पूर्वी नांवें रजिष्टर करणारांसच किंमत ८ आणे. पुढें १२ आणे.

K. D. CHAUHAN
संपादक सरस्वती प्रकाश
उमरावती.

## नोटीस

बेशमी सोनाई मर्द मदनलाल अगरवाले राहणार बाळापूर हल्ली वस्ती ( आठवडा बाजारा जवळील जलालपुऱ्यांत ) खाम. िव. यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा नवरा मदनलाल वल्लद चुनीलाल अगरवाला दुकान बाळापूर यानें तारीख २९।६।९३ रोजीं मजा जुगलकेडें येथील सर्व्हे नंबर ३६,३७ व ३८ यांतील ½ हिस्सा २५० रुपयांस विकला. सदर्हू २५० रुपया पैकीं मी १२५ रुपये रोख त्याच दिवशीं दिले आणि तिन्ही शेतें ताब्यांत घेतली व बाकी राहिलेले रुपये १२५ मजकडे व्याजी कर्ज म्हणून राहिले. त्या रुपयांची फेड व्याजासुद्धां मी सन १८९८ पर्यंत करून टाकली. आतां त्या तिन्ही शेताबद्दल कांहीं देणें राहिलें नाहीं. परंतु तुमच्या नवऱ्यांनीं कबूल केल्या प्रमाणें खरिदीखत होणें राहिलें आहे. गेल्या प्लेगाच्या धडाक्यांत राजश्री मदनलाल मरण पावल्यामुळें आतां तुम्हाकडे खरेदीखताची मागणी करावी लागत आहे. तर मेहरबानीनें तुम्ही आपल्या दुकानची माहिती घेऊन व पक्की खात्री करून घेऊन नंतर आम्हास खरिदखत लिहून नोंदून द्यावें. असें करण्यासाठीं पंधरा दिवसांची मुदत तुम्हाला दिली आहे, सदर्हू मुदतींत ही गोष्ट होणार नाहीं तर निरुपायानें कोर्टांत फिर्याद करून योग्य ती दाद या नोटिशीच्या खर्चासुद्धां मागावी लागेल. कळावें ता. ९।८।०३ इ०

सही.

शेखलाल वा. शेखइमाम राहणार
सोनगिरी तालुका बाळापूर
निशाणी खुद्द.

## शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

( रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळेले बी. ए. यांनीं लिहिलेला निबंध. )

नंबर ५

त्यावेळेस ही कला किती बोकाळली होती हें समजण्याला आणखी एक पुरावा सांपडला आहे. फिलीप हन्सलो ह्या नावाचा एक गृहस्थ चिजवस्त गहाण ठेऊन नाटक मंडळ्यांना व नाटककारांना पैसे देत असे. त्याची रोजनिशी सापडली आहे. ती वरून असें समजतें कीं १५९१–९७ पर्यंत ज्या मंडळीशीं याचा व्यवहार असे त्या मंडळी मध्येच निरनिराळीं ११० नाटकें तयार झालीं. पुढें १५९७–१६०३ पर्यंत १६० झालीं. आणि पुढें ३० निरनिराळे ग्रंथकार दरमहा देऊन नाटकें लिहिण्या करितां यानें चाकरीस ठेविले होते. त्यापैकीं Thomas Hagwood या नांवाच्या एका गृहस्थानें तर एकट्यानेंच २२० नाटकें लिहिलीं. यावेळीं नाटकें छापविण्याची जरूर वाटली नाहीं. परंतु पुढें शेक्सपीअर आणि बेन् जान्सन् यांचा उदय झाल्यावर, त्यांनीं आपलीं नाटकें छापविलीं. आणि नंतर लोकांस नाटकें वाचण्याची गोडी लागू लागली. पुष्कळ नवीन ग्रंथकार निपजले आणि भाषेला नवीन गोडी आणि मार्दव आलें. शेक्सपीअर लंडन येथें आल्यावर प्रथम ज्या मंडळींत शिरला ती फार नामांकित होती. ती मंडळी Lord Chamberlaine, Earl of Leicester यांच्या आश्रयानें होती. यांसच राणीचे नट Queen's players असें ही म्हणत. ही मंडळी ब्लॅकफ्रायर्सच्या नाटक गृहांत आपले खेळ करीत असे ह्याची लवकरच भरभराट झाली व याच मंडळीनें १५९४ मध्यें Globe नाटक गृह बांधिलें. त्यावेळीं स्त्रिया नटीचें काम करीत यावरून नटांचें खरें कसब पाहण्यांतच लोकांना सार्थक वाटत असे आणि नाटकापासून अनीतीची वृद्धि होत नसे. ही महत्वाची गोष्ट लक्ष्यांत धरली पाहिजे. हल्लीं इंग्लंड मध्यें नटीच्या पात्राच्या कामापेक्षां नटीकडेच लोकांचें लक्ष असतें, आणि यामुळें अनीतीचे प्रकार पुष्कळ होतात. १६२९ मध्यें पहिल्यानें स्त्रिया नाटकांत कामें करूं लागल्या. शेक्सपीअरचीं नाटकें Elizabeth & James राणीला व राजाला फार आवडत असत बेन जान्सन शेक्सपीअरच्या मृत्यु लेखांत म्हणतो:–

That so did take Eliza four James.

नटविद्या किंवा अभिनय शास्त्र ह्याची स्थिति शेक्सपीअरच्या पूर्वी फारच वाईट होती. त्यावेळचे नट म्हणजे यजमानाची खुषमस्करी करून पोट भरणारे असल्यामुळें यजमानाला जें आवडेल तें करून आपलें काम पार पाडीत. त्यांच्या कामांत हास्य रसोत्पादक चेष्टा फार असत. एकंदर जनसमाजाची आवडही तशीच बनली होती. ती शेक्सपीअरनें कशी बदलली हें त्याच्या नाट्यकलेची त्यानें वृद्धी कशी केली हें पाहिलें म्हणजे समजेल.

शेक्सपीअरनें स्वतः नटाचें काम करून अभिनयशास्त्र शिकविलें. शेक्सपीअरनें नटविद्या ह्या शास्त्रावर कांहीं ग्रंथ लिहिला नाहीं. तरी त्या शास्त्राच्या महत्व संबंधानें त्याच्या नाटकांतून उल्लेख सांपडतात. त्याच्या Hamlet नाटकांत तिसऱ्या अंकांतील २ ऱ्या प्रवेशांत नाटक मंडळींतील पात्रांनीं आपलीं कामें कशीं करावीं ह्याबद्दलच्या सूचना कोणत्याही नाटककारास ग्रहण करण्या योग्य आहेत. त्यानें सरासरी ५० ओळींत नटविद्येची आणि अभिनय कलेची गुरूकिल्लीच देऊन ठेविली आहे. शेक्सपीअरनें स्वतः नटाचें काम १६०३ पर्यंत केलें, आणि पुढें सोडून दिलें. त्यावेळीं नटाचें काम करणें हा एक प्रकारचा कमीपणा असे. त्याला पैसे चांगले मिळाले व सामाजिक मोठेपणा मिळविण्याची त्याला इच्छा होती. व शिवाय नटक्रियेची त्याला फार हौस होती असें ही दिसत नाहीं. नटविद्या ही नाट्यकलेच्या अनुषंगानें असल्यामुळें, व त्याला लोकांची अभिरुचि बदलावयाची होती म्हणून त्यानीं स्वतः नटाचें काम कांहीं दिवस केलें. तें कार्य झालेसें वाटल्या बरोबर त्यानें आपलें आंग आंतून काढून घेतलें.

आतां शेक्सपीअर होऊन गेल्याला आज ३०० वर्षे झालीं तरी देखील त्याची महती कां आहे याचा विचार करूं. Shakespeare was not of an age, but for all time असें शेक्सपीअर बद्दल म्हणतात. ह्याचा अर्थ असा कीं त्याच्या नाटकांमध्यें ज्या भूमिका त्यानें आणिल्या आहेत, त्यांचें चित्र सार्वकालिक आहे. मनुष्य स्वभावाची म्हणजे मनुष्याच्या मनाची परीक्षा यानें जशी केली तशी आजपर्यंत कोणी केली असेल असें वाटत नाहीं. मानस शास्त्रांतील अघटित सिद्धांत त्यानें प्रतिपादन केले आहेत. Shakespeare याला the thousand minded man म्हणतात कारण भिन्न भिन्न व्यक्तींचा स्वभाव परिपाक इतका मजेदार उठला आहे. या इतक्या निरनिराळ्या स्वभावांचा अनुभव त्यास कसा मिळाला किंवा त्यानें कल्पना तरी कशी केली असेल हा प्रश्न पुढें उभा राहतो. आथेल्लोसारख्या व्यक्ति समाजांत सांपडतील आणि आयागो सारख्या ही सांपडतील. प्रत्येक व्यक्ति समाजांत सांपडणें कठीण नाहीं. शेक्सपीअरच्या नाटकांतील नायिकाही अशाच आहेत. एका पुढील एक नाटकांत नायिकेच्या स्वभावांत गमतीचा फरक पडलेला दृष्टीस पडतो. आरंभीच्या नाटकांतील नायिकांत, मनोविकारांचें प्राबल्य असून जरी त्यांच्यांत केवळ उच्छृंखलपणा नाहीं, तरी त्यांत मार्दव, मनाची कोमलता, बुद्धीची तीक्ष्णता वगैरे गुण दृष्टीस पडत नाहींत. पुढें पुढें त्यांच्यांत बुद्धीची तीक्ष्णता दृष्टीस पडते, परंतु निर्भिडपणा किंवा विश्व साधिक्य इत्यादि कमीपणा आढळतो. दुसऱ्या काळांतील आनंद पर्यवसायी नाटकांतील नायिका उदात्त स्वभावाच्या आहेत. व तिसऱ्या काळांतील दुःखपर्यवसायीं प्रकरणांतील नायिकामध्यें एक एक गुणपरिपूर्णतेप्रत नेऊन ठेविला आहे. परंतु त्यांच्या आंगची नैसर्गिक कोमलता, नम्रपणा, आज्ञाधारकपणा, प्रेमस्थैर्य, सहनशीलता इत्यादि गुणामुळें–अगर दोषामुळें त्यांचा कसा अंत झाला हें फार चांगलें दाखविलें आहे त्याच्या नाटकांमध्यें सर्व प्रकारच्या स्त्री भूमिका आहेत.

शेक्सपीअरच्या नाटकांतील दुःखपर्यवसायीं नाटकें फार महत्वाचीं आहेत. दुःखपर्यवसायीं नाटकें आपल्या इकडे अपरिचित आहेत. पण तिकडे तीं फार दिवसांपासून चालू आहेत. अशा नाटकांमध्यें–नाटकांतील कां होईना, परंतु–न्याय मिळत नाहीं. असा त्यांजवर मोठा आक्षेप आहे. म्हणजे नायक व नायिका सदाचरणानें वागत असतां त्यांचे हेतु पूर्ण न होतां त्यांचा अंत होतो, व अनाचारानें वागणाऱ्या इतर पात्रांस त्यांच्या त्यांच्या अपराधा योग्य शिक्षा मिळत नाहीं. परंतु नीट विचार करून पाहिलें तर ह्या जगामध्यें जिकडे तिकडे तेंच दृष्टीस पडतें. सदाचारी माणसें नेहमी अडचणींत असावयाचींच व दुराचारी माणसें चैन करीत असावयाचीं, असें जर आहे–म्हणजे सत्यसृष्टींत जर न्याय मिळत नाहीं तर कविसृष्टींतच तो मिळावा असा आग्रह काय कामाचा? शिवाय दुःखानें एखाद्या कल्पनेचें प्रतिबिंब मनावर जितकें ठसतें व त्यामुळें अनाचाराचा व पापाचा जितका वीट येतो तितका आनंदानें येत नाहीं. आथेल्लो नाटकामध्यें आयागोच्या कृष्णकृत्यांचें बेंड जर लवकर बाहेर पडलें असतें तर आयागो सारख्या माणसाच्या दुष्टपणाची कल्पना आपल्याला इतकी स्पष्टपणानें झाली नसती. नाटक हें नीतिशिक्षणाचें एक चांगलें साधन आहे. आणि हा नीतीचा धडा दुःखपर्यवसायी नाटकापासून ज्यास्त चांगला ठसतो.

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य ९ शके १८२५

## दिवाणी अदालत.

दिवाणी न्याय ह्मणजे कांहीं विचित्रच बोध होतो. ज्याला दिवाणी कोर्टाशी ओळख नाहीं अशा माणसाला दिवाणी न्यायाचा मोठा बागुलबोवा वाटतो. पहिली कल्पना ही कीं न्याय मिळे पर्यंत खर्चा खालींच मनुष्य चूर होतो. दुसरी गोष्ट कालावधीची होय. दिवाणी न्यायपनमुबीला काळही फार लागतो. खर्च व तसाच काळ इतका लागतो कीं हा न्याय नकोसा होतो. पण दुनियेचा व्यवहार असावा इतका सोपा नाहीं. तेथें नानाविध भानगडी उद्भवतात आणि सरकारी अदालतीमध्यें मिळविलेल्या न्यायाशिवाय मनाची हैासच फिटत नाहीं. उत्तरोत्तर सार्वजनिक नीतीमत्ता फार खालावली आहे. दररोज हजारो लटपटी चालूं असतात. आणि जो तो मर्जी प्रमाणें परस्परांत न्याहाळीत असतो. कचेरींतील न्यायाच्या तऱ्हा, दिवाणी काम चालविण्याचे नियम, साक्षीदारांच्या तोंडून गोष्ट वदविण्य ची पद्धती, व निरनिराळ्या मुद्यांची घडामोड हीं सर्व लक्ष्यांत घेतलीं ह्मणजे चांगले शहाणे लोक देखील दिवाणी अदालतीला रामराम ठोकतील. पण निरुत्तर होऊन निरुपायानें आदालतीचीच पायरी वारंवार चढावी लागते. तसें करण्या शिवाय गतीच नसते. व्यवहारच असा चमत्कारिक व विकट होत चालला आहे कीं त्याला दिवाणी अदालतींतील न्यायाच्या खटपटी शिवाय दुसरा मार्गच नाहीं. विलेकदां दिवाणी न्याय ह्मणजे गारुड्याचा खेळ वाटतो. नानाविध प्रकारचा जुगारचा होय असा अनेक प्रसंगीं अनुभव येतो. शतकांची शतकें सुधारणा चालूं आहेत उद्योग व व्यापार यांची उत्तरोत्तर वृद्धीच होत आहे, लोकांचें व राष्ट्रांचें दळणवळण फार वाढलें आहे, व्यवहाराच्या शाखा सहस्रशः प्रसृत झाल्या आहेत इत्यादि गोष्टींमुळें दिवाणी अदालतीचें काम मोठ्या पांडित्याचें, वक्तृत्वचातुर्याचें, व्यवहारज्ञपणाचें, मानवीस्वभावपरीक्षणाचें आणि पराकाष्ठेच्या धूर्ततेचें व चाणाक्षपणाचें बनलें आहे. न्यायखातें ह्मणजे एक मोठी निराळी संस्थाच बनली आहे आणि त्या न्यायमंदिरांत जे फिरतात ते खरोखर जगाकडे दृष्टी फेंकून ह्मणतील कीं दिवाणी अदालतीच्या चक्रांत जो कोणी सांपडणार नाहीं तो खरा धन्य व भाग्यशाली होय !

---

न्यायमंदीर ह्मणजे ईश्वराची गादी होय. आणि जे न्यायाधीश असतात त्याला ईश्वरच मानतात. अशा न्यायखात्या विषयीं लोकांची श्रद्धा विशेष असली पाहिजे. पूज्यभाव लोकांच्या मनांत जागृत असला पाहिजे. न्यायखातें ह्मणजे श्री चा हुकूम बजावण्याचें यंत्र होऊन बसतां कामा नये. न्यायखात्यांत एका प्रकारचें ईश्वरी साम्राज्य पाहिजे. उत्तरोत्तर हा पूज्यभाव नामशेष होत चालला आहे. ही गोष्ट दुःखाची होय. न्याय मंदीर ह्मणजे ईश्वराचीं पाऊलें उमटलेलें पवित्र स्थळ होय असा समज असला पाहिजे. आह्मी तर असें ह्मणतो कीं न्याय मंदिरांत जो लटापटी करितो तो ईश्वराच्या घरीं महापापी मनुष्य होय; आणि हा पायाचा अन्तमा कोठेंही असूं नयें ह्मणून आह्मी न्याय कोर्टाची कार्यमाला बारकाईनें तपासीत असतो. आमचा अनुभव सांगतो कीं न्याय कोर्टांत पापभीरुपणा असावा तितका नांदत नाहीं किंबहुना कधीं कधीं न्याय मंदीर ह्मणजे अन्यायाची टांकसाळ बनते. ऱ्हास दूर करण्याची जबाबदारी न्याय मंदिरांतील लोकसमूहावर आहे; आणि आह्मी अशी उमेद बाळगतों कीं आमचे उद्गार ज्या कोणाच्या वाचण्यांत येतील ते अंशतः तरी आपल्या कर्तव्याची उच्चतर पायरी चढतील आणि आपल्या अंगच्या देवपणानें दुसऱ्या प्रेक्षकांच्या अंगीं देवपणा आणितील.

---

व्हाईसराय लार्ड कर्झन साहेब ह्यांच्या प्रवर्तक मंडळाची नुकतीच बैठक झाली त्या वेळीं लार्ड कर्झन साहेब यांनीं हिंदुस्थानची राज्यसूत्रें आणखी दोन वर्षेंपर्यंत चालविण्याचें आपण कबूल केलें आहे असें सांगितलें. लॉर्ड कर्झन साहेब हे जरी कॉन्सरव्हेटिव्ह पक्षाचे आहेत तरी तारुण्य, बुद्धि व काम करण्याची हौस ह्या गोष्टींच्या साहचर्यामुळें हिंदुस्थानांतील ह्यांचा वास आपल्या लोकांस बराच हितावह होईल असें भाकित करण्यांत आलें होतें. परंतु गेल्या चार वर्षांच्या अवधींत हें भाकित जितकें फलद्रूप व्हावें तितकें झालें नाहीं, तरी हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एकदम ढवळाढवळ करणें साध्य नाहीं किंवा इष्ट ही नाहीं ही गोष्ट खरी आहे. तथापि लॉर्ड कर्झन साहेब ह्यांनीं आपल्या चार वर्षांच्या कारकीर्दींत लोकमताला जो आदर दाखविला आहे त्यावरून इंग्रज सरकारच्या इतर अधिकाऱ्यांनीं उदाहरण घेण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें ब्रिटिश शिपायांच्या हातून गरीब नेटिव्ह मनुष्याचा मृत्यु घडला असतां ब्रिटिश शिपायाची वागणूक कोणत्या कसास लावली ह्याबद्दल लॉर्ड कर्झन साहेब ह्यांनीं स्थानिक सरकारांस जें हुकूम सोडले आहेत ते खरोखरच आदरार्ह होत. ह्या गोष्टींचा विचार करितां लॉर्ड कर्झन साहेब ह्यांचा सहवास आपणांमध्यें अधिक कांहीं काळ पावेतों होणार आहे ही समाधानाची गोष्ट आहे. युनिव्हर्सिटी, पोलीस, इरिगेशन, शेतकी वगैरे महत्वाच्या बाबतींत त्यांनीं पुढाकार घेऊन त्या त्या खात्यांत असलेल्या उणीवा काढून टाकण्याबद्दल सूचना करण्या करितां जीं कमिशनें नेमिलीं आहेत त्याचा निकाल अद्याप पावेतों झाला नाहीं, तेव्हां लॉर्ड कर्झन साहेब ह्यांनी भावी कारकीर्दींत आपण योजलेलें कार्य पूर्ण करण्याच्या कामीं लागावें व त्यांत त्यांच्या मना प्रमाणें यश येवो व त्यांच्या मनांत हिंदी प्रजेचें खरें कल्याण करण्याची इच्छा नेहमी वास करो एवढेंच आह्मी मनापासून इच्छितों.

---

बाबू रोमेशचंद्र दत्त ह्यांनीं इस्ट इंडिया असोसिएशन पुढें मुंबई व मद्रास इलाख्यांतील रयतवारी पद्धति ह्या विषयावर जें भाषण केलें आहे त्याचें मनन सरकारानें अवश्य करावें. मि० दत्त ह्यांचें असें ह्मणणें आहे कीं शेतीचा सारा ठरवितानां कांहीं विशेष नियम सरकारानें पाळणें अवश्य आहे. शेतकऱ्यानें दुसऱ्यास शेत लावून काढलें असतां जी पट्याची रक्कम येते त्या रकमेच्या निमेपेक्षां जास्त रक्कम सरकारानें घेऊं नये असा निर्बंध वेळोवेळीं सरकारानें ठरविला आहे, हें प्रमाण मि० दत्त ह्यांच्या मतें जास्तच आहे, तथापि ह्याप्रमाणास धरून जरी साऱ्याची आकारणी केली तरी साऱ्याचे ओझें रयतेस हल्लीं इतकें वाटणार नाहीं किंवा मि० दत्त ह्यानें असें मत आहे कीं ढोबळ प्रमाणानें पहातां एकंदर उत्पन्नाच्या ⅕ पेक्षां जास्त रक्कम साऱ्याच्या रूपानें सरकारानें घेऊं नये. ह्या शिवाय मि० दत्त ह्यांचें असें ह्मणणें आहे कीं ह्या इलाख्यांतून शेतकऱ्यांस जो त्रास होतो तो पैमाषीच्या वेळीं साऱ्याची रक्कम वाढविल्यानें होतो. पैमाषीच्या वेळीं प्रत्येक शेतावर काय आकारणी करावी हें काम लहान लहान मंडळी कडे बहुत करून सोंपविलें असतें; व अशा मंडळीचा समज सहजच असा असणार कीं आपण साऱ्याची रक्कम वाढवून दाखविली असतां आपणांस बढती मिळेल. तेव्हां अशा स्थितींत शेतांच्या साऱ्याची रक्कम कांहीं नियमांस अनसरून वाढविण्यांत येत असेल असें संभवत नाहीं; आणि ह्मणूनच पैमाष खात्यांतील वरिष्ठ अधिकारी कितीही दयार्द्र दृष्टीचे असले तरी तिजपासून कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं; ह्मणून मि. दत्त ह्यांचें असें ह्मणणें आहे कीं साऱ्याची रक्कम वाढवितांना शेतांतील मालाला किंमत जास्त येत आहे काय किंवा शेतांत खरोखर सुधारणा झाली आहे काय ह्या गोष्टींचा विचार करण्यांत आला पाहिजे. ज्या प्रांतांत जमीनदारी वहिवाट सुरूं आहे, त्यां प्रांतांतून जमीनदारांनीं कुळांपासून जी साऱ्याची रक्कम घ्यावयाची ती वाढवितांना सरकारानें घालून दिलेल्या निर्बंधाचें उल्लंघन होत आहे काय ह्या संबंधानें सरकारचें विशेष लक्ष्य असतें; ही गोष्ट समाधानाची आहे.

ह्या पद्धतीमुळें कुळ व जमीदार ह्या दोघांचें ही हित होत आहे. परंतु जमीदार सरकार असलें ह्मणजे मात्र अशा नियमांची अवश्यकता वाटूं नये ही थोडीशी विलक्षण गोष्ट आहे. अशा नियमांच्या अभावीं सरकार कोणत्या धोरणावर आपला सारा वाढविणार हें रयतेस कळत नाहीं आणि अशा अनियमित तऱ्हेनें सारा वसूल करण्याची पद्धति सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्र ज्या अंमला खालीं सुरूं असणें हें खरोखरच शोभत नाहीं. तेव्हां ह्यां बाबतींत विचार होऊन रयतेस न्याय देण्यांत यावा अशी मि. दत्त ह्यांची सरकारास विनंती आहे.

---

मुंबई येथील गव्हर्नर साहेबांच्या विचारक मंडळांत ज्या नवीन नेमणुका अलिकडे सरकार तर्फे करण्यांत आल्या आहेत, त्यात मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी व कारखानदार मि. विठ्ठलदास दामोदर ह्यांची नेमणूक झाल्याचें शुभवर्तमान प्रसिद्ध झालें आहे. मि. विठ्ठलदास हे वयानें तरुण आहेत, तरी त्यांना व्यापार व देशी कारखाने ह्याची स्थिति चांगली अवगत आहे. हल्लींचा महत्वाचा नाण्याचा प्रश्न ही त्यांनां चांगला अवगत आहे. मुंबई येथील मिलओनर्स असोसिएशनच्या पोट कमेट्यामध्यें ते चांगलें लक्ष घालीत असतात तेव्हां त्यांच्या नेमणुकीपासून व्यापारी व देशी कारखानदार ह्यांची बाजू गव्हर्नर साहेबांच्या नजरेपुढें राहील ही समाधानाची गोष्ट आहे ह्या करितां मि. विठलदास ह्यांचें आह्मीं अभिनंदन करितों व त्याच्या हातून इच्छित कार्य तडीस जावो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

"इजिप्शिअन लागवड" ह्या विषयावर आह्मी दोन लेख लिहिले त्यानंतर मि. टाटा ह्यांजकडून आमच्या एका मित्राकडे इजिप्शिअन कापसाच्या "अबासई" जातीचें १० शेर बीं आल्याचें ते कळवितात. मि० टाटा ह्यांनीं सदर्हू बी आपल्याकडे फुकट पाठविलें आहे असें आमचे मित्र कळवितात. मात्र त्या बिची लागवड येत्या पावसाळ्या नंतर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सबब जे सुखवस्तु शेतकरी सदर्हू कापसाची लागवड आपल्या शेतांत करूं इच्छित असतील त्यांनीं आमच्याकडे बीयाचे मागणें केल्यास सवडीनुसार त्यांना तें देण्यांत येईल.

---

हिंदुस्थानच्या दक्षिण भागास असलेल्या मालदिव बेटांतील राज्य कर्ता इमददुदीन ह्यानें दररोज रुपये ३० प्रमाणें पेनशन घेऊन स्वस्थ बसावें असें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्याची त्रोटक हकीकत टाईम्स आफ इंडिया पत्रांत नुकतीच प्रसिद्ध झाली आहे तिजपासून आपल्या देशांतील राजे रजवाड्यांस व इतर लोकांना ही बोध घेतां येत असल्यामुळें तिचा सारांश आह्मी खालीं देत आहों. मालदिव बेटांतील सुलतान नुरुद्दीन हा सन १८९३ सालांत मरण पावला त्या वेळीं त्याचा मुलगा शमसुद्दीन हा गादीचा वारस झाला परंतु शमसुद्दीन हा अज्ञान असल्यामुळें, इमाददुदीन हा रिजेंट ह्मणून राज्य कारभार पाहूं लागला; परंतु पुढें गादीचा खरा मालक शमसुद्दीन ह्याला त्यानें एकीकडे सारून स्वतःच गादी बळकाविली. परंतु पुढें कालान्तरानें तारुण्य व तदनुरूप वैभव ह्यांचा पगडा इमादुदीन ह्याजवर बसून तो आपला राज्यकारभार सोडून परदेशांत सफरी करूं लागला. इजिप्त देशांत फिरत असतां त्याचें एका स्त्रीवर मन गेलें व तिच्याशीं त्यानें विवाह लाविला, परंतु विवाहापूर्वीं वधूवरांत अशी शर्त ठरली होती कीं वधूनें वैवाहिक स्थितींत मालदिव बेटांची राजधानी मले येथें न राहतां सिलोनांत कोलंबो येथें रहावें ह्या शर्तीस अनुसरून सुलतान इमादुदीन ह्याची राणी कोलंबो येथें रहात असल्यामुळें सुलतानाचेंही वास्तव्य आपल्या राज्यांत न होतां कोलंबोस होऊं

लागलें. ह्याचा परिणाम असा झाला कीं राज्याचा खरा वारस सुलतान शमसुद्दीन ह्यानें आपल्या प्रजेची प्रीति संपादिली व प्रजेच्या संतोषाच्या साह्यानें आपलें गतवैभव मिळविलें "कनक व कान्ता" ह्या जोड गोष्टींचा परिणाम मनुष्याच्या मनावर कसा होतो व अखेरीस मनुष्याचे डोळे कसे उघडतात हा बोध लक्ष्यांत ठेवून वेळींच मनुष्यानें शहाणें व्हावें हें बरें !

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 17 1903

We have received for publication a scheme of taxation which the Akola Municipal Committee have decided to introduce in their general meeting on Thursday last. The new measure of taxation cancels the notification of imposing the Octroi tax that we published a couple of months ago. The old proposal of levying the octroi—duty was very cumbrous in its procedure. It required a heavy department for its collection and was likely to throw open a side—wise door for bribery and correction. These were the main objection to its successful administration. There was besides the ulter freedom from taxation which the prosperous cotton industry enjoyed within the municipal limits. In this connection we wrote over and over again to point out the imperative necessity of utilizing the resources of the properous cotton industry for municipal purposes. We are glad to see that these objections were held good by the Municipality.

Our thanks are further due to Mr. Rustomji Faridoonji and other leading members of the Municipal Committee for having hit upon an easily workable scheme of taxation which will reach in a fair and just manner the cotton industry and the imports by Railway brought within municipal limits. Mr. Rustomji did a good service to the Committee when he gave then the advantage of his cerain and definite proposals in this connection and we further hope that, his strong support will go a long way in recommending the new proposal to the favourable acceptance by the superior authorities. Mr. Rustomji was himself most unwilling to propose a tax which will press hard against the poor people. He was equally anxious to come to a final decision in this vexed question of taxation and we congratulate him upon the efficient and successful manner in which he has met the universal wishes of the Akola public in devising a tax upon the ginning and pressing businesses within municipal limits.

There are now two proposals before the public. The first is to impose a tax of 8 pies on every Boza of ten maunds ginned and the additional one of 10 pies per bale of 14 maunda pressed. We presume that this is a very moderate tax. Both these will be collected from persons who practise the trade of ginning cotton and pressing the same into bales. There is hardly any difficulty of realizing it with as much accuracy and exactness as can be desired in any matter of taxation.

The second proposal is to introduce a 'Terminal tax' upon all imports by Railway within the Municipal jurisdiction. The general rate is 6 pies per maund of goods. But this is fixed at 3 pies in the case of grain, puise, flour, oil—seeds, bricks, lime, stone, timber &c. There is a wholesome exemption provided for paper, salt, earth ware, fuel, grass, oil, fruits, vegetables and ordinary parcels and personal luggages. To our mind this tax will not weigh heavily upon the general public. We hope that the two-fold proposal of levying additional taxes will meet the approva of the people. It is now very probable that this new measure will soon be introduced after it passes through the various stages of obtaining the sanction of the Hon'ble the Resident at Hyderabad.

"The Russian Government will unify Central Asia just as the British Government has unified India. European nations have as, already observed, always declared that their occupation of Asiatic countries has been for the purpose of civilizing the latter. But curiously enough, European nations which are so anxious to civilize the barbarous Asiatic have always been jealous of indigenous efforts, whenever made by the Asiatic to civilize himself. Thus Russia which is supposed to be the chosen instrument for bringing the inestimable blessings of European civilization home to the barbarous Asiatics of the Khanates, has always watched with a jealous eye the progress made by Japan. Salvation is to be found only in the Koran it is true, but the Grand Chamberlaine Fadladeen believed that salvation could only be found in his own particular copy of it. Western civilization is absolutely necessary for the redemption of the barbarous Asiatic, but each European nation believes in its heart of hearts that redemption is only to be found in its own particular development of it. Thus the efforts of Japan to assimilate the Western civilization to herself by her own endeavours found no favour with Russia. And since Japan has come to the fore, Russia has made the most unceasing efforts to obstruct her. Every European Power has viewed with alarm the progress of Japan, for that progress has shown that, after all, Asiatic races are not savages that they have always been thought to be. And as Japan, since her rise has naturally enough tried to raise the other Mongolian peoples to the same position as herself, books have been written, in fact a vast literature has sprung up for the purpose of warning the peoples of Europe against the Yellow Peril. Japan has tried successively to rouse Corea and China to a sense of their duties. When she found that her advice fell on unheeding ears, Japan was naturally compelled to administer some wholesome chastisement to those two Mongolian Empires in order to show them the necessity of adopting the new order of things if they wished to live as Empires." Bengalee.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— ऊन कडक पडतें आणि मध्यंतरीं आभाळही पुष्कळदा जमतें. सध्यां रुपा उघाडीमुळें नवीन रोपें जोमदार. व टवटवीत दिसूं लागलीं आहेत. सार्वजनिक आरोग्य हवामाना प्रमाणें चांगलें आहे परंतु प्लेगाची दहशत मोठी पडली आहे.

अलिशान नामदार रेसिडेंट कर्नल बार साहेब यांच्या चाकरीची मुदत येत्या मार्च अखेरीपर्यंत वाढविण्यांत आली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. त्यांच्या उत्कृष्ट मृदुशीलपणाला हें पारितोषिक आहे.

येथील नेटीव जिनिंग आणि प्रेसिंगच्या कारखान्यांत गेल्या बुधवारीं सूत काढण्याचा कारखाना सुरूं करण्यांत आला. राव साहेब देवराव विनायक हे या कारखान्यांत मुख्य आहेत. दहा बारा वर्षां पूर्वींचा त्यांचा संकेत सिद्धीस गेला आणि त्या कंपनीच्या नाव प्रमाणें सूत काढण्याच्या चात्या सुरूं झाल्या ही मोठी आनंदाची गोष्ट होय. या इष्ट कार्याला प्रारंभ करितांना हिंदु धर्माचे होमहवनादि मंगलविधी करण्यांत आले, व गोरगरीबांसाठीं अन्नसंतर्पणही केलें. या रितीनें सुमुहूर्तावर चालूं झालेला कारखाना लवकर भरभराटीस येईल हें निर्विवाद आहे. या कामचे श्री तेथील इंजिनिअर रा० रा० गोविंद विष्णु कोल्हटकर यांजकडेच आहे.

वाशिम, उमरावती व आकोट या तीन ठिकाणीं दररोजच्या मृत्यूंची संख्या वाढली आहे. तेथें तेथें प्लेगाचा उद्भव झाल्या विषयीं दुःखद वार्ता ऐकूं येतात. ईश्वर करो आणि ही इडापीडा टळो !

वाशिमचे सिव्हील सर्जन डाक्टर जोन्स साहेब हे रजेवरून परत आल्यामुळें असि० सर्जन डाक्टर चक्रवर्ती याची बदली मलकापुरास झाली.

आज पासून आकोल्यास सेशन कचेरी भरणार आहे.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८= |
| सोनें २४॥ | | चांदी ७० |
| ज्वारी ३९।४० | | जवस ९० |
| गहू | | ८९ ते १०० |
| बाजरी | | ९९ |
| मीठ | ३॥।= | रु. मण |
| चणे | ३८— | रु. मण |
| तूप | ८ | रु. मण |
| तेल | ९८= | रु. मण |
| रुई | | ९० |

## नोटीस.

नोटीस बेशमी खुशालराव कृष्णराव देशपांडे कसबे सोनाळे ता. जळगांव जिल्हा आकोला. यांस.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची आमची वडिलोपार्जीत समाईक जिंदगी सालीम तुमचे ताब्यांत आहे व तुह्मी वहिवाट करित आहात, गेल्या चैत्र महिन्यापासून आमची $\frac{1}{3}$ हिश्याची जंगम व स्थावर जिंदगी वाटून आमचा हिस्सा आमचे ताब्यात द्यावा. असे तुह्मास ह्मटले असतां आज देतों उद्या देतों असे चाळवीत आहात परंतु अद्याप कांहींच निकाल केला नाहीं करितां ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आमचा $\frac{1}{3}$ हिस्सा जंगम व स्थावर जिनगीचा वाटून आमचे ताब्यांत द्यावा तसे न केल्यास विनाकारण सरकार दरबार करून तुमचेवर खर्च पडेल करितां तुह्मास आगाऊ नोटीसीनें कळविलें आहे कळाव तारीख ११ आगष्ट सन १९०३ इ.

सही.

रामराव कृष्णराव देशपांडे तर्फे<br>नारायणं रामराव देशपांडे व<br>ज्ञानराव नंदाजी देशमुख<br>मुंडगांवकर हल्लीं वस्ती<br>आकोला.

## नोटीस

नोटीस बेशमी— शंकर सदाशिव वृथामुंडी वस्ती आकोला तेली पुरा तालुका आकोला यांस:—

खालीं सही करणारा कडून तुमचे नोटिशीचे उत्तर. तुमचे शेतीचा लागवड व सारा वजा जातां ९३।.। तुमचे खाते जमा केले आहेत. हिशेब लागत असल्यास तीन दिवसांत बोरगांवी जाऊन पहावा. पौषांत रुपये देण्याचा तुमचा करार आहे हे ह्मणणे खोटे आहे. रुपये आह्मी मागूं त्यावेळेस द्यावेत असा करार आहे दोन्ही नोटीशीचे खर्चा सुद्धां रुपये वरील मुदतींत द्यावें नाहींपेक्षां रीतीप्रमाणें व्यवस्था होईल. कळावें. तारीख १५ माहे आगष्ट सन १९०३ इ.

सही

परशराम मारुती नाईक बोरगांव<br>मंजू तालुके आकोले<br>तर्फे मुखत्यार गुणवंत<br>परशराम दस्तुर<br>खुद्द.

कि० दिवाणी दावा नंबर ७ क्लास ११

१९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकिट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जड्ज्य आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार तुळसाबाई जवजे मनसुकदास व मुळाबाई जवजे देवकिसन तर्फे मुखत्यार गोपाळ माधो वस्ती सावरगांव तालुके जळगांव सर्वांस.

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यांनें मयत मनसुकदास देवकिसन मारवाडी वा। सावरगांव यांचे लोकांकडेस येणें असलेले रु० ९०८४०९८५ कर्ज वसूल करण्या करितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख ५ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजी अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख १२ माहे सप्टेंबर सन १९०३ इसवी रोजीं मुकरर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचे कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे आज तारीख १२ माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

V. N. Dandekar.<br>सिव्हील जडज्य.

## वर्तमानसार

ईशान्येच्या बाजूस डोळ्यांना दिसण्या सारखें एक शेंडे नक्षत्र हल्लीं उगवूं लागल्याचें इंग्रजी पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

बडोद्याचे श्रीमंत युवराज फत्तेसिंग महाराज यांच्या विवाह प्रसंगीं तेथें एक शेतकी व हुन्नरकला यांचें प्रदर्शन भरवि ण्यांत येणार.

विजापूरानजीक तिकोटे हा कुरुंदवाडक रांचा गांव आहे. ह्याच्यापासून ४ मैलावर लोखंडाच्या खाणी आहेत अशी बातमी आहे.

चिनी दंगेखोरांनीं, फ्रेंच प्रजेला गराडा घालून कत्तल करण्याची दहशत घातली, एवढ्यावरच फ्रेंच वकिलानें, ह्या चिनी दंगेखोरांचा मस्तकछेद चिनी अधिकाऱ्यां कडून करविला!

केंब्रिज युनिव्हर्सिटींतील हिंदु तत्वज्ञाना च्या प्रोफेसरची जागा कुचबिहारच्या व्हिक्टोरिया कॉलेजचे प्रिन्सिपाल मि० बृजेंद्रनाथ सील यांस देण्याचा विचार चाल विला आहे.

सरकारी नोकरांनीं व्याजानें पैसे देण्या चा धंदा केला तरी हरकत नाहीं असें पंजाबच्या मुख्य कोर्टानें ठरविलें आहे; आणि हा धंदा म्हणजे व्यापार नव्हे असें ही त्याणें आपलें मत दिलें आहे?

मुंबई इलाख्यांत— जमीनमहसुला संबं धाच्या नव्या कायद्यामुळें गरीब लोकांचे हाल होत आहेत. या विषयींची उदाहरणें वरचेवर दृष्टीस पडूं लागली आहेत. सोला पूर जिल्ह्यांतील करमाळें तालुक्यापैकीं पुमलवाडी येथील ज्या कुळांकडे विहीर खणण्यासाठीं घेतलेल्या रुपयांची फेड होणें राहिली होती, ते रुपये १६०।२०० पर्यंत होते. ह्या १६ दिवसांत भरण्याबद्दल नोटिसा लागल्या असतां, मुदतींत पैसे न भरल्या मुळें ह्या रकमेला तारण लावलेल्या जमिनी खालसा झाल्या. पुढें कुळांनीं, हातीं रकमा आल्या तेव्हां भरणा करण्यास नेल्या. पण ह्या घेतल्या नाहींत! पाहिजे असल्यास नवीन शर्तीं प्रमाणें तुह्मी जमिनी लिलावांत घ्या असें मात्र त्यांस कळविण्यांत आले. एवढ्याशा रुपया करितां चौवाजणाचे हजार दीडहजार किंमतीचे १०।१२ नंबर खालसा झाले ह्मणतात! फार दुःखाची गोष्ट आहे. सरकारच्या कायद्याच्या अरेरावीपुढें उपाय काय?

इ० स० १७९४ त मुंबईत ७६४७ घरें होतीं. आणि १८९४ त ६२१४८ होतीं.

मुंबईहून विलायतेस दर आठवड्यास डांक जाण्याची वहिवाट इ. स. १८३८ पासून चालू झाली.

लंडन शहरांत ७०० रेल्वे स्टेशनें आहे त, ८०० मैल रेल्वे रस्ता आहे, आणि ११ रेल्वे पूल आहे.

इंग्लंडांत, जमीनदारांमध्यें सातांत एक स्त्री जमीनदार आहेत. इंग्लंड आणि वेल्स ह्यांत मिळून १८००० जमीदारणी आहेत.

इंग्लिश शिपायांचा पगार वाढविला त्याच्या पायीं पुढील सालापासून हिंदुस्थाना स सवाकोट रुपये जास्त खर्च येणार.

उंदराचे दात एक सारखे वाढत जातात, त्यांची वाढ कधीं थांबत नाहीं ह्मणून ते एक सारखें कांहीं तरी कुरतडीत असतात त्यानें ते झिजून बेताचे राहतात.

दोनशें वर्षांमागें मुंबईस रहाण्यास ९०० इंग्लिश माणसें आलीं. तर त्यांतलीं १०० जिवंत परत जात नसत. इतकी हवा वाईट होती.

रशियांतले शेतकरी अतिशयित मळी न आहेत असें ह्मणतात. ते स्नान कधींच करीत नाहींत. आणि आंगावरचे कपडे वर्षानुवर्ष जशाचे तसे घालीत असतात त्यामुळें त्यांच्या रोगावर औषधें सहसा लागू पडतच नाहींत.

विलायच्या पोष्टखात्यांत इ. स. १८७ ह्या वर्षीं स्त्रियांस जागा देऊं लागले. त्यां त सध्यां १०६००० स्त्रिया कामावर आहेत.

शास्त्रज्ञाचें असें मत आहे कीं, आगगाड्या, किंवा मोठार गाड्या ह्यांस पुष्कळ गति देण्याचें सामर्थ्य जरी वाफेच्या किंवा विजेच्या यंत्राच्या साह्यानें आलें तरी, दर तासास फार फार ८० मैलांची गति माणसांस सोसेल, अधिक सोसावयाची नाहीं. अधिक गति दिल्यानें माणसें भ्रमिष्ट होतील याचा प्रत्यय ही आला आहे.

रशियाचे झार लवकरच प्रवासास इंग्लंडास जाणार आहेत ता० २९ रोजी लंडन येथें सभा भरून मि० चेंबर्लेन यांचे सूचनेविरुद्ध ठराव पास होऊन अन्न सामुग्रीवर कर न बसण्याचाही ठराव पास झाला आहे.

लार्ड नार्थकोट साहेबांस आस्ट्रेलियाचे गव्हरनर नेमलें अशी बुधवारच्या बांबे गाझेटांत बातमी आहे परंतु आधीं ते इंग्लंडास जातील असें पायोनियरचें ह्मणणें आहे.

दक्षिण आफ्रिकेंत असलेल्या हिंदु लोकांनीं तेथें एक शिवालय बांधले असून त्याची अर्चा नुकतीच करण्यांत आली आहे.

गेल्या शुक्रवारीं मुंबईस दंगा होण्याची खोटी अफवा दाट पसरली होती. पण ती खोटी ठरून दंगा वगैरे कांहींहि झाला नाहीं ही समाधानाची गोष्ट. या दंग्याची बातमी पोलिसला अगाऊ लागली होती व ह्यामुळें पोलीस जगदीं तयारींत होते. दंग्याचे कारण काय असले पाहिजे! प्र. वि.

हिंदुस्थान सरकारचे शेतकी खात्याचे इन्स्पेक्टर जनरल सांगतात कीं, परदेशांतून उसाचें बीं आणणारांनीं फार सावध रहावें. कारण जावा वगैरेकडे, आजपर्यंत हिंदुस्थानांत आढळे नाहींत असे उसांचे रोग आहेत व त्यांचा फैलावही लवकर होतो व एकदां तो रोग आला ह्मणजे नाहींसा करणेंहि फार मुष्किलीचें काम आहे.

मि० मोरेश्वर राजाराम दीक्षित हे मागच्या आठवड्यात विलायतेहून ब्यारिस्टरची परिक्षा पास होऊन आले, परदेशगमन व संसर्ग–दोष-परिहारार्थ त्यांनीं नाशकास प्रायश्चित्त घेतलें ह्मणतात.

मुंबईस एका बेलिफास एका घरावर जप्ती न्यावयाची होती. त्या घराचा पुढचा दरवाजा उघडा नव्हता ह्मणून तो एका खिडकीवाटे आंत गेला व कांहीं माल जप्त केला. पण हें त्याचें करणें अन्यायाचें आहे असें कोर्टानें ठरविलें. इकडे बेलिफांनीं, सावकारांनीं व त्यांच्या गुमास्त्यांनीं लक्ष द्यावें.

बंगलोरास गेल्या आठवड्यांत पोलीसनें एका घरावर अवचित् घाला घालून खोटे रुपये करण्याचा एक कारखाना पकडला. एक मुसलमान पकडला आहे; दुसरे तीन पळाले. त्या घरात खोटे रुपये करण्याची साधनें व ८ खोटे रुपये सांपडले

ठा० भ०

मुंबई युनिव्हर्सिटी डा० रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांस एल. एल. डी ची पदवी देणार असल्याचे समजते. मुंबईच्या युनिव्हर्सिटीनें आजपर्यंत ही पदवी सर रेमंडवेस्ट लार्ड रिपन आणि प्रोफेसर वर्डस्वर्थ या तिघांसच दिली आहे.

मि० राबर्ट क्लिफटन नांवाचा लष्करी व तमिदार युरोपियन अधिकाऱ्याची परवानगी घेतल्या खेरीज सिकीम संस्थानांत शिरला व तेथून तो तसाच पुढें दाडग ईनें तिबेटांत शिरूं लागला परंतु तेथील अधिकाऱ्यांनीं त्यास अटकाव करून परत पाठविलें. पुढें राहण्यास बंगले घेण्याची परवानगी मागितली असतां त्यास ती तेथील डेपुटी कमिशनरनें दिली नाहीं ह्मणून क्लबमध्यें क्लिफ्टननें त्यांचा सर्वांसमक्ष फार उपमर्द केला, याबद्दल त्याच्यावर दार्जिलिंग येथें खटला झाला आहे.

हिंदुस्थानांतून परदेशांत पाठवावयाच्या मनीआर्डरीचे दर पोस्ट खात्यानें कमी केले आहेत. यापुढें १ पौंडाच्या मनीआर्डरीस ३ आणे, ४ पौंडांस पांच आणे, ६ पौंडांस १२ आणे याप्रमाणें कमिशन पडेल. तसेंच वर्तमानपत्रें, फोटो व हस्तलेख हेही बुक पोस्टानें पाठविण्याची सवलत मिळाली आहे.

रशियाशीं जपानची लढाई होण्याची वेळ नजीक आलेली असून मंचूरिया रशिया सोडीत नाहीं असें पाहून मार्किसइटो यांची जोरानें त्याला तेथून हाटविण्या करितांच आपल्या मुख्य प्रधानाचे जागेवर जपानच्या मुत्सद्यांनीं निवड करून जपानचे रशियाबरोबर होणाऱ्या भावी लढाईचें काम पूर्ण सावधपणें चालावें अशी व्यवस्था मुद्दाम केली असावी असें दिसत आहे.

बनारस येथे लवकरच ट्रामवेच्या गाड्या चालू केल्या जाणार आहेत ह्मणून त्यामुळें आपले फार नुकसान होईल असें जाणून तेथील दोनशें गाडीवाल्यांनीं बनारसच्या कलेक्टरकडे जाऊन त्यांना विनंती केली. त्यावर त्यांनीं आपण तुमच्या करितां शक्य तितका प्रयत्न करूं असें सांगून त्या गाडीवानांस परत लाऊन दिले आहे.

ज्याचा विस्तार अत्यंत मोठा आहे अशा पासिफिक महासागरामध्यें पंचवीस लक्ष चौरस मैलांचें एक मोठें खंड बुडून जाऊन प्राचीन काळीं गडप झाल्याबद्दलचा शोध आतां युरोपांतील शास्त्रज्ञांनी लाविला आहे. ह्मणतात,

कान, नाक, व गळा ह्यांतील रोगाची चिकित्सा करणारे मुंबईतील प्रसिद्ध डॉक्टर 'दादीपोट' ह्यांचें त्यांच्या धंद्यातील नैपुण्य पाहून सेंट्रल लंडन हॉस्पिटलमध्यें त्यांना ह्या रोगांच्या चिकित्सेचें ज्ञान करून घेण्याकरितां विलायत सरकारानें असि० सर्जन नेमिलें आहे.

अमेरिकेत एका निग्रोनें एका बाईचा खून केला. त्याबद्दल त्याची चौकशी कोर्टाकडून होण्यापूर्वींच ४ हजार गोऱ्या लोकांनीं कायदा आपल्या हातांत घेऊन त्याला जाळून टाकिलें. सुधारलेल्या लोकांचें हें वर्तन असल्यामुळें रानटी क्रूरपणाबद्दल थोडें आश्चर्य वाटतें.

पाळणा हालविण्यांचें यंत्र— पाळणा हालविण्याचें यंत्र निघालें आहे. त्यास किल्ली दिली ह्मणजे आपोआप पाळणा हालून सुस्वर गायनही होतें.

थडग्यांत सोनें—अमेरिकेंत दातांला सोन्याच्या चुका वगैरे बसविण्याचा प्रघात इतका आहे कीं, दरवर्षीं एक टन सोनें प्रेताबरोबर पुरलें जातें.

मातब्बर सुवर्णाच्या खाणी— टोमास्क येथून आलेल्या एका बातमीवरून प्रत्येक चारशें रत्तल मातींत आठपासून चौदा रत्तलपर्यंत शुद्ध सोनें मिळणारी मातब्बर खाण सैबेरियाचे बेरिकूल नदीच्या काठीं सांपडली आहे. तसेंच आफ्रिकेच्या मध्यभागींही शिराटी नावाच्या ठिकाणीं सोन्याची मातब्बर खाण लागली असून तेथें दाक्षिण आफ्रिकेचे बरेच इंग्रज गेले आहेत. सु. सु०

## नोटीस

पापाची मर्द न्यामतला वस्ती बाळापूर इस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं मौजे मानकी तालुके बाळापूर येथील शेत सर्वे नंबर ८० तुह्मी मजला रुपये ८०० रुपयांस विकून मझे ताब्यांत दिले व रुपये घेतले पण त्या शेता संबंधी विठोबा वा। दतुजी याणें मि० सिव्हील जडज्य साहेब बहादूर यांचेकडे दिवाणींत दावा नंबर ६६१ सन १९०१ चा करून हुकूमनामा मिळवून शेताचा ताबा घेतला आहे तर तुह्मास या नोटीशीनें कळविण्यात कीं आमचे खरीदीचे रुपये ८०० आज पासून ८ आठ दिवसांचें आंत आह्मास देऊन पावती घ्यावी या प्रमाणें न केल्यास आह्मांस दिवाणींत फिर्याद तुमचे वर करून कोर्ट खर्चा समेत आमची रक्कम घ्यावी लागेल ही नोटीस दिली सही ता. १४।८।०३ इ०

सही

चंद्रभान वा। हरसिंग दस्तूर खुद्द.

REGISTERED N. No. 4

बाहेरगांवी टपालहांशलासह ........ १

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.

किरकोळ अंकास..................२ आण

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस.... .........८१

All Subscriptions to be paid in advance.

Single copy ........................ 2 as

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......3 as

Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 24 AUGUST 1903 NO 33

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २४ माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३३

## NOTICE

—o:※:o—

Notice under section 44 of the Berar Municipal Law.

The Municipal Committee of Akola have at their Special General Meeting held on the 13th August 1903 passed a resolution proposing the imposition of a tax under section 41 (1) A (*b*) as set forth below:—

Any inhabitant objecting to the proposal should submit his objection in writing, within thirty days from the publication of this notice.

1 Class of persons or description o property proposed to be taxed:—

Every person who practises within the limits of the Akola Municipality the trade of ginning cotton and pressing the same into bales by means of steam or a mechanical process, shall be assessable to this tax.

11. Amount or rate of tax.

The tax rhall be levied at the following rates.

| | R. | a. | p. |
|---|---|---|---|
| Per every boja of ten maunds ginned............ | 0 | 0 | 8 |
| Per every bale of 14 maunds pressed............ | 0 | 0 | 10 |

111. System of assessment.

(1) The tax shall be assessed by a Sub Committee of the Committee appointed for the purpose subject to the sanction of the general Committee.

(2) When the list of assessment is ready a notice by tom—tom and in the local newspaper shall be given to the public and the list shall be open for inspection at the Municipal Office.

(3) Objection to the assessment shall be received and considered by the Sub-Committee aforesaid if presented in writing within one month from the publication of the list of assessments.

(4) the tax shall be payable in one instalment on 1st August of every year.

Akola. 14—8—03

V. M. MAHAJANI
Vice-Chairman
Municipal Committee.

---

## *NOTICE*

—:0:—

(Under section 44 of the Berar Municipal Law)

The Municipal Committee Akola have at their Special General Meeting held on the 13th August 1903 passed a resolution proposing to impose a tax called 'Terminal tax under section 41 of the Berar Municipal Law as set forth below:—

Any inhabitant objecting to this proposal should submit his objections in writing, within thirty days from the publication of this notice.

1. Class of persons or descriptions of property proposed to be taxed.

All goods brought within the limits of the Akola Municipality by Railway is assessable to this tax.

II Amount or rate of tax.

| (*a*) Description of Goods | Rate of tax |
|---|---|
| (1) Grain, Pulse and flour<br>(2) Bricks, tiles, lime and stone.<br>(3) Oil seeds<br>(4) Bamboos and Timber of all kinds. | Three pies per maund or a fraction of a maund. |
| (*b*) On goods other than those specified in (*a*) | six pies per maund or a fraction of a maund. |

III System of assessment.

1. No goods liable to duty other than those imported for immediate exportation shall be admitted within the limits of the Akola Municipality until the tax as specified above has been paid at such Nakas as exist or may from time to time be established by the Akola Municipal Committee.

2. If no naka is established, the Terminal Tax on goods imported by Railway shall be collected by Railway authorities on behalf of the Akola Municipal Committee on such terms as may be settled between the two bodies.

3. On the importation of goods liable to the Terminal tax, the Clerk in charge of the Naka shall call upon the person in charge of the goods to declare whether they are intended for *Immediate Exportation* from the taxable area.

The importer shall thereupon make such declaration.

4. On goods imported within the Akola Municipal limits, the Terminal tax shall be paid at once to the clerk in charge of the naka who shall make out a receipt in triplicate, tender two copies to the person in charge of the goods and retain the third as a counterfoil in the receipt book.

5. In the case of goods imported for immediate exportation, the person in charge of goods shall hand over one of the two copies of the receipt obtained by him as provided in rule 4 to the person in charge of the last Naka he passes and obtain on the copy of receipt retained by him an endorsement from this naka clerk to the effect that the goods covered by the receipt have actually passed out side the Municipal limits.

On presentation of the receipt thus endorsed at the Municipal Office the person in charge of those goods shall obtain a refund of the tax paid by him for the goods so exported.

Provided that the owner of the goods exported shall be entitled to a refund of this tax only in those cases where the goods to be exported leave the Akola Municipal limits on the same date and the goods as shown in the triplicate receipt have not broken bulk.

6. In the case of goods consigned to Akola by Rail, if the person in charge desire to rebook the goods for re-exportation by rail without their breaking bulk and leaving the Railway premises the goods clerk or the officer in charge of the naka shall enter in the refund form to be prescribed by the Akola Municipal Committee the number and particulars of Railway receipt and the amount of the Terminal tax levied and paid thereon. The goods clerk or the officers in charge of the naka shall then sign the refund form and deliver it to the persons in charge of the goods who shall, on presenting it at the office of the Akola Municipal Committee, receive a refund of the Terminal tax so paid.

7. Every person in charge of the goods imported shall permit every officer duly authorised by the Municipal Committee to inspect the receipt in his possession showing the payment of the tax and shall on demand deliver up the same to him. Every such person who is unable to produce such receipt, when so demanded shall pay the Terminal tax for the goods according to schedule herein annexed.

8. An officer to be called the Terminal tax superintendent with the necessary subordinate establishment shall be appointed and entrusted with the collection of the Terminal tax under the supervision and order of the Akola Municipal Committee.

9. The Akola Municipal Committee hall prescribe such forms and shall issue such receipt books as may from time to time be deemed necessary for duly carrying out these rules.

10. The Municipal Committee shall also issue such executive orders as may from time to time be required for the proper enforcement of these rules.

11. A copy in English and Marathi of these rules and of the schedule of rates at which the Terminal tax s levied shall be posted in a conspicuous place at every naka and at the Town Hall and copies shall be given to each servant of the Terminal tax Department who shall on demand show them to any one desiring to see the same.

12. Whoever wilfully commits a breach of these rules shall be liable to be prosecuted and on conviction shall be punished with a fine not exceeding Rs. 50.

13. Complaints connected with the levy of the terminal tax shall be addressed to the Akola Municipal Committee whose orders thereon shall be final subject to appeal under sec. 52 of the Berar Municipal Law.

14. The following articles shall be exempted from the tax.

(I) Personal Luggage of Railway Passengers.
(II) parcels not exceeding ten shers riceived by passenger trains.
(III) Articles received through the Postoffice.
(IV) Articles, the property of government or imported on behalf of government.
(V) Raw Cotton Coal and coa ashes.
(VI) Railway stock, Empty tins Leaves.
(VII) Paper salt Earth and sand.
(VIII) Fuel grass oil and oil cake.
(IX) Fruits and vegetables fresh.

15. For perposes of taxation, the weight shown in the Railway invoices produced by the Consignee shall ordinarily be taken as the correct weight of the goods covered by the invoice and tax on them shall be icalculated accordingly.

16. Whoever with the intention of evading the payment of the duty that may be levied on the goods imported within Municipal Limits carries the goods so imported outside the Municipal Limits the day on which they are imported simply for the purpose of obtaining a refund of the duty levied on them and brings them back within Municipar Limits afterwards shall be deemed to have committed a breach of these lules & shall be liable to be prosecuted and on conviction shall be punished with a fine not exceeding Rs. 50.

*V. M. MAHAJANI*
Vice Chairman
*Municipal Committee.*

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध २ शके १८२५

## वऱ्हाडांतील जनावरांत सुरू असलेला रोग.

वऱ्हाडांतील प्रत्येक जिल्ह्यां पैकीं थोड्या बहुत खेड्यांतून हल्लीं एक प्रकारचा जनावरांत रोग सुरूं आहे. तो रोग जनावरांच्या कांहीं विवक्षित जातींत दृष्टोत्पत्तीस येतो ह्मणजे गाई, बैल, ह्मशी, रेडे, पारडें इत्यादिकांला हा रोग होतो व त्यांतल्या त्यांत ३ वर्षांच्या आंतल्या वांसरांना व पारडांना मुख्यतः होतो. सदर्हू रोगाला इकडे कांहीं भागांत एक फऱ्या, एक टांग्या ह्मणतात. दुसऱ्या ठिकाणीं त्यांत दिसून येणार लक्षणांवरून प्लेग, गोळी असेंही ह्मणतात. इतरत्र हा रोग पूर्वीं कधींही पाहण्यांत न आल्यामुळें त्याचें नांव लोकांनां माहित नाहीं व त्याला रोग, दर्द, इत्यादि नांवें देण्यांत येतात. ह्या रोगाला इंग्रजींत ब्लॅक लेग, कार्बन इव्हल अशीं नांवें आहेत. मराठींतील पहिलीं एक दोन नांवें व इंग्रजींतील नांवें अन्वर्थक असोन रोगाच्या लक्षणांवरून पडलेलीं दिसतात.

हा रोग काय कारणानें होतो त्याचें ज्ञान इकडील लोकांस नाहीं. पाश्चिमात्य वैद्यकांत सदर्हू रोग एक नऱ्हेच्या जंतू मुळें उत्पन्न होतो असें निश्चयात्मक रीतीनें ठरलें आहे. हे जंतू हवेंत इतस्ततः फिरत असतात व उष्णता, थंडी, खाणें पिणें इत्यादिकांच्या कमी जास्त प्रमाणानें एखाद्या जनावराची प्रकृती गलित होऊन रोगाचें बीज घेण्यास तयार होते. अशा स्थितींत सदर्हू जंतू चारा पाणी इत्यादिकां बरोबर पोटांत अगर हवे बरोबर फुप्फुसांत जातात, तेथून ते रक्तांत प्रवेश करितात. रक्तांत गेल्या नंतर त्यांच्या जीवनाला योग्य असे पदार्थ ते खाऊन फस्त करूं लागतात व त्या योगानें प्रकृतीस नेहमी प्रमाणें शुद्ध रक्त मिळेनासें होतें. ह्याचा परिणाम रोगाचीं बाहेरून दिसणारीं लक्षणें व अखेरीस मृत्यु! वर निर्दिष्ट केल्या प्रमाणें हे जंतू रक्तांत शिरून रक्ताची परिस्थिती नेहमीपेक्षां विपरीत झाल्यानें हा रोग होतो. ज्या द्रव्यांवर जनावरांचें जीवन सर्वांशीं अवलंबून असतें तें द्रव्य संपून जातें व त्यामुळें प्राप्त होणारी स्थिती अपरिहार्य व परिणामीं बहुत करून भयंकर होते. अशा प्रकारानें अजारी झालेलें जनावर क्वचितच वांचतें. शेंकडा मृत्यूचें प्रमाण ९० पर्यंत असतें असें आढळण्यांत येतें.

सदर्हू रोगांत दिसणारीं लक्षणें ह्मणजे. जनावर एकाएकीं खाणें पिणें सोडून देतें, रवंथ करणेंही त्या बरोबर बंद होतें; जनावराचे तोंडांत हात घातला असतां तोंड अती ऊन असतें. थोडा वेळ जातो न जातो तो चाऱ्ही पायांपैकीं कोणत्याही एखाद्या पायाच्या फऱ्यावर अगर शरीराचे इतर भागांवर एक लहानशी सूज उत्पन्न होते. ती जलदीनें सपाटून वाढत जाते व सर्व फरा सुजतो. सूज आलेल्या जागीं दाबलें असतां प्रथमतः जनावरांस अती दुःख होतें व ती जागा गरम असते. जसजशी सूज वाढत जाते तसतशी त्यांतील उष्णता कमी होत जाते व कागद दाबल्यानें जसा कडकड आवाज होतो तसा ती सूज दाबल्यानें होतो. कांहीं जनावरांत ही सूज फारच मोठी झाली ह्मणजे वरची कातडी ताणली जाऊन आपोआप फुटते व त्यांतून काळें अगर पिंवळट पातळ रक्त वाहतें व ज्या भागांवरून तें वहातें ते उभरल्या सारखे होतात. दुसऱ्या जनावरांत ही सूज कायम असतांनाच जनावर मरतें. सूज फुटल्या नंतर जनावर बहुत करून बचावत नाहीं. त्याच्या पूर्वीं कदाचित् बरें होण्याचा थोडा बहुत संभव असतो.

वर सांगितलेलीं लक्षणें फारच झपाट्यानें होतात. ह्मणजे जनावर अस्वस्थ झाल्या पासून २ तासांपासून ३६ तासांत हीं सर्व लक्षणें दिसून तें मरतें.

आतां पर्यंतच्या एकंदर विवरणा वरून असें दिसून येईल रोगाची उत्पत्ती जंतू पासून असून त्याचा वेगही फारच जोराचा व झपाट्याचा असतो; ह्यामुळें औषधोपचार करण्यास अवसर सांपडत नाहीं; व जरी सांपडला तरी रोगाचें मूळ जंतू असल्यानें उपयोग होत नाहीं. ह्यासाठीं आतां पर्यंत रामबाण अगर चांगलासा उपाय सांपडला नाहीं. ह्मणून रोग न होईल अशी तजवीज केल्यास रोगाचा प्रसार होत नाहीं व रोगही लौकर नाहींसा होतो. प्रतिबंधक उपाय खालीं दिल्या प्रमाणें आहेत ते जनावरांच्या प्रत्येक मालकानें केले असतां फार फायदा होतोः—

(१) रोगी जनावर निरोग्यां पासून दूर ठेवावें. या साठीं गांवाचे बाहेर पूर्वेच्या अगर उत्तरेच्या भागाला ३०० यार्डांवर एक झोंपडें बांधुन त्यांत त्याला ठेवावें.

(२) निरोगी जनावरें पूर्वीं ज्या शेतांत अथवा कुरणांत चारण्यास नेत असत तेथें न नेतां दुसऱ्या ठिकाणीं न्यावींत.

(३) निरोगी जनावरांचे लहान लहान कळप करून एकमेकां पासून निरनिराळे ठेवून वेगवेगळ्या ठिकाणीं चारावे.

(४) निरोगी जनावरांतील एखादें जनावर अजारी व अस्वस्थ झाल्यास अगर त्याच्या खाण्या पिण्यांत नेहमीं पेक्षां फरक दिसून आल्यास त्याला वेगळें काढून ठेवावें.

(५) निरोग्यांना रोज लहान मोठ्या प्रकृती प्रमाणें २ पासून ५ तोळे मीठ सकाळ सायंकाळ प्रत्यहीं द्यावें.

(६) रोगी जनावराला अलग ठेवल्यावर त्याची शुश्रूषा करण्यासाठीं ठेवलेल्या माणसांनें चुकूनही चांगल्या जनावरां जवळ येऊं नये.

(७) निरोगी जनावरें पूर्वीं ज्या ठिकाणीं चारण्या नेत असत तीं पाणथळ, दलदलीची अगर अस्वच्छ असल्यास त्यांना उंच, मुरमाड जागेवर चारण्यास न्यावींत.

(८) अजारी जनावर मेल्यास त्याची जास होता होईल तों पर्यंत जाळावी. जाळण्याची सोय नसल्यास ४ हात खड्डा खोदून अगोदर कळीच्या चुन्याची भुकणी घालून वर लास ठेवून त्यावरही चुन्याचा थर द्यावा. व खड्डा चांगला मजबूत भरावा व जंगली जनावरांनीं लास उकरून काढूं नये ह्मणून खड्डा भरते वेळीं काटेरी झाडें अगर झुडपें भरावीं.

(९) आजारीं जनावर ज्या जागीं बांधलें असेल तेथील चारा, पाणी शेण वगैरे खड्यांत पुरावें. लांकडी सामान फिनाईल, रसकापूर इत्यादिकांचे पाण्यानें धुवून काढावे. व गोठ्यांत गंधक वगैरे जाळावा.

(१०) जनावर अजारी असतांना त्याचे खाण्या पिण्याची शुश्रूषा करणें वगैरे गोष्टीकडे मालकांनीं विशेष लक्ष्य द्यावें.

सदर्हू प्रमाणें व्यवस्था केल्यास रोगाचा प्रतिबंध लौकर होतो. व ही व्यवस्था जनावराचे प्रत्येक मालकास थोड्याश्या प्रयत्नानें करितां येईल.

---

आमचे पूज्य गुरुवर्य डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांनां मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें एल्. एल्. डी ही सन्मानाची पदवी देण्याविषयीं सर्वानुमतें नुकतेंच ठरविलें आहे ही आनंदाची गोष्ट होय.

विद्वद्रत्न डा० भांडारकर ह्यांना ह्या पदवीच्या योग्यतेची पदवी (पी एच डी) जर्मनींतील गॉटिंजन युनिव्हर्सिटीनें ह्या पूर्वींच दिली आहे, व युरोप व अमेरिका खंडांतील दुसऱ्या विद्वन्मंडळांनीं डाक्टर साहेबांस आपले सभासद करून त्यांच्या विद्वत्ते विषयीं आपला आदर प्रदर्शित केला आहे. ह्या प्रमाणें डा० साहेबांच्या विद्वत्तेची कीर्ती ह्या पूर्वींच जगद्विख्यात झाली आहे तथापि डाक्टर साहेबां बद्दल आमचा जो इतका आदर आहे तो त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास सुलभ करण्या करितां जीं दोन क्रमिक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, किंवा संस्कृत वाङ्मयवर जे त्यांनीं कित्येक लेख प्रसिद्ध केले आहेत ह्यामुळेंच नसून, डाक्टर साहेब गुरु ह्या नात्यानें आपल्या शिष्यांच्या हृत्पटलावर विद्येची जी अनुपम आवड उमटवीत असत तिजमुळें तो आहे. आमच्या प्रमाणेंच ज्या इतरांस डाक्टर साहेबांच्या व्याख्यानामृताचा आस्वाद घेण्याची संधि मिळाली असेल त्यांनाच आमच्या ह्मणण्याचा प्रत्यय येणार आहे. मुंबई इलाख्यांत युनिव्हर्सिटी स्थापन झाल्या पासून डॉ. वर्डस्वर्थ साहेबांसारखे विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची अनुपम गोडी उत्पन्न करणारे दुसरे शिक्षक आले नाहींत, परंतु त्यांच्या मागून त्याच्या तोडीचे डाक्टर साहेबच होत असें आह्मी मोठ्या आनंदानें ह्मणतों. ह्या शिवाय ज्या विशेष गुणामुळें डाक्टर साहेबांची प्रख्याति झाली तो गुण हा कीं, पाश्चात्य पद्धतीनें संस्कृत वाङ्मयाचें संशोधन करून त्यांतून सिद्धांत कसे काढावे हें त्यांनीं नवीन प्रिढीस आल्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे. विद्येचा निरपेक्ष व्यासंग, सत्यभंग होऊं न देतां जुन्याबद्दल अभिमान व आपलें मत निर्भिडपणें प्रदर्शित करणें हे गुण डाक्टर साहेबांच्या अंगीं विलक्षण रीतीनें वास करीत आहेत; त्या गुणामुळें डाक्टर साहेबांच्या अंगीं एकदेशीयत्वाचा दोष जरी कित्येक प्रसंगीं येतो, तरी त्या गुणांमुळें डाक्टर साहेबांस "विद्वन्मुकुटमणि" हें उपपद उत्तम शोभतें; ह्मणून मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें केलेल्या सूचनेबद्दल आह्मी त्यांचें योग्य अभिनंदन करितों, व डाक्टर साहेबांचा सहवास आह्मां महाराष्ट्रीयांस बऱ्याच काळ पावेतों मिळो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

गेल्या मंगळवारीं येथील लायब्ररींत वर्गणीदारांची जी विशेष सभा भरविण्यांत आली होती त्या सभेच्या कामा विषयीं उल्लेख करण्याचा प्रसंग आह्मांस आला आहे ह्या बद्दल आह्मांस खरोखरच फार खेद होत आहे. लायब्ररीच्या सेक्रेटरी पैकीं एकाच्या हातून दोन तीन गोष्टीं संबंधानें नियमांच्या विरुद्ध वर्तन घडून आलें ह्मणून त्या विषयीं विचार करण्याकरितां अकरा वर्गणीदारांच्या निमंत्रणा वरून सदर्हू सभा भरविण्यांत आली होती; त्या संबंधानें एका वर्गणीदाराचें भाषण झाल्या बरोबर सदर्हू सेक्रेटरी तर्फे त्यांचे मित्र दुसरे सेक्रेटरी ह्यांनीं झालेल्या चुक्या कबूल केल्या व पुढें अशा तऱ्हेच्या चुक्या घडून येणार नाहींत अशा बद्दल आश्वासन दिलें. येथपर्यंत झालेल्या प्रकारांत कोणत्याही प्रकारची वावगी गोष्ट घडून आली नाहीं परंतु ह्या नंतर जो अनिष्ट प्रकार घडून आला तो झालेल्या चुकाबद्दल सदर्हू सेक्रेटरींना शिक्षा ह्मणून त्यांनां राजिनामा देण्यास सांगावें कीं काय ह्या बद्दल होता. एका पक्षानें असें ह्मणणें होतें कीं सदर्हू सेक्रेटरींनीं राजिनामा द्यावा व दुसऱ्या पक्षाचें असें ह्मणणें होतें कीं ज्या अर्थीं सदर्हू सेक्रेटरींनीं आपल्या चुका कबूल केल्या आहेत, त्या अर्थीं हें प्रकरण येथेंच थांबावें. अखेरीस बहुमतानें सदर्हू प्रश्नाचा निकाल दुसऱ्या प्रकारें झाला ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु ह्या प्रसंगीं विशेष दुःख कारक गोष्ट घडली ती ही कीं ज्यांकडे भावी प्रजेस वळण द्यावयाचें जबाबदारीचें काम आहे, अशा कित्येक शिक्षकांनीं व ज्यांना शिक्षणाचे कामीं वळण देण्याचें ज्यांचें काम आहे अशा एका सभासदानें विकारवश होऊन, आपल्या मनाची शांति घालविली व प्रसंगास अनुचित असे आलाप केले!! शाळाखात्यांत जे नोकर आहेत त्यांजविषयीं आमचा आदर असणें हे आमचें कर्तव्य होय. कारण ते जरी साक्षात् आमचे गुरु नसले तरी ज्या पूज्य पीठावर बसून पूर्वीं आमच्या शिक्षकांनीं आह्मांस ज्ञानामृत पाजिलें त्याच पीठावर ते आज अधिकृत आहेत. ह्यामुळें त्यांचे दोष काढण्यास जरी आमची लेखणी कचरत आहे, तरी प्रसंग पडल्यास वेदास आपल्या पूज्य पित्यावरही शस्त्र क्रिया करण्याचा प्रसंग येतो त्यावेळीं त्यानें स्वतःच्या हितास जागे रहाण्याच्या सद्हेतूनेंच आपल्या पूज्य पित्यावर शस्त्र क्रिया करण्यास कचरतां कामा नये हें उदाहरण ध्यानांत धरून आह्मी सदर्हू गृहस्थांचा दोष दाखविला आहे. शांत वेळीं आमचे पूज्य मित्र आपली चुकी कबूल करितील अशी आह्मास आशा आहेच.

---

## खूनी खटले.

( आकोला सेशन )

पहिला खटला तारीख १७ सोमवार रोजीं निघाला. यांत तादूळवाडी तालुका मलकापूर येथील रुप्या नांवाचा एक मारवाडी उमर वर्षे १६।१७ व रावजी पाटील उमर वर्षे ३० असे दोघे आरोपी होते. खूनाची गोष्ट अशी कीं रावजी हा गोंडिया असून त्याच्याशी निनू नांवाचा मनुष्य लागू होता. उभयताची दोस्ती वर्ष दीड वर्ष चालून निनूची बायको सारजी इस ही गुह्यमैथूनाची गोष्ट कळली व तिनें आपले नवऱ्यास तसें करण्यास प्रतिबंध केला. या वरून निनूनें महिना दीड महिना रावजीचें नाव सोडलें. रावजीस या वरून वाईट वाटून यानें तारीख ३ एप्रिल रोजीं रुप्या मारवाड्याच्या हातानें साखरेंत विष घालून शेरणी ह्मणून सारजीस दिलें. तिनें थोडी साखर लाऊन बाकीची चांगली न लागल्यामुळें जमिनीवर तशीच पडू दिली. इतक्यांत तिचे शेजाऱ्याचा ४ वर्षांचा मुलगा गणू हा येऊन त्यानें ती साखर खल्ली व त्याच साखरेपैकीं कांहीं गणूची बहिण भागी इनेंही खल्ली. दुर्दैवानें गणू मरण पावला. भागी व सारजी या दोघी वांचल्या. सदर्हू मोकदम्यात विश्वसनीय पुरावा नसल्यामुळें आरोपीस दोषमुक्त करून सोडण्यांत आलें आरोपी तर्फे रा० रा० लक्ष्मण गोविंद ओक, केशव गोविंद दामळे व रामचंद्र विष्णु महाजनी असे तिघे वकील होते.

दुसरा खटला लोणी गवळी तालुका मेहेकर येथील होता. धोंडी वल्लद बनूजी कुणबी व धोंडी वल्लद रामजी माळी हे उभयतां आपले खळ्यात मळणीचें काम करीत असतां तारीख २३ मार्च रोजीं रात्रौ बारा वाजल्यावर मारुती, गणपती, दवल्या, दर्याजी, संतु, महादू व इंद्रभान यानीं उभयता धोंडीस अतिशय मारपीट केली. यामुळें धोंडी कुणबी मयत झाला व धोंडी माळी यांस अतिशय जखमा होऊन योग्य रितीचा औषधोपचार दवाखान्यांत झाल्यामुळें तो वाचला. आरोपी लोकांवर आरोप असा होता कीं धोंडी कुणबी यासी मारुतीची बायको राधी ही लागू होती आणि यामुळें मारुती व याचे आप्त व साथीदार यानीं धोंडी कुणबी यांस मारलें व खळ्यातून वापस जात असतांना खळ्याच्या दुसऱ्या बाजूला निजलेला धोंडी माळी यानें त्यास ओळखलें. व तो मारुती वगैरे लोकांस धिक्कारून बोलूं लागला ह्मणून ते सर्वजण याच्यावर तुटून पडले. हा मरता मरता मोठ्या पराकाष्ठेनें वांचला. आरोपी पैकीं महादु यांस सरकारानीं माफी देऊन साक्षीदार केलें व त्यानें गुन्ह्याची इत्थंभूत हकीकत खालच्या कोर्टांत कळविली. परंतु सेशन कोर्टांत यानें आपणास कांहीं माहित नसल्याचें सांगितलें व दुसरा महत्वाचा साक्षीदार धोंडी माळी याच्या जबानीत फार महत्वाचा फरक पडल्यामुळें त्याच्यावर विश्वास ठेविता येईना ह्मणून आरोपीस सोडन देणें भाग पडलें. याचा अर्थ असा कीं गुन्हा खरोखर झाला असून पुरावा नसल्यामुळें आरोपीस दोषमुक्त करण्यांत आलें. आरोपी तर्फे रा. रा. नारायण काशिनाथ दांत व केशव गोविंद दामले असें दोघेजण वकील होते.

लॉर्ड कर्झन ह्यांनीं नेमलेल्या इरिगेशन कमिशननें केलेल्या चौकशीचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. दुष्काळ निवारणार्थ हिंदुस्थानांत हल्लीं आहेत त्यापेक्षां जास्त कालवे काढणें शक्य नाहीं असें जरी कमिशनचें मत आहे तरी पुढील २०।२५ वर्षांत कोणतीं कामें घेण्या सारखीं आहेत त्या बद्दल कमिशननें आपल्या रिपोर्टांत शिफारस केली आहे. दुष्काळ प्रतिबंधक उपाय ह्मणून मोठे तलाव बांधणें हें जरी इष्ट आहे तरी तो उपाय साध्य असणें हे त्या त्या ठिकाणच्या स्थितीवर बऱ्याच अंशानें अवलंबून राहील. उत्तर हिंदुस्थानांत सिंधु, गंगा, यमना व दक्षिणेंत कृष्णा, तुंगभद्रा ह्या नद्यांच्या पात्रांतून कालवे काढले असतां बराच फायदा होण्याचा संभव आहे परंतु त्या ठिकाणीं कालवे पूर्वींच काढले असल्यामुळें, त्या कालव्यांपासून शेतकऱ्यांना कोणत्या उपायांनीं हल्लींपेक्षां जास्त उपयोग होणार ह्याची तजवीज सरकारानें केली पाहिजे. तथापि ज्या प्रांतांत असे कालवे करण्याची सोय नाहीं तेथील सरकारानें शेतकऱ्यांनां आपल्या शेतांत नवीन विहिरी करण्या विषयीं जास्त उत्तेजन दिलें पाहिजे; व ह्या उद्देशानें यानां तगाई देण्याकरितां सरकारानें जास्त सवलती दिल्या पाहिजेत असें कमिशनचें मत आहे. विहीर बांधण्या करितां शेतकऱ्यास जी रक्कम कर्जाऊ द्यावयाची त्या रकमेवर व्याज हल्लीं पेक्षां माफक ह्मणजे दरसाल दर शेंकडा ६। ऐवजीं दरसाल दर शेंकडा ५ रुपये प्रमाणें मात्र आकारण्यांत यावें अशी सदर्हु कमिशनची शिफारस आहे. त्याच प्रमाणें सदर्हु रकमेची फेड करण्याची मुदत हल्लीं पेक्षां जास्त वाढविणें इष्ट आहे असें ही कमिशननें मत आहे. मात्र सदर्हु कामीं जास्त खर्च केल्या पासून कुळास जें जास्त उत्पन्न होणार त्यावर जर पैमाषीच्या वेळीं सरकारची नजर राहील तर शेतकऱ्यांना आपल्या शेतांत नवीन विहिरी करण्याची बुद्धि होणार नाहीं एवढ्या करितां अशा रीतीनें शेतीची सुधारणा केल्यास त्यावर सरकारानें आपली साऱ्याची रक्कम वाढवूं नये अशी ही कमिशनची शिफारस आहे. ह्या शिफारसी प्रवर्तक अधिकाऱ्यांनीं ध्यानांत बाळगिल्या असतां शेतकऱ्यास कुरकुर करण्यास जागा राहणार नाहीं.

## अखेरी.

( मध्यप्रांताशी संमेलन )

वऱ्हाड प्रांत कौलपट्ट्यानें घेतल्या दिवसा पासून त्याच्या भावी राज्यकारभारा संबंधानें पुष्कळच भवति न भवती चालूं होती. ह्या प्रश्नाची एकदां अखेरी लागली ही मोठी आनंदाची गोष्ट होय. स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं मंजूरी दिली आहे कीं व्हाइसराय साहेबांच्या सूचने प्रमाणें हा प्रांत मध्यप्रांतास जोडण्यांत येईल. भावी राज्यकारभाराविषयींचे हुकूम लवकरच बाहेर पडतील. तर्क चालविण्याची हद्द संपली आणि आतां प्रत्यक्ष दर्शनाचा काळ आला आहे. ईश्वर करो आणि मध्यप्रांताशी जडणारा संबंध सुखकर होवो!

## The Berar Samachar

MONDAY AUGUST
24 1903

We are glad to learn that our Municipality here, guided as it is by an experienced Deputy Commissioner like Mr. Rustomji, has been up and trying its best to avert the impending Plague which every day threatens to pay a second visit to our town. We learn that it has been decided to divide the town into circles and sub circles as at the time of the last census and to entrust each circle and subcircle, to the members of the Municipality and other private individuals who will volunteer their services for the sake of this town. The chief duty which is intended to be entrusted to the Inspector of each subcircle is to report daily all arrivals from plague—infected area, to the circle Superintendent and to watch them for ten days after arrival. The services of these volunteers are also to be utilised for inducing the people to evacuate their houses, in case plague breaks out here. We are glad that the Municipality has hit upon the proper agency to make the plague—measures popular among towns-people. But we fail to see a similar propriety in engaging the services of private individuals—who have not unlimited time, energy or intelligence to devote for the interests of this town, for collecting the information about arrivals and reporting the same to the circle Superintendents. The task, to say the least, is impracticable, considering the extent of the town as well as the number of Taluks and Districts which would be described as "infected area." Besides the task is more or less one that would be adequately performed by a medical man only. Under these circumstances, we are afraid that the measure of watching the arrivals, will only be worked *on paper*. It will be better then to make it compulsory on all persons who arrive, to present themselves to the Hospital Assistant for ten days. This system was in vogue some time ago and we have no means to know why it was discontinued. We invite therefore the attention of our Municipality and Mr. Rustomji, to the suggestion made above, and request them to try it once more to the advantage of the persons arriving as well as the towns-people.

The services of these volunteers are also intended to be utilised for advising people in times of plague to allow more air and sunshine to come into their houses and to burn the floor of the house where a plague case occurs. It appears from this that the Municipality has almost decided to drop the unnecessary expenditure on disinfection which was undertaken during the last plague campaign. We are glad that our Municipality has decided to grow wiser by the example of sister Municipalities in the neighbouring Presidency.

The next measure that the Municipality has decided to adopt, is to collect subscriptions to afford help to the poor to erect temporary huts in times of plague. What persons deserve to be helped in this way will be decided by the Circle Superintendent, Division member and the Vice—Chairman. People are, also to be informed that persons wishing to erect huts, need not apply to the Deputy Commissioner, for permission, provided they erect *temporary* huts only and on sites approved by the Commissioner.

—:0:—

It is officially announced that Berar will be attached to the Central Provinces for administrative purposes. This is the substance of a telegram published in the Daily papers of Bombay and Calcutta. The Secretary of State has sanctioned the proposal of the Government of India to attach Berar to the Central Provinces and we hope that the further arrangements for giving early effect to the proposal will shortly be published in the form of a notification. The scheme of amalgamation is already decided upon by the government of India and we think that the numerous details of administration will probably run along the lines which are indicated in the official proposal of dividing this province into four districts instead of the six districts of the present day. We hope that this union with the Central Provinces will ever be the fore—runner of days of plenty and prosperity in future.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—पाऊस नकोसा झाला आहे एकंदर २३ इंचावर पाणी पडलें. हवेंत थंडावा व गारवा वाटतो किरकोळ आजार जोरावर आहेत.

मे० मिडो साहेब डिपुटी कमिशनर हे विलायतेहून शुक्रवारीं येथें आले आणि ते वाशिमचे डिपुटी कमिशनरीवर आज रुजू होतील.

सेशन कोर्टापुढें अखेरचा तिसरा खुनाचा खटला शुक्रवारा पासून चालूं आहे. आज बहुतकरून त्याचा निकाल लागेल.

अपघात—येथील पूर्णेकडील खडकीच्या नाल्यांतून दोघे इसम घोड्यावरून येत असतां ओढ्याच्या पाण्याला जोर फार होता त्यामुळें घोडे वहून गेले आणि त्यावरील स्वार पाण्यांत बुडून मेले !

उमरावतीला प्लेगानें कहर मांडला आहे. दररोज तेथें वीस पंचवीस माणसें मरतात कित्येक घरातील चार चार पांच पांच मनुष्यें एका मागून एक मेलीं आणि कांहीं घरांला कुलूपें लागलीं आहेत. वाशिमासही प्लेगानें पाऊल थोंड पुढें आहे. आकोटास प्लेग थोडासा नमल्या सारखा दिसतो.

रा० रा० दत्तात्रय भास्कर जयवंत यांनीं काल सायंकाळीं 'बहिष्कारा' वर व्याख्यान दिलें. विचार सरणी सर्वमान्य होती.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८= |
| सोनें २४॥ | चांदी ७० |
| जवारी | ३०।३५।४० जवस ९० |
| गहु | ८५ ते १०० |
| बाजरी | ५०।५२॥ |
| मीठ | ४।= रु. मण |
| चणे | ३८— रु. मण |
| तूप | ८ रु. मण |
| तेल | ५८= रु. मण |
| रुई | ५० |

## वर्तमानसार

पाऊस पडण्यास सुरवात चांगली झाली ह्मणून "दुष्काळाची भिती मुळींच उरली नाहीं" असें विधान स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं करण्यास धजावें हे फार आश्चर्यकारक होय. एक दोन पावसावरच जर पिकांची मदार असती तर १८९७ सालीं पुष्कळ पाऊस पडूनही दुष्काळ कां पडता ? पण हें यांना कळावें कसें ?

गोरे नांवाच्या एका नेटिव्ह ख्रिस्ति मनुष्याला दिल्लीदर दरबारच्या वेळीं एका मोठ्या हॉटेलांत असिस्टंट मॅनेजर नेमले होते त्याच हॉटेलांत मि. वुइलीयम्स एम्. पी. हे उतरले होते. त्यांचे एक चेक बुक वरील गोरे यानें चोरून त्यापैकीं १९० पौंडाचा बनावट चेक लंडन बॅंकेवर दिला. दुसरा एक चेक मेसर्स वुईलियम वाटसन आणि कंपनीवर दिला. हें सारें बनावट कृत्य पोलीसला समजतांच त्यास पकडण्यांत आले. मुंबई पुण्यास याची चौकशी होऊन त्याला आगगाडींतून नेत असतां तो अबूच्या पाहाडांत पळून गेला पुन्हां त्याला ४१२ दिवसांनीं फकीराच्या वेषानें पकडण्यांत आले व दिल्लींत नेण्यांत आले आहे.

कलकत्याकडील टुंगेल येथें अधरचंद्र यानें पंचानंदपाल याची लग्नाची बायको पळवून नेल्याच्या आरोपावरून त्याला ६ महिन्याच्या सक्त मजुरीची शिक्षा मिळाली. अशा तऱ्हेचे गुन्हे तिकडे फार होत असल्यामुळें माजिस्ट्रेट साहेबांनीं ही मुद्दाम शिक्षा दिली आहे.

हैद्राबादचे सय्यद अबदुल रहिम आणि सय्यद जानी मिया यांनीं मुंबईतील श्रीराम व्यापारी लोकांस मोठ्या दगलबाजपणानें फसविल्यामुळें मि० कर्सनदास छबिलदास यांनीं निरनिराळ्या अपराधाबद्दल मिळून ९ वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा दिली.

मुंबईस ईश्वरदास नरोत्तमदास नावाच्या ब्राह्मणानें मुळजी जेठाच्या दुकानांत सुमारें ६७ रुपयाच्या कापडाची चोरी केली. म्याजिस्ट्रेट पुढें यानें आपला अपराध कबूल केला, परंतु मी ब्राह्मण आहे मला जेलांत गेल्यावर प्रायश्चित्त घ्यावें लागेल वगैरे यानें सांगितलें. शिवाय मोठ्या प्रामाणिकपणानें त्यावेळे पावेतों वागल्याबद्दलही यानें सांगितलें त्या वरून मि० कर्सनदास छबिलदास यांनीं दयाळु होऊन याला १२ फटक्याची शिक्षा दिली.

हिंदुस्थानांतील शेती सुधारण्यासाठीं अमेरिकेंत जी कंपनी स्थापित झाली आहे, तिच्या तर्फे एक आगबोट शेति संबंधाची हत्यारें व इतर सामान घेऊन इतक्यांत इकडे यावयास निघणार आहे असें कळतें. आमच्याकडील धनीक लोकांनीं यांचा अगत्य विचार करावा.

खुनाबद्दल तीन वर्षे— मार्टिन नांवाच्या एका गोऱ्यानें संग्रामनगर येथील एका एतद्देशीयाला गोळी घालून ठार मारलें ह्मणून त्याची चौकशी जुरीपुढें होऊन; त्याणें अजाणपणानें गोळी घातली असें ठरलें व त्याला तीन वर्षे सक्त मजुरी कैदेची शिक्षा झाली असें समजतें।

ख्रीस्तत्व प्रमाव—भोपाळच्या बेगम साहेबांनीं आपल्या संस्थानभर, स्त्रियांना शिक्षण देण्याच्या शाळा स्थापण्याचे ठरविलें आहे.

यंदा आमच्या हिंदुस्थानांतल्या रेल्वेना, गुदस्तापेक्षां जवळ जवळ ४० लाख रुपये अधिक मिळकत झाली. तथापि तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची योग्य सोय करण्याचा कंपनीचा विचार दिसत नाहीं.

सरकारी नोकरींतून बडतर्फ होणाऱ्या इसमास वकिली करितां यावयाची नाहीं, असा एक ठराव मद्रास हायकोर्टानें केला आहे.

विलायतच्या पोष्टखात्यांत इ० सन १८७० ह्या वर्षी स्त्रियांस जागा देऊं लागले त्यांत सध्यां १,०९,००० स्त्रिया कामावर आहेत.

दिल्ली दरबारचे वैभव पाहून डोळे दिपल्यामुळेंच कीं काय दक्षिण अफ्रिकेला ठेवावयाच्या नवीन ब्रिटिश सैन्याचा कांहीं खर्च हिंदुस्थानावर घालावा असे सर मायकेल हिक्सबीच ह्मणत आहेत.

सोलापूर येथील फडके वकिलाच्या मुलानें दुसऱ्याच्या नांवावर १९०२ च्या दिसेंबरांत स्कूलफायनलची परीक्षा दिली व पास सर्टिफिकिट मिळविलें अशाबद्दल बेळगांवास खटला चालला आहे. ज्यानें नांव बदलून परीक्षा दिली, तो इसम सोलापूर कलेक्टर कचेरींत क्लार्क आहे !

कडक अधिकारी— ब्रह्मदेशांतील एका जज्ज कोर्टांत एक बॅरिस्टर सर्दी झाल्यामुळें दोन चार वेळ शिंकला, तेव्हां जज्जानीं त्याला कोर्टांतून निघून जाण्यास फर्माविलें. बॅरिस्टरानें त्याजवर जज्जाला समर्पक उत्तर दिलें. परंतु जज्जाचा आग्रह राहिना. तेव्हा त्या कोर्टांतील सर्वच वकील मंडळी कोर्टांतून एकदम उठून गेली असें कळतें ! वि. वि.

गाहाणखत कोणत्याही रकमेचें असो, तें रजिस्टर असलेंच पाहिजे, अशी सुधारणा ट्रान्सफर आफ् प्रॉपर्टी अक्टांत करण्याचें बिल हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत दाखल झालें आहे.

ठराव— कोणत्याही सुटीला जोडून किरकोळ रजा देऊं नये असा एक सरकारचा ठराव झाल्याचें समजतें.

दक्षिण आफ्रिकेंतील सैन्याचा खर्च हिंदुस्थानावर लादल्यानें लोकमत फार क्षुब्ध झालें आहे. हें कृत्य अन्यायाचें व गैरमुत्सद्दीपणाचें असून त्यामुळें ब्रिटिश इभ्रत व न्यायबुद्धि या संबंधाच्या इंग्रजांचें लौकिकास मोठा धक्का बसेल अशा अर्थाची तार ना. मेथा यांचे मार्फत प्रे. असोसियेशननें हिंदुस्थान सरकाराकडे पाठविली.

सरकारी नोकराचा व युनिव्हर्सिटी परीक्षेचा संबंध नसावा अशी परवांच्या युनि० कमिशनची सूचना होती ती प्रमाणें मुंबई युनिव्हर्सिटीनें आपली स्कुलफायनल परीक्षा पुढील सालापासून बंद करून ती सरकारी शाळाखात्याकडे सोंपविली आहे.

शेतसाऱ्याचें माणशी प्रमाण— मुंबई इलाख्यांतील शेतसारा दर माणसीं ३ रुपये मद्रासेस माणशी १८७ व बंगाल्याकडे माणशी ०८ आणे बसतो. न्या. सिं.

फ्रेंच मिनिस्टर ऑफ दि इंटिरिअर एम्. कॉंबीस हे ता० ९ रोजीं मार्सेंलीस येथें गेले लोकांनीं यांचा मोठा सत्कार केला त्यांना एक बडी मेजवानीही दिली. नंतर गाडींतून जात असतां एका इटालिअन मनुष्यानें छपवून आणलेला रिव्हाल्व्हर दोनदां एम्. कॉंबीस यांजवर झाडला ईश्वरानें खैर केली. नाहीं तर ते प्राणास मुकते. तो इसम हल्लीं अटकेंत आहे.

हिंदुस्थानचें बजेट ता० १३ रोजी लार्ड जार्ज हमिल्टन यानीं पार्लमेन्टपुढें मांडलें सैन्याच्या खर्चाबद्दल वादविवाद झाला. लार्ड कर्झन व किचनेर यांचें एक मत पडल्यामुळें हा खर्च हिंदुस्थानावर लादण्याचें रहित झालें, आतां आफ्रिकेंत फक्त १९००० सैन्य वण्यांत येणार आहे.

दुगल नांवाच्या एका विलायती माणसानें कित्येक स्त्रियांना, आपल्याशीं लग्न करण्याच्या नादाला लावून त्यांना जवळ ठेऊन घेऊन, त्यांची चीज वस्तु लुबाडून घ्यावयाची आणि त्यांना त्रास देऊन घालवून द्यावयाचें, तें न साधल्यास विषप्रयोग करून त्यांना हा लोक सोडायला लावावयाचें, असा क्रम त्याचें वय ९० वर्षांचें होई पर्यंत त्याणें स्वीकारला होता. अखेर त्याचा एक गुन्हा उघडकीस आला व त्या चौकशींत सर्व कारस्थान ( मागील ) उघडकीस आले, सबब त्याला फाशीचा शिक्षा देण्यांत आली!

जयपुरास मिशनऱ्यांना बराच सुळसुळाट चालला आहे. त्यांनीं तेथील मुनसफ गणपत लाल व जानकीबाई नावाची डाक्टरीण त्यांना आपल्या कळपांत ओढलें आहे. जयपुरच्या महाराजानीं या दोघांना सस्पेंड केलें आहे, गांवातील लोकांनीं कोणीही आपलीं मुलें मिशनरी शाळेंत पाठवूं नयेत व कोणाही मिशनरी बायास घरीं येऊं देऊं नये असें ठरविलें आहे.

नाभ्याचे महाराज सिमला येथें देशी लोकां करितां एक भोजन गृह बांधण्यास मदत देणार आहेत.

पर्थ एथें क्रिकेटची मॉच चालली होती. ती पहाण्या करितां पुष्कळ मंडळी जमली होती. व निरनिराळ्या बैठका तयार केल्या होत्या. त्या बैठकांपैकीं एका बैठकीवर १९०० प्रेक्षक मंडळी बसली असतांना एकाएकी ती बैठक कडकडून मोडली. व एक इसम मृत्यू पावला व १९० जखमी झाले. बैठक कां मोडली हें कांहीं बाहेर आलें नाहीं.

स्वधर्माकडे आमच्या लोकांची प्रवृत्ति— वर्धेचे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष डाक्टर गोविंदरावजी हे आपले सरकारी काम सांभाळून फुरसतीचा वेळ अलीकडे कीर्तन करण्यांत घालवीत असतात. यांना पहिल्या पासून गाण्याचा नाद असून यांची वाणी मधूर असून भाषण करण्याची शैली चांगली आहे. यामुळें यांच्या कीर्तनाला बरेच लोक जमतात.

## नोटीस

नोटीस बेशमी रायसिंग वल्लद माणसिंग रजपूत राहणार पळसी घायवट तालुका जळगांव जिल्हा आकोला, यांस.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुमचे पासून रुपये ४०० अक्षरी चारशें रुपयांस मौजे पळशी घायवट येथील शेत सर्व्हे नंबर १३ एकर गुंठे ६०१३ हें शेत सालीम व सर्व्हे नंबर १४ एकर गुंठे १४०२९ हें शेत सालिम अशीं दोन्ही शेतें आह्मी तुमचे पासून विकत घेतलीं त्या बद्दल रुपये ४०० आह्मी तुह्मास रोख नगदी दिले त्या बदल तुमची सहीची पावती तुह्मी आमचे जवळ करून दिलेली आहे. असें असून आज पावेतों तुह्मी आह्मास खरिदीखत करून दिलें नाहीं. तर आतां ही नोटीस पावल्या पासून १९ पंधरा दिवसांचे आंत तुह्मी आह्मांस खरिदीखत करून द्यावें. जर असें न केल्यास आह्मी तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धा रुपये भरून घेऊं व नोटिशीचा खर्चही भरून घेऊं. ही नोटीस दिली सही ता० २१।८।०३ इ०

सही

बापू वल्लद जानजी पाटील मौजे
पळसी घायवट ता० जळगांव
निशाणी खुद्द.

नोटीस

रा. रा. बाबुराव वल्लद रावजी आडनांव घस मराठा कुणबी हल्लीं राहणार आकोलें यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे व माझा गंधर्व होऊन सुमारें ६।७ वर्षे झालीं त्या अवधींत माझी तुह्मी बरीच वर्षा ने आण केली परंतु अलीकडे १॥ वर्षापासून मला मुळींच नेलें नसून कांहीं तजवीजही केली नाहीं. तुह्मी दुसरी गंधर्वाची बायको केली, ह्मणून माझी तुह्मी अगदींच निराशा केली यामुळें माझे फार हाल होत आहेत. तुमचा जेव्हां दुसरे बायकोशीं गंधर्व लागत होता तेव्हां माझी व्यवस्था करा ह्मणून ह्मटले असतां तुह्मी मला सांगितलें कीं तूं खुशाल दुसरा घरठाव कर असें तुह्मी मला साफ ह्मटले. या नंतर २।३ वेळां पंचा समक्ष विचारले तरी तुह्मी ह्मटले कीं दुसरा घरठाव कर. इतके ही असून तुह्मी वागवाल ह्मणून तुमचे भरवशावर लोकांचे किरकोळ कर्ज काढून आतां पर्यंत राहिली. मला किरकोळ कर्ज ९० रुपये झाले आहेत मला आतां पुढें कोणीच कर्ज देत नाहीं व मी आजारी असल्यामुळें मजकडून काम धंदाही मुळींच होत नाहीं. तर ही नोटीस पावतांच आठ दिवसांत खावटीचे किरकोळ कर्ज ९० रुपये लोकांचे देऊन टाकून मला नांदविण्यास घेऊन जावें असें मुदतीच्या आंत न केल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचे नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. कळावें. तारीख २०।८।०३ इसवी.

सही

यशवदा मर्द बाबुराव आडनाव घस
तर्फे नाना जयवंत सुकाळे
राहाणार आकोलें निशाणी
खुद्द.

## जाहिरात

वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४४ प्रमाणें.

तारीख १३ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल सभेंत आकोले म्युनिसिपल कमेटीनें आकोले म्युनिसिपल हद्दींत वाफेचे यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबून गांठी करण्याचा व्यापार करणारे सर्व इसमांवर वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ४४ (१) (अ) (ब) अन्वयें खालीं दिल्या प्रमाणें कर बसविण्याचें योजिलें आहे.

सदरहू सूचनेस ज्यांना हरकत करण्याची असेल त्यांनीं आपली हरकत कमेटीचे आफिसांत ह्या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखेपासून तीस दिवसाचे आंत लेखी दाखल करावी.

### करास पात्र असलेले इसम किंवा मालमत्ता

आकोले म्युनिसिपल हद्दींत वाफेचें यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबण्याचा व्यापार करणारे सर्व इसम ह्या करास पात्र आहेत.

### कराची रक्कम अथवा दर

हा कर खालीं दाखविले दरा प्रमाणें आकारला जाईल.

| | दर |
|---|---|
| वटलेला प्रत्येक बोजा. वजन मण १०- | ८ पै |
| दाबलेली प्रत्येक गांठ वजन मण १४- | दहा पै |

### कर आकारण्याची रीत.

१ जनरल कमेटीचे मंजुरातीवर सदरहू कराची आकारणी. कमेटीनें नेमलेली एक सब कमेटी करील.

२ कराचे आकारणीच्या याद्या तयार झाल्या म्हणजे दवंडी देऊन स्थानिक वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली जाईल व याद्या मुनिसिपल आफिसांत पाहण्यास सांपडतील.

३ सदरहू कराचे आकारणीस कोणाची हरकत असल्यास ती हरकत त्यांनीं कमेटीस नोटीस प्रसिद्ध झाले दिवसां पासून एक महिन्याचे आंत लेखी कळवावी. ह्या हरकतीचा निकाल वर दर्शविलेली सब कमेटी करील.

४ सदरहू कर एक हप्त्यानें तारीख १ आगष्ट रोजीं दिला पाहिजे.

ता० १४।८।०३ { V. M. Mahajani. व्हाईस चेअरमन. म्यु. कमेटी आकोला.

## नोटीस

तारीख १३ माहे आगष्ट सन १९०३ इसवी भरलेल्या स्पेशल सभेंत मुनसिपल कमेटीनें "टरमिनल टॅक्स" ह्या नांवाचा कर बसविण्याचें ठरविलें आहे.

ज्या कोणास या संबंधानें हरकत घेणें असेल त्यांनीं ह्या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखेपासून ३० दिवसाचे अंत लेखी तक्रार मुनसीपल कमेटीचे आफिसांत दाखल करावी.

करास पात्र असलेली मिळकत

१ अकोला म्युनसिपाल हद्दींत रेलवेनें येणाऱ्या सर्व मालावर हा कर आकारला जाईल.

कराची रक्कम अथवा दर.

२ ह्या कराची आकारणी खालील दरा प्रमाणें केली जाईल.

(१) अ. दाळ दाणा (यांत पिठाचा देखील समावेश होतो.)
ब -विटा, कवेलू, चुना. दगड.
क- तेल, बिज.
ड- बांबू आणि सर्व तऱ्हेचें इमारती लांकूड-या सर्वांस दरमणीं किंवा मणाचे भागास तीन पै.

(२) ह्या शिवाय इतर सर्व मालांस दर मणी सहा पै.

३ कर आकारण्याची रीत.

(१) करास पात्र असलेला माल एकदम बाहिर पाठवावयाचा नसल्यास, तो माल मुनिसिपाल कमेटीचीं जीं नाकीं असतील अगर कमेटी वेळोवेळीं जीं नाकीं स्थापन करील त्या नाक्यावर नियम १ प्रमाणे कराची रकम दिल्या शिवाय मुनिसीपल हद्दींत येऊं दिला जाणार नाहीं.

(२) रेलवे गुड शेड जवळ कमिटीनें नाका न ठेवल्यास हा कर रेलवे अधिकाऱ्या मार्फत वसूल केला जाईल. ह्याबद्दल कमेटी व रेलवे कंपनी यांचा आपसांत ठराव करण्यांत येईल.

(३) ह्या करास पात्र असलेलामाल आल्यावर तो माल एकदम कमेटीचे हद्दीचे बाहेर जावयाचा कीं काय ह्याबद्दल नाकेकारकुनानें मालवाल्यास विचारावें व तसें असल्यास मालवाल्यानें जाहीर करावें.

४ म्युनिसीपल हद्दींत येणारे मालावरील कर नाके कारकूनास एकदम दिला पाहिजे नाका कारकून यानें घेतलेल्या रकमेबद्दल तीन पावत्या तयार करून पैकीं दोन मालवाल्यास द्याव्या व तिसरी स्थळ प्रत म्हणून पावती बुकांत राखून ठेवावी.

५ एकदम बाहेर पाठविण्यांत येणारे मालाच्या मालवाल्यानें वरील नियमांत सांगितलेल्या दोन पावत्या पैकीं एक पावती ह्याचे रस्त्यावरील शेवटचे नाके वाल्याजवळ देऊन आपले जवळील पावतीवर पावतींत दर्शविलेला माल खरोखर कमेटीचे हद्दी बाहेर गेला अशा बद्दल शेरा लिहून घ्यावा. ह्या प्रमाणें शेरा लिहिलेली पावती कमेटीचे कचेरींत दाखल केल्यावर माल वाल्यानें अशा बाहेर पाठविलेल्या मालाबद्दल दिलेला कर त्यास वापस मिळेल. परंतु हा माल ह्याच दिवशीं आला असेल तसा कमेटीचे हद्दी बाहेर पाठविला गेला तरच मालवाला कराची रक्कम वापस मिळण्यास पात्र होईल.

६ रेलवेनीं आलेला माल आला तसाच, रेलवेचे हद्दी बाहेर न घेतां पुन्हां रेलवेनें पाठविण्याची मालवाल्याची इच्छा असल्यास नाका कारकुनानें अथवा गुडस क्लार्क यानें कमेटीनें मुकरर केलेल्या नमुन्यांत रेलवे पावतीचा नंबर, मांतील तपशील आणि मालावर वसूल केलेल्या कराची रक्कम दाखल करून त्यावर आपली सही करावी व तो नमुना मालवाल्यास द्यावा. मालवाल्यानीं हा नमुना कमेटीचे कचेरींत दाखल केल्यास त्यास त्यांनीं दिलेला कर वापस केला जाईल.

७ कमेटीनें कराची तपासणी करण्याकरितां नेमलेल्या योग्य अधिकाऱ्यांनीं मालवाल्यास पावत्या मागितल्या असतां ह्या त्यास दाखवाव्या अगर ह्याचे स्वाधीन कराव्या. या प्रमाणें पावती मागितल्या नंतर ती दाखविली नाहीं तर त्यानें या नियमा अन्वयें कर द्यावा.

८ अकोला कमेटीच्या देखरेखी खालीं व हुकूमा खालीं या कराची वसुली करण्या करिता एक अधिकारी व लागेल तसा महकमा नेमला जाईल. या अधिकाऱ्यास "टरमिनल टॅक्स सुपरिंटेंडेंट" असें म्हटलें जाईल.

९ या नियमाची योग्य बजावणी होण्याकरितां कमेटी वेळोवेळीं जरूर लागतील तसे नमूने ठरवील आणि पावती बुकें देईल.

१० या नियमाची योग्य अमल बजावणी होण्याकरितां कमेटी वेळोवेळीं जरूर पडेल तसे हुकूम फर्मावील.

११ या नियमांची इंग्लीश व मराठी प्रत प्रत्येक नाकघर व टौनहालमध्यें सहज दिसेल अशा ठिकाणीं लावण्यांत येईल आणि टरमिनल कराचे शालिकडील प्रत्येक नोकरा जवळ दिली जाईल. व ती प्रत जो पाहण्यास मागेल त्यास ती दाखविण्यांत येईल.

१२ जो या नियमाचें समजून उमजून उल्लंघन करील त्याजवर खटला होईल, शाबिती झाल्यास पन्नास रुपयापेक्षा ज्यास्त नाहीं अशा दंडास तो पात्र होईल.

१३ ह्या कर वसूल करण्या संबंधीं तक्रारी आकोला म्युनसिपाल कमेटीकडे कराव्या. यावर कमेटीचे हुकूम अखेरचे समजले जातील तथापि त्या हुकुमावर म्यु. कायद्याचे कलम ५२ प्रमाणें अपिल करण्यास हरकत नाहीं.

१४ खालीं दिलेला माल करास माफ आहे.

१ रेलवे उतारूचें स्वतःचें सामान.
२ उतारुचे गाडीनीं येणारी १० शेर वजना पेक्षां कमी वजनाचीं पारसलें.
३ टपाल मार्फत आलेले जिन्नस.
४ सरकारी अगर सरकारा करितां आणलेले जिन्नस.
५ कच्चा कापूस.
६ कोळसा कोळशयाची राख.
७ रेलवेचें सामान.
८ टीनचे खाली डबे.
९ पानें.
१० कागद.
११ मीठ.
१२ माती आणि वाळू.
१३ जळाऊ लांकडे.
१४ गवत.
१५ तेल व टेप.
१६ फळ फळावळ व भाजी (ताजी)

१५ कराची आकारणी करण्याकरितां मालवाल्यानें दाखल केलेल्या रेलवे पावतीमध्यें नमूद केलेले मालाचें वजन बहुधा खरें समजलें जाऊन त्यावर कराची अकारणी केली जाईल.

१६ कराची रक्कम टाळण्याचे हेतूनें अगर दिलेला कर परत मिळावा. या हेतूनें रेलवेनीं आलेला माल त्याच दिवशीं म्युनसिपल कमेटीचे हद्दी बाहेर जो कोणी घेऊन जाईल व पुन्हा परत हद्दींत आणिल, त्यानें ह्या नियमाचें उल्लंघन केलें असें समजलें जाऊन ह्यावर खटला केला जाईल व शाबिती झाल्यास तो पन्नास रुपयापेक्षां अधिक नाहीं इतके दंडास पात्र होईल.

छापत आहे!

## लवकरच प्रसिद्ध होणार

सरस्वतीप्रकाशमाला

किरण दुसरें!

रा० रा० रामचंद्र यशवंत वेसकर (राणी संयोगिता नाटकाचे कर्ते) कृत.

## प्रतापशाली प्रतापसिंह

एक वीररस परिप्लुत पंचांकी नाटक.

वरील नाटकाचें कथानक चटकदार व संस्मरणीय असून यांत वीर रस प्रधान आहे. केवळ दुःख रस अथवा वीर रसच परिप्लुत नाटक कित्येक कोमल अंतःकरणाच्या वाचकांना आणि प्रेक्षकाना सर्वतोपरि रुचत नाहीं असा अनुभव आल्यावरून या नाटकांत कांहीं ठिकाणीं हास्य व शृंगार या दोन्हीं रसांना जागा दिली आहे.

फक्त तारीख १५ सप्टेंबर पूर्वीं नांवें रजिष्टर करणारांसच किंमत ८ आणे. पुढें १२ आणे.

K. D. CHAUHAN
संपादक सरस्वती प्रकाश
उमरावती.

## जाहीर खबर

## खरेदी करा!

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची स्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून ज्यास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण ह्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस आहे. हीं घड्याळें आपलीस्वतःच शिफारस

आजपर्यंत करीत आलों आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील, प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखी मदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ......................४०

१९ ,, हंटिंग......................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०

१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्ष ग्यारेंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८

१९ ,, सेंकंद कांट्यासह............१०

१९ ,, मध्यमागी सेंकंद कांटा असलें ..................१२

१९ ,, हाफ हंटिंगचें..................१०

१९ ,, हंटिंगचें ......................१०

१४ ,, रिस्ट वॉच ....................१०

इनॅमल्डमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ऑपन फेस............२०

१९ ,, हंटिंग.....................२०

१४ ,, रिस्टवॉच......................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०

१४ ,, हंटिंग..........................३५

१८ व १९ ,, ओपनफेस ..........३०

१९ ,, सेंकंद कांट्यासह ............३२

१९ ,, मध्यमागीं सेंकंद कांटा असलेलें ..................३५

१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५

१९ ,, हंटिंग .................... ४५

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचसचे सोल एजंट.

९ हार्नबी रोड, मुंबई.

ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head-quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years'

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युनीक्स्चर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम कि. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस वालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

मुंबई बँकची सव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोकप्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता–संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर.

दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर माळ जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरावफडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. 4

बाहेरगांवी टपालहाशिलांसह ........ २ रु
वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आण
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस..........०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 24 AUGUST 1903 NO 33

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २४ माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३३

## NOTICE

—o:*:o—

Notice under section 44 of the Berar Municipal Law.

The Municipal Committee of Akola have at their Special General Meeting held on the 13th August 1903 passed a resolution proposing the imposition of a tax under section 41 (1) A (*b*) as set forth below:—

Any inhabitant objecting to the proposal should submit his objection in writing, within thirty days from the publication of this notice.

I Class of persons or description o property proposed to be taxed:—

Every person who practises within the limits of the Akola Municipality the trade of ginning cotton and pressing the same into bales by means of steam or a mechanical process, shall be assessable to this tax.

II. Amount or rate of tax.

The tax shall be levied at the following rates.

| | R. a. p. |
|---|---|
| Per every boja of ten maunds ginned........... | 0 — 0 — 8 |
| Per every bale of 14 maunds pressed........... | 0 — 0 —10 |

III. System of assessment.

( 1 ) The tax shall be assessed by a Sub Committee of the Committee appointed for the purpose subject to the sanction of the general Committee.

( 2 ) When the list of assessment is ready a notice by tom—tom and in the local newspaper shall be given to the public and the list shall be open for inspection at the Municipal Office.

( 3 ) Objection to the assessment shall be received and considered by the Sub-Committee aforesaid if presented in writing within one month from the publication of the list of assessments.

( 4 ) the tax shall be payable in one instalment on 1st August of every year.

Akola. 14—8—03

V. M. MAHAJANI
Vice Chairman
Municipal Committee.

## *NOTICE*

—:0:—

( Under section 44 of the Berar Municipal Law )

The Municipal Committee Akola have at their Special General Meeting held on the 13th August 1903 passed a resolution proposing to impose a tax called 'Terminal tax under section 41 of the Berar Municipal Law as set forth below:—

Any inhabitant objecting to this proposal should submit his objections in writing, within thirty days from the publication of this notice.

I. Class of persons or descriptions of property proposed to be taxed.

All goods brought within the limits of the Akola Municipality by Railway is assessable to this tax.

II Amount or rate of tax.

| (*a*) Description of Goods | Rate of tax |
|---|---|
| (1) Grain, Pulse and flour<br>(2) Bricks, tiles, lime and stone.<br>(3) Oil seeds<br>(4) Bamboos and Timber of all kinds. | Three pies per maund or a fraction of a maund. |
| (*b*) On goods other than those specified in (*a*) | six pies per maund or a fraction of a maund. |

III System of assessment.

1. No goods liable to duty other than those imported for immediate exportation shall be admitted within the limits of the Akola Municipality until the tax as specified above has been paid at such Nakas as exist or may from time to time be established by the Akola Municipal Committee.

2. If no naka is established, the Terminal Tax on goods imported by Railway shall be collected by Railway authorities on behalf of the Akola Municipal Committee on such terms as may be settled between the two bodies.

3. On the importation of goods liable to the Terminal tax, the Clerk in charge of the Naka shall call upon the person in charge of the goods to declare whether they are intended for *Immediate Exportation* from the taxable area.

The importer shall thereupon make such declaration.

4. On goods imported within the Akola Municipal limits, the Terminal tax shall be paid at once to the clerk in charge of the naka who shall make out a receipt in triplicate, tender two copies to the person in charge of the goods and retain the third as a counterfoil in the receipt book.

5. In the case of goods imported for immediate exportation, the person in charge of goods shall hand over one of the two copies of the receipt obtained by him as provided in rule 4 to the person in charge of the last Naka he passes and obtain on the copy of receipt retained by him an endorsement from this naka clerk to the effect that the goods covered by the receipt have actually passed out side the Municipal limits.

On presentation of the receipt thus endorsed at the Municipal Office the person in charge of those goods shall obtain a refund of the tax paid by him for the goods so exported.

Provided that the owner of the goods exported shall be entitled to a refund of this tax only in those cases where the goods to be exported leave the Akola Municipal limits on the same date and the goods as shown in the triplicate receipt have not broken bulk.

6. In the case of goods consigned to Akola by Rail, if the person in charge desire to rebook the goods for re-exportation by rail without their breaking bulk and leaving the Railway premises the goods clerk or the officer in charge of the naka shall enter in the refund form to be prescribed by the Akola Municipal Committee the number and particulars of Railway receipt and the amount of the Terminal tax levied and paid thereon. The goods clerk or the officers in charge of the naka shall then sign the refund form and deliver it to the persons in charge of the goods who shall, on presenting it at the office of the Akola Municipal Committee, receive a refund of the Terminal tax so paid.

7. Every person in charge of the goods imported shall permit every officer duly authorised by the Municipal Committee to inspect the receipt in his possession showing the payment of the tax and shall on demand deliver up the same to him. Every such person who is unable to produce such receipt, when so demanded shall pay the Terminal tax for the goods according to schedule herein annexed.

8. An officer to be called the Terminal tax superintendent with the necessary subordinate establishment shall be appointed and entrusted with the collection of the Terminal tax under the supervision and order of the Akola Municipal Committee.

9. The Akola Municipal Committee hall prescribe such forms and shall issue such receipt books as may from time to time be deemed necessary for duly carrying out these rules.

10. The Municipal Committee shall also issue such executive orders as may from time to time be required for the proper enforcement of these rules.

11. A copy in English and Marathi of these rules and of the schedule of rates at which the Terminal tax s levied shall be posted in a conspicuous place at every naka and at the Town Hall and copies shall be given to each servant of the Terminal tax Department who shall on demand show them to any one desiring to see the same.

12. Whoever wilfully commits a breach of these rules shall be liable to be prosecuted and on conviction shall be punished with a fine not exceeding Rs. 50.

13. Complaints connected with the levy of the terminal tax shall be addressed to the Akola Municipal Committee whose orders thereon shall be final subject to appeal under sec. 52 of the Berar Municipal Law.

14. The following articles shall be exempted from the tax.

(I) Personal Luggage of Railway Passengers.
(II) parcels not exceeding ten shers received by passenger trains.
(III) Articles received through the Postoffice.
(IV) Articles, the property of government or imported on behalf of government.
(V) Raw Cotton Coal and coal ashes.
(VI) Railway stock, Empty tins Leaves.
(VII) Paper salt Earth and sand.
(VIII) Fuel grass oil and oil cake.
(IX) Fruits and vegetables fresh.

15. For purposes of taxation, the weight shown in the Railway invoices produced by the Consignee shall ordinarily be taken as the correct weight of the goods covered by the invoice and tax on them shall be icalculated accordingly.

16. Whoever with the intention of evading the payment of the duty that may be levied on the goods imported within Municipal Limits carries the goods so imported outside the Municipal Limits the day on which they are imported simply for the purpose of obtaining a refund of the duty levied on them and brings them back within Municipar Limits afterwards shall be deemed to have committed a breach of these lules & shall be liable to be prosecuted and on conviction shall be punished with a fine not exceeding Rs. 50.

*V. M. MAHAJANI*
Vice Chairman
*Municipal Committee.*

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध २ शके १८२५

## वऱ्हाडांतील जनावरांत सुरू असलेला रोग.

वऱ्हाडांतील प्रत्येक जिल्ह्यां पैकीं थोड्या बहुत जिल्ह्यांतून हल्लीं एक प्रकारचा जनावरांत रोग सुरू आहे. तो रोग जनावरांच्या कांहीं विवक्षित जातींत दृष्टोत्पत्तीस येतो ह्मणजे गाई, म्हशी, पांसेर, पारडें इत्यादिकांला हा रोग होतो व त्यांतल्या त्यांत ३ वर्षांच्या आंतल्या वांसरांना व पारडांना मुख्यतः होतो. सदर्हू रोगाला इकडे कांहीं भागांत एक फऱ्या, एक डांग्या ह्मणतात. दुसऱ्या ठिकाणीं त्यांत दिसून येणार लक्षणांवरून प्लेग, गोळी असेंही ह्मणतात. इतरत्र हा रोग पूर्वीं कधींही पाहण्यांत न आल्यामुळें त्याचें नांव लोकांना माहित नाहीं व त्याला रोग, दर्द, इत्यादि नांवें देण्यांत येतात. ह्या रोगाला इंग्रजींत ब्लॅक लेग, क्वार्टर इव्हल अशीं नांवें आहेत. मराठींतील पहिलीं एक दोन नांवें व इंग्रजींतील नांवें अन्वर्थक असोन रोगाच्या लक्षणांवरून पडलेलीं दिसतात.

हा रोग काय कारणानें होतो त्याचें ज्ञान इकडील लोकांस नाहीं. पाश्चिमात्य वैद्यकांत सदर्हू रोग एक तऱ्हेच्या जंतू मुळें उत्पन्न होतो असें निश्चयात्मक रीतीनें ठरलें आहे. हे जंतू हवेंत इतस्ततः फिरत असतात व उष्णता, थंडी, खाणें पिणें इत्यादिकांच्या कमी जास्त प्रमाणानें एखाद्या जनावराची प्रकृती गलित होऊन रोगाचें बीज घेण्यास तयार होते. अशा स्थितींत सदर्हू जंतू चारा पाणी इत्यादिकां बरोबर पोटांत अगर हवे बरोबर फुप्फुसांत जातात, तेथून ते रक्तांत प्रवेश करितात. रक्तांत गेल्या नंतर त्यांच्या जीवनाला योग्य असे पदार्थ ते खाऊन फस्त करूं लागतात व त्या योगानें प्रकृति नेहमी प्रमाणें शुद्ध रक्त मिळेनासें होतें. ह्याचा परिणाम रोगाचीं बाहेरून दिसणारीं लक्षणें व अखेरीस मृत्यु! वर निर्दिष्ट केल्या प्रमाणें हे जंतू रक्तांत शिरून रक्ताची परिस्थिती नेहमीपेक्षां विपरीत झाल्यानें हा रोग होतो. ज्या द्रव्यांवर जनावरांचें जीवन सर्वांशीं अवलंबून असतें तें द्रव्य संपून जातें व त्यामुळें प्रप्त होणारी स्थिती अपरिहार्य व परिणामीं बहुत करून भयंकर होते. अशा प्रकारानें अजारी झालेलें जनावर क्वचितच वांचतें. शेंकडा मृत्यूचें प्रमाण ९० पर्यंत असतें असें आढळण्यांत येतें.

सदर्हू रोगांत दिसणारीं लक्षणें ह्मणजे. जनावर, एकाएकीं खाणें पिणें सोडून देतें, रवंथ करणेंही त्या बरोबर बंद होतें; जनावराचे तोंडांत हात घातला असता तोंड अती ऊन असतें. थोडा वेळ जातो न जातो तो चाऱ्ही पायांपैकीं कोणत्याही एखाद्या पायाच्या फऱ्यावर अगर शरीराचे इतर भागांवर एक लहानशी सूज उत्पन्न होते. ती जलदीनें सपाटून, वाढत जाते व सर्व फरा सुजतो. सूजआलेल्या जागीं दाबलें असतां प्रथमतः जनावरांस अती दुःख होतें व ती जागा गरम असते. जसजशी सूज वाढत जाते तसतशी त्यांतील उष्णता कमी होत जाते व कागद दाबल्यानें जसा कडकड आवाज होतो तसा ती सूज दाबल्यानें होतो. कांहीं जनावरांत ही सूज फारच मोठी झाली ह्मणजे वरची कातडी ताणली जाऊन आपोआप फुटते व त्यांतून काळें अगर पिंवळट पातळ रक्त वाहतें व ज्या भागांवरून तें वहातें ते उभरल्या सारखे होतात. दुसऱ्या जनावरांत ही सूज कायम असतांनाच जनावर मरतें. सूज फुटल्या नंतर जनावर बहुत करून बचावत नाहीं. त्याच्या पूर्वीं कदाचित् बरें होण्याचा थोडा बहूत संभव असतो.

वर सांगितलेलीं लक्षणें फारच झपाट्यानें होतात. ह्मणजे जनावर अस्वस्थ झाल्यापासून २ तासांपासून ३६ तासांत हीं सर्व लक्षणें दिसून तें मरतें.

आतां पर्यंतच्या एकंदर विवरणा वरून असें दिसून येईल रोगाची उत्पत्ती जंतू पासून असून त्याचा वेगही फारच जोराचा व झपाट्याचा असतो; ह्यामुळें औषधोपचार करण्यास अवसर सांपडत नाहीं; व जरी सांपडला तरी रोगाचें मूळ जंतू असल्यानें उपयोग होत नाहीं. ह्यासाठीं आतां पर्यंत रामबाण अगर चांगलासा उपाय सांपडला नाहीं. ह्मणून रोग न होईल अशी तजवीज केल्यास रोगाचा प्रसार होत नाहीं व रोगही लौकर, नाहींसा होतो. प्रतिबंधक उपाय खालीं दिल्या प्रमाणें आहेत ते जनावरांच्या प्रत्येक मालकानें केले असतां फार फायदा होतोः—

(१) रोगी जनावर निरोग्यां पासून दूर ठेवावें. या साठीं गांवाचे बाहेर पूर्वेच्या अगर उत्तरेच्या भागाला ३०० यार्डांवर एक झोंपडें बांधुन त्यांत त्याला ठेवावें.

(२) निरोगी जनावरें पूर्वीं ज्या शेतांत अथवा कुरणांत चारण्यास नेत असत तेथें न नेतां दुसऱ्या ठिकाणीं न्यावींत.

(३) निरोगी जनावरांचे लहान लहान कळप करून एकमेकां पासून निरनिराळे ठेवून वेगवेगळ्या ठिकाणीं चारावे.

(४) निरोगी जनावरांतील एखादें जनावर अजारी व अस्वस्थ झाल्यास अगर त्याच्या खाण्या पिण्यांत नेहमीं पेक्षां फरक दिसून आल्यास त्याला वेगळें काढून ठेवावें.

(५) निरोग्यांना रोज लहान मोठ्या प्रकृती प्रमाणें २ पासून ५ तोळे मीठ सकाळ सायंकाळ प्रत्यहीं द्यावें.

६ रोगी जनावराला अलग ठेवल्यावर त्याची शुश्रूषा करण्यासाठीं ठेवलेल्या माणसानें चुकूनही चांगल्या जनावरा जवळ येऊं नये.

(७) निरोगी जनावरें पूर्वीं ज्या ठिकाणीं चरण्या नेत असत तीं पाणथळ, दलदलीची अगर अस्वच्छ असल्यास त्यांना उंच, मुरमाड जागेवर चारण्यास न्यावींत.

(८) अजारी जनावर मेल्यास त्याची लास होता होईल तो पर्यंत जाळावी. जाळण्याची सोय नसल्यास ४ हात खड्डा खोदून अगोदर कळीच्या चुन्याची भुकणी घालून वर लास ठेवून त्यावरही चुन्याचा थर द्यावा. व खड्डा चांगला मजबूत भरावा व जंगली जनावरांनीं लास उकरून काढूं नये ह्मणून खड्डा भरते वेळीं काटेरी झाडें अगर झुडपें भरावीं.

(९) आजारी जनावर ज्या जागीं बांधलें असेल तेथील चारा, पाणी शेण वगैरे खड्ड्यांत पुरावें. लांकडी सामान फिनाईल, रसकापूर इत्यादिकांचें पाण्यानें धुवून काढावे. व गोठ्यांत गंधक वगैरे जाळावा.

(१०) जनावर अजारी असतांना त्याचे खाण्या पिण्याची शुश्रूषा करणें वगैरे गोष्टीकडे मालकांनीं विशेष लक्ष्य द्यावें.

सदर्हू प्रमाणें व्यवस्था केल्यास रोगाचा प्रतिबंध लौकर होतो. व ही व्यवस्था जनावराचे प्रत्येक मालकास थोड्याश्या प्रयत्नानें करितां येईल.

---

आमचे पूज्य गुरुवर्य डॉक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांना मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें एल्. एल्. डी ही सन्मानाची पदवी देण्याविषयीं सर्वानुमतें नुकतेंच ठरविलें आहे ही आनंदाची गोष्ट होय.

विद्वद्रत्न डा० भांडारकर ह्यांना ह्या पदवीच्या योग्यतेची पदवी (पी एच डी) जर्मनींतील गाटिंजन युनिव्हर्सिटीनें ह्या पूर्वींच दिली आहे, व युरोप व अमेरिका खंडांतील दुसऱ्या विद्वन्मडळांनीं डाक्टर साहेबांस आपले सभासद करून त्यांच्या विद्वत्ते विषयीं आपला आदर प्रदर्शित केला आहे. ह्या प्रमाणें डा० साहेबांच्या विद्वत्तेची कीर्ति ह्या पूर्वींच जगद्विख्यात झाली आहे तथापि डाक्टर साहेबां बद्दल आमचा जो इतका आदर आहे तो त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास सुलभ करण्या करितां जीं दोन क्रमिक पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, किंवा संस्कृत वाङ्मयावर जे त्यांनीं कित्येक लेख प्रसिद्ध केले आहेत ह्यामुळेंच नसून, डाक्टर साहेब गुरु ह्या नात्यानें आपल्या शिष्यांच्या हृत्पटलावर विद्येची जी अनुपम आवड उमटवीत असत तिजमुळें तो आहे. आमच्या प्रमाणेंच ज्या इतरांस डाक्टर साहेबांच्या व्याख्यानामृताचा आस्वाद घेण्याची संधि मिळाली असेल त्यांनाच आमच्या ह्मणण्याचा प्रत्यय येणार आहे. मुंबई इलाख्यांत युनिव्हर्सिटी स्थापन झाल्या पासून डॉ. वर्डस्वर्थ साहेबासारखे विद्यार्थ्यांच्या मनांत विद्येची अनुपम गोडी उत्पन्न करणारे दुसरे शिक्षक आले नाहींत, परंतु त्यांच्या मागून त्याच्या तोडीचे डाक्टर साहेबच होत असें आह्मी मोठ्या आनंदानें ह्मणतों. ह्या शिवाय ज्या विशेष गुणामुळें डाक्टर साहेबांची प्रख्याति झाली तो गुण हा कीं, पाश्चात्य पद्धतीनें संस्कृत व ग्रंथांचें संशोधन करून त्यांतून सिद्धांत कसे काढावे हें त्यांनीं नवीन पिढीस आपल्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे. विद्येचा निरपेक्ष व्यासंग, सत्यभंग होऊं न देतां जुन्याबद्दल अभिमान व आपलें मत निर्भिडपणें प्रदर्शित करणें हे गुण डाक्टर साहेबांच्या अंगीं विलक्षण रीतीनें वास करीत आहेत; त्या गुणामुळें डाक्टर साहेबांच्या अंगीं एकदेशीयत्वाचा दोष जरी कित्येक प्रसंगीं येतो, तरी त्या गुणांमुळें डाक्टर साहेबांस "विद्वन्मुकुटमणि" हें उपपद उत्तम शोभतें; ह्मणून मुंबई युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें केलेल्या सूचनेबद्दल आह्मी त्यांचें योग्य अभिनंदन करितों, व डाक्टर साहेबांचा सहवास आह्मां महाराष्ट्रीयांस बऱ्याच काळ पावेतों मिळो असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

गेल्या मंगळवारीं येथील लायब्ररींत वर्गणीदारांची जी विशेष सभा भरविण्यांत आली होती त्या सभेच्या कामा विषयीं उल्लेख करण्याचा प्रसंग आह्मांस आला आहे ह्याबद्दल आह्मांस खरोखरच फार खेद होत आहे. लायब्ररीच्या सेक्रेटरी पैकीं एकाच्या हातून दोन तीन गोष्टी संबंधानें नियमांच्या विरुद्ध वर्तन घडून आलें ह्मणून त्या विषयीं विचार करण्याकरितां अकरा वर्गणीदारांच्या निमंत्रणा वरून सदर्हु सभा भरविण्यांत आली होती; त्या संबंधानें एका वर्गणीदाराचें भाषण झाल्या बरोबर सदर्हु सेक्रेटरी तर्फे त्यांचे मित्र दुसरे सेक्रेटरी ह्यांनीं झालेल्या चुक्या कबूल केल्या व पुढें अशा तऱ्हेच्या चुक्या घडून येणार नाहींत अशा बद्दल आश्वासन दिलें. येथपर्यंत झालेल्या प्रकारांत कोणत्याही प्रकारची वावगी गोष्ट घडून आली नाहीं परंतु ह्या नंतर जो अनिष्ट प्रकार घडून आला तो झालेल्या चुकाबद्दल सदर्हु सेक्रेटरीना शिक्षा ह्मणून त्यांनां राजिनामा देण्यास सांगावें कीं काय ह्या बद्दल होता. एका पक्षाचें असें ह्मणणें होतें कीं सदर्हु सेक्रेटरींनीं राजिनामा द्यावा व दुसऱ्या पक्षाचें असें ह्मणणें होतें कीं ज्या अर्थीं सदर्हु सेक्रेटरींनीं आपल्या चुका कबूल केल्या आहेत, त्या अर्थीं हें प्रकरण येथेंच थांबावें. अखेरीस बहुमतानें सदर्हु प्रश्नाचा निकाल दुसऱ्या प्रकारें झाला ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु ह्या प्रसंगीं विशेष दुःख कारक गोष्ट घडली ती ही कीं ज्यांकडे भावी प्रजेस वळण द्यावयाचें जबाबदारीचें काम आहे, अशा कित्येक शिक्षकांनीं व त्यांना शिक्षणाचे कामीं वळण देण्याचें ज्यांचें काम आहे अशा एका सभासदानें विकारवश होऊन, आपल्या मनाची शांति घालविली व प्रसंगास अनुचित असे आलाप केले!! शाळाखात्यांत जे नोकर आहेत त्यांजविषयीं आमचा आदर असणें हे आमचें कर्तव्य होय. कारण ते जरी साक्षात् आमचे गुरु नसले तरी ज्या पूज्य पीठावर बसून पूर्वीं आमच्या शिक्षकांनीं आह्मांस ज्ञानामृत पाजिलें त्याच पीठावर ते आज अधिकृत आहेत. ह्यामुळें त्यांचे दोष काढण्यास जरी आमची लेखणी कचरत आहे, तरी प्रसंग पडल्यास वेदास आपल्या पूज्य पित्यावरही शस्त्रक्रिया करण्याचा प्रसंग येतो त्यावेळीं त्यानें स्वतःच्या हितास जागे रहाण्याच्या सद्धेतूनेंच आपल्या पूज्य पित्यावर शस्त्र क्रिया करण्यास कचरतां कामा नये हें उदाहरण ध्यानांत धरून आह्मी सदर्हु गृहस्थांचा दोष दाखविला आहे. शांत वेळीं आमचे पूज्य मित्र आपली चुकी कबूल करितील अशी आह्मास आशा आहेच.

## जाहिरात.

वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४४ प्रमाणें.

तारीख १३ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं भरलेल्या स्पेशल सभेंत आकोल म्युनिसिपल कमेटीनें आकोलें म्युनिसिपल हद्दींत वाफेचे यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबून गांठी करण्याचा व्यापार करणारे सर्व इसमांवर वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ४४ (१) (अ) (ब) अन्वयें खालीं दिल्या प्रमाणें कर बसविण्याचें योजिलें आहे.

सदर्हू सूचनेस ज्यांना हरकत करण्याची असेल त्यांनीं आपली हरकत कमेटीचे आफिसांत ह्या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखेपासून तीस दिवसाचे आंत लेखी दाखल करावी.

### करास पात्र असलेले इसम किंवा मालमत्ता

आकोलें म्युनिसिपल हद्दींत वाफेचें यंत्रानें किंवा इतर रीतीनें कापूस वटण्याचा अथवा कापूस दाबण्याचा व्यापार करणारे सर्व इसम ह्या करास पात्र आहेत.

### कराची रक्कम अथवा दर

हा कर खालीं दाखविले दरा प्रमाणें आकारला जाईल.

दर

वटलेला प्रत्येक बोजा. वजन मण १०- ८ पै
दाबलेली प्रत्येक गांठ वजन मण १४-दहा पै

### कर आकारण्याची रीत.

१ जनरल कमेटीचे मंजुरातीवर सदर्हू कराची आकारणी, कमेटीनें नेमलेली एक सब कमेटी करील.

२ कराचे आकारणीच्या याद्या तयार झाल्या म्हणजे दवंडी देऊन स्थानिक वर्तमान पत्रांतून जाहिरात दिली जाईल व याद्या मुनिसिपल आफिसांत पाहण्यास सांपडतील.

३ सदर्हू कराचे आकारणीस कोणाची हरकत असल्यास ती हरकत त्यांनीं कमेटीस नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून एक महिन्याचे आंत लेखी कळवावी. ह्या हरकतीचा निकाल वर दर्शविलेली सब कमेटी करील.

४ सदर्हू कर एक हप्त्यानें तारीख १ आगष्ट रोजीं दिला पाहिजे.

ता० १४।८।०३ — V. M. Malojani. व्हाईस चेअरमन. म्यु. कमेटी आकोला.

---

## नोटीस

तारीख १३ माहे आगष्ट सन १९०३ इसवी भरलेल्या स्पेशल सभेंत मुनसिपल कमेटीनें "टरमिनल टॅक्स" ह्या नांवाचा कर बसविण्याचें ठरविलें आहे.

ज्या कोणास या संबंधानें हरकत घेणें असेल त्यांनीं ह्या नोटिशीचे प्रसिद्धीचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत लेखी तक्रार मुनसीपल कमेटीचे आफिसांत दाखल करावी.

करास पात्र असलेली मिळकत

१ अकोला म्युनसिपाल हद्दींत रेलवेनें येणाऱ्या सर्व मालावर हा कर आकारला जाईल.

कराची रक्कम अथवा दर.

२ ह्या कराची आकारणी खालील दरा प्रमाणें केली जाईल.

(१) अ. डाळ दाणा (यांत पिठाचा देखील समावेश होतो.)
ब—विटा, कवेलु, चुना. दगड.
क— तेल, घिन.
ड— बांबू आणि सर्व तऱ्हेचें इमारती लांकुड-या सर्वांस दरमणीं किंवा मणाचे भागास तीन पै.

(२) ह्या शिवाय इतर सर्व मालांस दर मणी सहा पै.

३ कर आकारण्याची रीत.

(१) करास पात्र असलेला माल एकदम बाहेर पाठवावयाचा नसल्यास, तो माल मुनिसिपाल कमेटीचीं जीं नाकीं असतील अगर कमेटी वेळोवेळीं जीं नाकीं स्थापन करील त्या नाक्यावर नियम १ प्रमाणे कराची रकम दिल्या शिवाय मुनिसिपल हद्दींत येऊं दिला जाणार नाहीं.

(२) रेलवे गुड शेड जवळ कमिटीनें नाका न ठेवल्यास हा कर रेलवे अधिकाऱ्या मार्फत वसूल केला जाईल. ह्याबद्दल कमेटी व रेलवे कंपनी यांचा आपसांत ठराव करण्यांत येईल.

(३) ह्या करास पात्र असलेलामाल आल्यावर तो माल एकदम कमेटीचे हद्दीचे बाहेर जावयाचा कीं काय ह्याबद्दल नाकेकारकुनानें मालवाल्यास विचारावें व तसें असल्यास मालवाल्यानें जाहीर करावें.

४ म्युनिसिपल हद्दींत येणारे मालावरील कर नाके कारकुनास एकदम दिला पाहिजे नाका कारकून यानें घेतलेल्या रकमेबद्दल तीन पावत्या तयार करून पैकीं दोन मालवाल्यास द्याव्या व तिसरी स्थळ प्रत म्हणून पावती बुकांत राखून ठेवावी.

५ एकदम बाहेर पाठविण्यांत येणारे मालाच्या मालवाल्यानें वरील नियमांत सांगितलेल्या दोन पावत्या पैकीं एक पावती ह्याचे रस्त्यांवरील शेवटचे नाके वाल्याजवळ देऊन आपले जवळील पावतीवर पावतींत दर्शविलेला माल खरोखर कमेटीचे हद्दी बाहेर गेला अशाबद्दल शेरा लिहून घ्यावा. ह्या प्रमाणें शेरा लिहिलेली पावती कमेटीचे कचेरींत दाखल केल्यावर माल वाल्यानें अशा बाहेर पाठविलेल्या मालाबद्दल दिलेला कर त्यास वापस मिळेल. परंतु हा माल ज्याच दिवशीं आला असेल तसा कमेटीचे हद्दी बाहेर पाठविला गेला तरच मालवाला कराची रक्कम वापस मिळण्यास पात्र होईल.

६ रेलवेनें आलेला माल आला तसाच, रेलवेचे हद्दी बाहेर न नेतां पुन्हां रेलवेनें पाठविण्याची मालवाल्याची इच्छा असल्यास नाका कारकुनानें अथवा गुडस क्लार्क यानें कमेटीनें मुकरर केलेल्या नमुन्यांत रेलवे पावतीचा नंबर, यांतील तपशील आणि मालावर वसूल केलेला कराची रक्कम दाखल करून त्यावर आपली सही करावी व तो नमुना मालवाल्यास द्यावा. मालवाल्यांनीं हा नमुना कमेटीचे कचेरींत दाखल केल्यास त्यास त्यांनीं दिलेला कर वापस केला जाईल.

७ कमेटीनें कराची तपासणी करण्याकरितां नेमलेल्या योग्य अधिकाऱ्यांनीं मालवाल्यास पावत्या मागितल्या असतां ह्या त्यास दाखवाव्या अगर त्याचे स्वाधीन कराव्या. या प्रमाणें पावती मागितल्या नंतर ती दाखविली नाहीं तर त्यानें या नियमा अन्वयें कर द्यावा.

८ अकोला कमेटीच्या देखरेखी खालीं व हुकुमा खालीं या कराची वसुली करण्या करितां एक अधिकारी व लागेल तसा मदद्गार नेमला जाईल. या अधिकाऱ्यास "टरमिनल टॅक्स सुपरिटेंडेंट" असें म्हटलें जाईल.

९ या नियमाची योग्य बजावणी होण्याकरितां कमेटी वेळोवेळीं जरूर लागतील तसे नमूने ठरवील आणि पावती बुकें देईल.

१० या नियमाची योग्य अमल बजावणी होण्याकरितां कमेटी वेळोवेळीं जरूर पडेल तसे हुकूम फर्मावील.

११ या नियमाची इंग्रजी व मराठी प्रत प्रत्येक नाक्यावर व टैनहालमध्यें सहज दिसेल अशा ठिकाणीं लावण्यांत येईल आणि टरमिनल कराचे शाखेकडील प्रत्येक नोकरा जवळ दिली जाईल. व तो प्रत जो पाहण्यास मागेल त्यास ती दाखविण्यांत येईल.

१२ जो या नियमाचें समजून उमजून उल्लंघन करील त्याजवर खटला होईल, शाबित झाल्यास पन्नास रुपयांपेक्षां ज्यास्त नाहीं अशा दंडास तो पात्र होईल.

१३ ह्या कर वसूल करण्या संबंधीं तक्रारी आकोला म्युनसिपल कमेटीकडे कराव्या. यावर कमेटीचे हुकूम अखेरचे समजले जातील तथापि त्या हुकुमावर म्यु. कायद्याचे कलम ९२ प्रमाणें अपिल करण्यास हरकत नाहीं.

१४ खालीं दिलेला माल करास माफ आहे.

१ रेलवे उतारूंचें स्वतःचें सामान.
२ उतारूचे गाडीनीं येणारी १० शेर वजना पेक्षां कमी वजनाचीं पारसलें.
३ टपाल मार्फत आलेले जिन्नस.
४ सरकारी अगर सरकारा करितां आणलेले जिन्नस.
५ कच्चा कापूस.
६ कोळसा कोळश्याची राख.
७ रेलवेचें सामान.
८ टीनचे खाली डबे.
९ पानें.
१० कागद.
११ मीठ.
१२ माती आणि वाळू.
१३ जळाऊ लांकडें.
१४ गवत.
१५ तेल व टप.
१६ फळ फळावळ व भाजी (ताजी)

१५ कराची आकारणी करण्याकरितां मालवाल्यानें दाखल केलेल्या रेलवे पावतीमध्यें नमूद केलेले मालाचें वजन बहुधा खरें समजलें जाऊन त्यावर कराची आकारणी केली जाईल.

१६ कराची रक्कम टाळण्याचे हेतूनें अगर दिलेला कर परत मिळावा या हेतूनें रेलवेनीं आलेला माल त्याच दिवशीं म्युनसिपल कमेटीचे हद्दी बाहेर जो कोणी नेऊन जाईल व पुन्हा परत हद्दींत आणिल, त्यानें ह्या नियमाचें उल्लंघन केलें असें समजलें जाऊन त्यावर खटला केला जाईल व शाबित झाल्यास तो पन्नास रुपयापेक्षां अधिक नाहीं इतके दंडास पात्र होईल.

---


छापत आहे!

## लवकरच प्रसिद्ध होणार

सरस्वतीप्रकाशमाला

किरण दुसरें!

रा० रा० रामचंद्र यशवंत वेसकर (राणी संयोगिता नाटकाचे कर्ते) कृत

## प्रतापशाली प्रतापसिंह

एक वीररस परिप्लुत पंचांकी नाटक.

वरील नाटकाचें कथानक चटकदार व संस्मरणीय असून यांत वीर रस प्रधान आहे. केवळ दुःख रस अथवा वीर रसच परिप्लुत नाटक कित्येक कोमल अंतःकरणाच्या वाचकांना आणि प्रेक्षकांना सर्वतोपरि रुचत नाहीं असा अनुभव आल्यावरून या नाटकांत काहीं ठिकाणीं हास्य व शृंगार या दोन्हीं रसांना जागा दिली आहे.

फक्त तारीख १५ सप्टेंबर पूर्वीं नांवें रजिष्टर करणारांसच किंमत ८ आणे. पुढे १२ आणे.

K. D. CHAUHAN
संपादक सरस्वती प्रकाश
उमरावती.

---

## जाहीर खबर

## खरेदी करा!

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेलवेच्या व इतर अवजड कामास हें वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुमान आलें आहे. याकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फॉरेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रस्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून ज्यास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रतीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस आहे. ही घड्याळें आपलीस्वतःच शिफारस

आजपर्यंत करीत आलों आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखी मदारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठ मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस ....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्ष ग्यारेंटीचें.

रासकॉप पेटंट २१ लाईन एकाटू स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................१२
१९ ,, हाफ हंटिंगचें................१०
१९ ,, हंटिंगचें ......................१०
१४ ,, रिस्ट वॉच ....................१०

इनगन्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग......................१०
१४ ,, रिस्टवॉच....................१०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग......................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ..................... ४२

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजनल निनोयन रासकोप पेटंट वॉचसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head-quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years'

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*f. C. P. Berars & Khandesh*

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युभिक्शर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अतिन सोनेरी मलम कि. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता—खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यासह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षां तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५॥६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

मुंबई बॅंकची सेव्हिंग्स बॅंक

ह्या बॅंकेत खाली लिहिल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षांचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी युउपक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर.

दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो ।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारच्या दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग उत्पन्न होणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

आकोल्याबाहेर (अस्पष्ट)
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ।
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....०१

NO. NERED REGIST 4

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 31 AUGUST 1903 NO 34

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ३१ माहे आगस्ट सन १९०३ इ० अंक ३४

## नोटीस.

नोटीस बेशमी ह्मसाजी वा। कमळू अघाव राहणार बायगांव प्रगणें फतेखर्डी तालुके चिखली यांस.

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मला तुह्मी लग्न झाल्यापासून आज १२ वर्षे पावेतों टाकून दिलें. मी तुह्मास घेऊन जाण्याबद्दल बरेच निरोप पाठविले परंतु आपण येऊन मला घेऊन गेले नाहीं. मी इतके दिवस आईबापाचे घरीं राहून लोकाचें कर्ज काढून उदरनिर्वाह केला आतां मला संसाराची कांहीं सोय लावणें जरूर आहे तर आपण ही नोटीस पावताच पंधरा दिवसाचें आंत माझा खावटीचा झालेला खर्च व नोटिसीचा खर्च देऊन टाकून मला घेऊन जाणे असें आपले कडून न घडल्यास मी दुसरा घरठाव करीन. मग मज मजवर आपला नवरेपणाचा हक्क कांहींएक राहणार नाहीं हें पक्के समजावें कळावें ता० १२।८।०३ दस्तुर भाऊ तुळजाराम कुळकर्णी.

सही

मिथी मर्द ह्मसाजी हल्लीं वस्ती वामी खुर्द तालुके चिखली हातची बांगडी.

## नोटीस

रा० रा० जैकृष्णभट बिन सदाशिवभट खनाई मुक्काम दिग्रस तालुके दारव्हा जिल्हा वणी पेठ दिग्रस यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी व माझा बाप विठ्ठलभट बिन सदाशिवभट असे दोघे उभयतां साक्षात बंधु असोन माझा बाप वारल्यानें सुमारें १७।१८ वर्षे झालीं व उभयतां बंधु एक ठिकाणींच होते त्यांत तुह्मास संतती नाहीं या करितां अपरोक्ष ह्मणजे बायकोच्या भावाचा मुलगा दत्तक घेण्याचा तुमचा विचार आहे असें आह्मास कळलें यास्तव या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मी तुमची साक्षात पुतणी असल्या कारणानें तुमचे स्थावर जंगम जिनगीवर माझा हक्क आहे व तुह्मां उभयता बंधूंत मी एकटीच मुलगी आहे तर माझा निकाल ही नोटीस पावले पासून १५ दिवसाचे आंत करावा न केल्यास रिती प्रमाणें कोर्टात फिर्याद करून हक्क शाबीत करीन वरून नोटीस दिली आहे.

सही

हरणाबाई जवजे रामकृष्णभट सिगदकर राहणार दिग्रस.

## शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

( रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळेले बी. ए. यानीं लिहिलेला निबंध. )

नंबर ६

आतां आपल्या इकडच्या नाट्यकलेची स्थिति काय आहे, याचा विचार करूं. पेशवाईच्या वेळीं, नाटकें होतीं किंवा नव्हतीं आणि असतील तर कोणत्या प्रकारचीं होतीं ह्याबद्दल माहिती मिळत नाहीं. बहुत करून पेशवाईच्या वेळीं नाटकें करण्याला किंवा केलेलीं पाहण्याला लोकांस फुरसत असेल असें वाटत नाहीं. रावबाजीच्या वेळीं कदाचित् असला कांहीं करमणुकीचा प्रकार सुरूं असेल. अव्वल इंग्रजींत नाटकें सुरूं झालीं आणि पहिल्या प्रथम देवादिकांच्या उत्सवाच्या वेळीं देवादिकांचीं चरित्रें व अवतार यांचींच नाटकें होत असत. अद्याप खेड्यापाड्यांतून लळितें होतात. ह्यामध्यें देवाची लीला आणि इतर हास्यरसोत्पादक चुटके असतात. दोन पैसे मिळविण्याच्या हेतूनें मंडळी तयार करून पौराणिक खेळ करून दाखविण्याचें पहिलें श्रेय सांगली आणि इचलकरंजी ह्या संस्थानांतील लोकांकडे आहे. पुढें कांहीं दिवसांनीं गद्यात्मक असे ऐतिहासिक पुस्तकी खेळ होऊं लागले. त्या नंतर ह्मणजे सुमारें २० वर्षांपूर्वीं नाट्यकलेचा ओघ कै० आण्णासाहेब किर्लोस्कर ह्यानीं अजीबात फिरवून संगीत नाटकास सुरवात केली; त्यांच्या पश्चात यास बरेच अनुयायी मिळाले. शेवटीं शेवटीं गेल्या १० वर्षांत तर संगीत इतकें बोकाळलें कीं त्यास सुमारच राहिला नाहीं. मी स्वतः संगीत–कलानभिज्ञ आहे ह्मणून कै० आण्णासाहेब किर्लोसकर यांचें संगीत चांगलें कीं रा० पाटणकरांचें संगीत चांगलें हें शास्त्रीय पद्धतीनें सांगूं शकत नाहीं, परंतु भाषेच्या दृष्टीनें अवलोकन केलें तरी, त्या दोन संगीतांत जमीन अस्मानचा फरक दृष्टीस पडतो. नाटकांतील पदरचनेच्या संबंधानें १८९२ सालच्या "सुधारक" पत्राच्या जानेवारीच्या किंवा फेब्रुवारीच्या एका अंकात "कविता देवीचा अवतार" या मथळ्याखालीं एक फारच मार्मिक लेख आला होता. त्या लेखातील सर्व भाग मला आठवत नाहींत आणि तो लेख मिळणें ही अशक्य आहे. तरी पण इतकें आठवतें कीं त्या लेखकानीं अलीकडल्या संगीत नाटकातील कवितेचे ३ प्रकार केले होते आणि त्यास "वद्याची" कविता विटाळ्याची कविता वगैरे गमतीची परंतु सार्थ नावें दिलीं होतीं. ज्या गृहस्थानीं तो लेख वाचला असेल त्यास मी काय ह्मणतों हें समजलें असेल. असो, तेव्हां अशा प्रकारच्या "विटाळ्याच्या" आणि "वद्याच्या कविता" अलिकडील बहुतेक संगीत नाटकांत सांपडतात. चांगल्या सुशिक्षित मंडळींनीं केलेल्या संगीत नाटकांतून देखील अशी कविता आढळते हें पाहून वाईट वाटतें.

संस्कृत नाट्य शास्त्र अनेक बंधनांनीं बद्ध आहे. मराठींत नाट्यशास्त्र ह्या नांवाचा ग्रंथ जरी अद्याप झाला नाहीं तरी संस्कृत नाट्य शास्त्राचे नियमानें बद्ध अशीं मराठी नाटकें असायला पाहिजेत. रंगभूमीवर पात्रांचा प्रवेश अमुक अमुक तऱ्हेनें व्हावा, अमुक अमुक विधी रंगभूमीवर घेऊं नयेत असे अनेक नियम आहेत; परंतु अलिकडील नाटकात या संबंधानें धरबंध दिसत नाहीं. भोजन वगैरे विधि रंगभूमीवर होऊं नयेत; परंतु अलिकडील संगीत नाट्यकार "लै गोड कांदा भाकर जी" इत्यादि लावण्या ह्मणत ह्मणत आपल्या पात्राकडून "कांदा भाकरी" चें भोजन करवितात. शौचविधीची सर्व तयारी करून सज्ज झालेलें पात्र ही रंगभूमीवर आणून उभे करितात तात्पर्य त्यांनीं सर्व विधी रंग भूमीवर करविले आहेत, आतां प्रत्यक्ष उत्सर्गच करावयाचा राहिला आहे, तोही लवकरच होईल अशी आशा आहे.

अलिकडील नाटकांतील शृंगारा संबंधानें ही असेंच ह्मणता येईल. संस्कृत नाटकांत संभोग शृंगारापेक्षां विप्रलंभ शृंगाराचें महत्व विशेष मानिलें आहे. विप्रलंभ शृंगारांत केवळ विरहावस्थेचें वर्णन असतें आणि असेच देखावे जुन्या नाटकांतून विशेष आढळतात. परंतु अलिकडील नाटकांत संभोग शृंगाराचेच देखावे फार असून ते जितका अनावृत्त असेल तितका प्रेक्षक समुदाय जास्त खूष होतो. या कारणानें नाटकाला तमाशाचें स्वरूप येत चाललें आहे.

या शोचनीय स्थितीची सर्व जबाबदारी नाटककारांवर नाहीं; प्रेक्षकांवरही आहे. प्रेक्षकांची अभिरुचि पाहून नाटककार वागतात ह्यांत नवल नाहीं. परंतु ह्या मुळें नाटकांतील नाटकपण गेलें. नाटक हें जर मानवी स्थितीचें चित्र आहे आणि त्या पासून जर कांहीं उपदेश घ्यावयाचा आहे, तर मग हा मार्ग प्रशस्त नाहीं.

संगिताची ही टूम निघाल्या पासून अलीकडे प्रत्येक नाटकाची संगीत रंगवृत्ति निघाली आहे. कोणत्या पात्रानें भाषण संगितांत व्हावें आणि कोणाचें होऊं नये ह्या बद्दल धरबंध राहिला नाहीं. योगंधरायण सेनापतीला अवसान आलें कीं ते "हाणा, हाण दाणादाण" करीत येतात आणि मग आपल्या संगित पदाच्या प्रत्येक ओळींत नियम वगैरे झुगारून देऊन आगगाडीच्या तिसऱ्या क्लासच्या डब्यातील कंपार्टमेंटात १० च्या जागीं २० उतारू कोंबून भरितात. लहान अर्भक पात्रांनाही लांबलचक व क्लिष्ट पदें ह्मणावयास लावितात. अशा प्रकारचीं नाटकें असलीं ह्मणजे सुशिक्षित प्रेक्षक समाज नाटकास जाईनासा होतो व मग नाटक कंपन्यांना पिटवरच आपलें पोट भरावें लागतें व मग पिटची रुचीच त्यांना पुरवावी लागतें. मग पारशी चाली आणि पाटणकरी झगडे दृष्टीस पडतात यांत नवल नाहीं.

रस पोषण, रसाविर्भाव, पात्रस्वभाव परिपाक इत्यादि नाट्यांगाकडे लक्ष देऊन जर सुशिक्षित लोक नाटकें लिहितील तर प्रेक्षक रुचि बदलेल यांत संशय नाहीं.

ही गोष्ट शक्य आहे हें शाहू नगरवासी नाटक कंपनीचीं केवळ गद्य नाटकें लोकांस पसंत पडतात ह्या गोष्टी वरून, उघड आहे. आणि तीं नाटकें पाहणारा प्रेक्षकगण बहुतेक सुशिक्षित असतो हीही गोष्ट लक्षांत घेण्या सारखी आहे. "सुविहित प्रयोगतया आर्यस्य न किमपि परिहास्यते" अशा प्रकारचे नाट्यकार आणि नट असल्यावर "रागबद्ध चित्तवृत्तिरालिखित इव सर्वतो रंगः" दृष्टीस पडावयाला मोठीशी हरकत पडणार नाहीं.

मराठी भाषेमध्यें संस्कृतांतून किंवा इंग्रजींतून भाषांतर, रूपांतर किंवा रंगावृत्ति होऊन पुष्कळ नाटकें झालीं आहेत, त्यांचे चांगलेपणा बद्दलचें श्रेय मूळच्या नाट्यकाराकडे जातें. मूळची मराठींतीलच अशीं नाटकें फारच थोडीं झालीं आहेत. त्यांत कांहीं ऐतिहासिक नाटकें चांगलीं उतरलीं आहेत. संगित नाटकांत अतिउत्तम–किंवा सर्व नाटकांत अति उत्तम–असें एकच नाटक आहे आणि तें किर्लोस्करांचें "सौभद्र" होय. सयाजी विजयाच्या जूनच्या एका अंकांत एडिटरनीं मराठी वाङ्मयाबद्दल लिहितांना असेंच उद्गार काढले आहे"–ते ह्मणतात मराठी भाषेंत आजपर्यंत स्वतंत्र अशीं दोनच पुस्तकें झालीं आणि तीं–१ चिपळूणकरांची निबंधमाला आणि २ सौभद्र हीं होत.

एकंदरींत आपली नाट्यकला चांगल्या स्थितींत नाहीं तींत पुष्कळ सुधारणा होणें इष्ट आहे. ही कला मराठी वाङ्मयाचें एक अंग आहे; आणि इतर अंगाप्रमाणें ह्यांचीही वाढ झाली पाहिजे. ह्या बाबतींत अलिकडे कांहीं प्रयत्न होत आहेत. नाशिकास अनंत वामन बर्वे ह्या नांवाचे एक गृहस्थ आहेत ते स्वतः उत्तम नट असून नाटककार आहेत; त्यांनीं "विविध नाट्य विषय संग्रह" ह्मणून एक संस्था काढिली आहे आणि ते उत्तम नटांचें संमेलनही करीत असतात. नाट्य कलेची भरभराट व्हावी अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं त्या गृहस्थास मदत करावी.

( समाप्त )

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध ९ शके १८२५

## प्लेग

आकोल्यास प्लेगाची सुरवात झाली. काल रोजीं प्लेगानें दोन माणसें येथें गांवांत मरण पावलीं. मुर्तिजापूरास प्लेग वाढला असून लोक घरें सोडून जात आहेत. उमरावतीला प्लेग चालूंच आहे. वाशिमास प्लेगाचें मान मध्यम आहे. दररोज तीन चार मृत्यूंचे प्रमाणें पडतें. कांहीं मृत्यु झाल्या विषयीं कळतें. प्लेगाची आपदा डोळ्यापुढें उभी राहिली ह्मणजे मनुष्य निराश होतो. स्थानत्यागा शिवाय दुसरा उपाय सध्यां उपलब्ध नाहीं. प्लेगाचा प्रारंभ होतांच सरकारी बंदोबस्त चांगला चालूं आहे. ईश्वरच कृपा करील तर हें विघ्न टळेल !

## बहिष्कार.

या विषयावर रविवार ता. २३ आगष्ट १९०३ रोजीं येथील लायब्ररींत एक तास भर झालेल्या व्याख्यानाचा मतितार्थ खालीं दिला आहे. व्याख्याते रा. जयवंत ह्मणालेः—

समाजशास्त्र हा विषय फार गहन अति कठीण आहे. निरनिराळ्या परिस्थितींचा निरनिराळ्या व्यक्तींवर काय परिणाम होतो, अनेक विचारांचा व आचारांचा एकंदर समाजावर, राष्ट्रावर व शेवटीं जगावर इष्टानिष्ट परिणाम कसा कसा होत जातो, त्यापासून सर्वांनीं काय शिकावयाचें; अमुक स्थितींत अमुक प्रसंगीं अमुक व्यक्तीनें कसें वागावें या संबंधीं अखंड नियम घालणें समाजशास्त्राचें अनेक वर्षें अध्ययन करणारांसहि जड व अशक्य वाटतें. या विषयावरील जितके जितके अधिक ग्रंथ वाचावेत तितकें तितकें ज्ञानार्जनेच्छूंस आपल्या ज्ञानाची संकुचित मर्यादा मात्र कळूं लागते. सारांश एका व्यक्तीचे विचारांचा, व आचारांचा कुटुंबावर, कुटुंबांचा ज्ञातीवर, ज्ञातीचा समाजावर, समाजाचा राष्ट्रावर, राष्ट्राचा जगावर चांगला वाईट परिणाम किती झाला हें निश्चयपणें सांगणें कठीण आहे. इतका समाजशास्त्राचा विलक्षण विस्तार आहे. आपण यापैकीं एक केवळ साधारण गोष्टीचा विचार करण्यास येथें जमलों आहोंत.

समाजाची सद्य स्थिती व पूर्व स्थिती यांत पुष्कळ बदल झाला आहे. आज ज्या गोष्टीचें विशेष महत्व वाटतें त्या गोष्टीचें पूर्व स्थितींतहि वाटत होतें असें ह्मणतां येतें अगर पूर्वीं ज्याचें वाटलें त्याचें आम्हांहि वाटलेंच पाहिजे अगर तसेंच वाटत आहे असें ह्मणणें अनुभवाच्या कसोटीस लागत नाहीं. उदाहरणार्थ साधारण तुळशीस प्रदक्षिणा घालण्याची रीत घ्या. तिचा हेतु ... तो आज कितपत सिद्धीस जात आहे तो पहा. तुळशीच्या अंगीं कित्येक फार चांगले गुण आहेत. तिच्यांतून प्रकृतीस फारच हितकारक असा वायू निघतो. या दृष्टीनें सध्यां किती स्त्रियांस फायदा होत असेल त्याचा आपणच विचार करा. आमची तुळशीचीं सुंदर सुंदर वनें असणारी पूर्वींची स्थिति कोठें आणि आज तुळशीचीं चार पानें असणारें झाड जेमतेम लावून त्यास प्रदक्षिणा घालण्याचा काळ कोठें ? पूर्व प्रकारांत उत्तमोत्तम असेल तें कायम ठेवून नव्या हितकर गोष्टींची त्यांत भर घालण्याकडे मनुष्य मात्राची प्रवृत्ति पाहिजे. हें काम पूर्वींचें तें सर्व उत्तम असें समजून चालण्यांतच ज्यांचा फायदा व हित आहे अशा जनतेचें नव्हे; जनतेने असें केलें नाहीं तर समाजांत हाहाःकार उडेल. विचारी नेते असतील त्यांनीं कालमान पाहून उत्तम आचारांस कायमें ठेवण्यास त्यांचे महत्व जनतेवर ठसविण्यास व हितकर नव्या गोष्टींचें महत्व त्यांस कळवून देण्यास तत्पर असले पाहिजेत. तेव्हां पूर्व स्थिति अगदीं अगदीं पूर्व स्थिति, वन्य स्थितीच घ्या. त्यावेळची स्थिति किती विलक्षण असेल ? त्यांत किती अडचणी, दोष असतील ? अगदीं प्रथम प्रत्येक व्यक्तीची दृष्टि फक्त आपली सोय कोणती, आपला फायदा कोणता याकडे साहजीकपणें असली पाहिजे असें दिसतें. परंतु दुसऱ्याशीं संबंध निरनिराळ्या कारणांनीं येत गेल्यावर एकमेकांची मदत घेण्यांत, परस्परांच्या उपयोगी पडण्यांत अनेक प्रकारें हित असल्याचें दृष्टीस येऊं लागलें असेल. यामुळें अगदींच संकुचित वृत्तीच्या बाहेर ते गेले असतील. चांगुलपणा उपकार, दया वगैरेची आवश्यकता त्यांस कळूं लागून कित्येक उदात्त वृत्तीचा प्रादुर्भाव झाला असेल. अज्ञान किंचित तरी जाऊन एकी, संघशक्ति वगैरे पासून अनेक प्रकारें सर्वांचे हित होत आहे असें अनुभवास येऊं लागल्यावर एकमेकांची मुळींच पर्वा नसणें व एकमेकांबद्दल प्रेम भाव वाटूं लागणें यांतील हिताहित कळल्यावर पूर्व वृत्तींचा लोप होऊन जिकडे तिकडे व्यक्तीव्यक्तींतील परकेपणा जाऊन कुटुंबांची, ज्ञातीची, समाजाची उत्क्रांतीचे तत्वानुरूप अधिकाधिक सुधारणा होत गेली असेल. परंतु प्रत्येक स्थितींत सोयी गैरसोयी ह्या असावयाच्याच प्रत्येक व्यक्तींत निरनिराळे विचार असावयाचेच. कोणतीही स्थिति आपण चांगली वाईट ठरवतो ती तिच्यापासून होणाऱ्या चांगल्या वाईट परिणामावर तुलना दृष्टीनें ठरवितों. एकच स्थिति—परंतु तिचें निरनिराळ्या दृष्टीनें अवलोकन करणारांस ती चांगली वाईट दिसते. तेव्हां कुटुंबांतील, ज्ञातींतील व समाजांतील सर्व प्रकार सर्व व्यक्तीस उत्तमच वाटणें शक्य नाहीं. त्यामुळें आघात प्रत्याघात या नियमानुरूप एकवार कुटुंब बनण्यापर्यंत स्थिति गेल्यावर व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा प्रादुर्भाव होऊं लागून त्याचा उपयोग व दुरुपयोग करणाऱ्या व्यक्ति निर्माण होऊं लागतात. अर्थातच सर्वांनाच व्यक्ति स्वातंत्र्याची खरोखर मर्यादा कोठपर्यंत आहे याची कल्पना नसल्यामुळें समाजांत स्वातंत्र्य व स्वेच्छाचार यांतील सूक्ष्मभेद न कळणाऱ्या व्यक्ति समाजास क्षणभर विस्कळित करीत आहेत असें वाटूं लागतें. परंतु अनेक वर्षें लोटून जो समाज बनतो त्यांचीं बंधनें एकदम झुगारून देणें अगर तो समाज एकदम नाहींसा होणें सोपें काम नव्हे. अशा स्वेच्छाचारी व्यक्तीस ताळ्यावर आणणें अवश्य आहे असें समाजास तेव्हांच वाटून स्वेच्छाचारास आळा घालणारी बंधनें समाजांत तयार होऊं लागतात. मात्र प्रथमारंभीं या बंधनांत विशेष कडकपणा एकदम सुरूं करणें समाजासहि बरें वाटलें नसेल; कारण ज्यांस ताळ्यावर आणावयाचें त्या व्यक्ती आपल्याच पैकीं हें लक्ष्यांत ठेवूनच समाजानें कांहीं बंधनें केलीं असतील. सामोपचारानें स्वेच्छाचारी व्यक्तीस वळविण्याचा यत्न केला असेल, साम दाम दंड यांचा मारा करून पाहिला असेल. परंतु यांसहि दाद न देणाऱ्या व्यक्ती आढळून आल्यावर भेद ह्मणजेच जवळ जवळ बहिष्कारा पर्यंत समाजाची मजल गेली असेल. मनुष्य समाजप्रिय प्राणी आहे. त्याचा सर्वांशीं संबंध तोडल्यास तो लवकर ताळ्यावर येण्याचा संभव आहे; सबब समाजबंधनें झुगारून देणारास बहिष्कार ही शिक्षा देण्यास आरंभ झाला असावा व त्यांत ही बंधनें ठेवणारांचे बहिष्कृत झालेले व बहिष्कार घालणारे या दोघांवर खरोखरच प्रेम असलें पाहिजे असें व्यक्त होतें. अविचार, धाडसीपणा, बेबंदशाही यांस आळा घालणें अवश्य आहे. परंतु कोणत्याहि स्थितींत चांगले वाईट प्रकार असावयाचे या नियमानुरूप स्वातंत्र्य व स्वेच्छाचार यांत खरा भेद काय आहे, थांबावयाचे कोठें हें कित्येक व्यक्तीस नसें कळत नाहीं तसेंच समजबंधनें पूर्वजांनीं कितीहि सद्धेतूंने घातली असलीं तरी तीं झुगारून देणारांस शिक्षा करण्याचें काम ज्यांचेकडे असतें त्या व्यक्तीहि मनुष्य चुकीस पात्र असतो या नियमास अपवादक असणें शक्य नाहीं. तेव्हां शिक्षा करणारांकडूनहि अत्याचार होतो असें इतिहासांत आल्यास अनेक वेळां आढळून येईल. बहिष्कार घालणारांस बहिष्कृतांत सरळ प्रामाणिक कोण आहेत, स्वेच्छाचारी बेबंद कोण आहेत हें नीटपणे कळलें नाहीं तर त्यांच्याकडूनहि अन्याय होऊन जातो. केवळ मत भेदाकरितां, ज्यांस आपण आज वंद्य मानतो त्यांचा निष्कारण छळ झाला—नव्हे ज्या प्राणास आपण आज इतकें महत्व देतो त्या प्राणांच्या आहुति अग्नीला अर्पण झाल्याची उदाहरणें इतिहासांत आहेत. शिक्षा करण्याचे ज्याचे हातांत त्यांनीं स्वेच्छाचार बेबंदपणा यांस आळा घालण्याचे सद्धेतूंनें कित्येक प्रसंगीं कळून व केव्हां केव्हां न कळत अनेक महात्म्यांचा छळ केला. त्यांचे नानाप्रकारें हाल केले. अनेक अन्याय केले. आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला. व्यक्ति स्वातंत्र्यांस चिरडून सोडण्याचा खटाटोप केला. मात्र याचाहि परिणाम एकंदर राष्ट्रास हितकर असाच झाला. कित्येक व्यक्तींचे हाल झाले खरे, अनेक अन्याय झाले हेंहि खरे. तथापि यामुळें बहिष्कृत म्हणून मानले जाणारांत कितपत स्वार्थत्याग आहे त्यांच्यांत किती प्रामाणिकपणा आहे ते कसे कसोटीला टिकतात. हेही समाजास कळून आलें असेल. त्याचा समाजावर जनतेवर इष्ट परिणाम झालाच पाहिजे. समाजाला कांहीं काळ पर्यंत समाजबंधनें झुगारणारे लोक सर्वच वाईट वाटले तरी कांहीं बहिष्कृतांचा सरळपणा अढळपणा त्यांची धीरवृत्ति आत्मार्पणवृत्ति ही पाहून समाजांतील कित्येकांस तरी खास पूज्यबुद्धि वाटूं लागते व हळू हळू साधुसंत महात्मे यांची योग्यता तत्कालीन लोकांस कळावी तशी कळत नाहीं असें आज आपल्यास म्हणावें लागतें. अशा स्थितींत बहिष्कृत लोकांचा कितीहि छळ झाला तरी त्यांच्याबद्दल पूज्यभाव उत्पन्न होऊन शेवटीं शेवटीं समाजांतील शहाणे लोक अशांच छळ करणारांचाच तिरस्कार करूं लागतात व आत्मार्पण करणाऱ्या नेकीच्या लोकांबद्दल प्रेमभाव उत्पन्न होऊं लागतो. शिक्षा सुनावणारे न्यायाधिशच अप्रिय अप्रिय वाटूं लागतात. बहिष्कार घालणारांचे असंबद्ध वर्तन हळू हळू लोकांच्या नजरेस पडतें. बहिष्कृतांची योग्यता जितकी जितकी अधिक त्या मानानें त्यांचा छळ करणारासंबंधीं तिरस्कार वाटूं लागून शेवटीं समाजांतील लोकांनी शिक्षा देणारांबद्दल अपूज्यता वाढून कित्येकांत अनास्था वाटूं लागते. अखेरीस समाज बंधनें घालणारांचा मूळ स्तुत्य हेतु एकीकडेस राहून बहिष्कार घालणारांची किंमत कमी होऊन कित्येक चांगल्या गुणांचा लोप होऊं लागतो. पुनः एकवार समाज बंधनांस झुगारणांमध्यें उदारवृत्तीचा लोप होऊन शिक्षा देणारांचे वर्तनांत असंबद्धता आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें ह्मणजे बहिष्कृत मंडळींत स्वेच्छाचारी मंडळीचा सुळसुळाट होतो. त्यांच्या पैकीं चांगले कोण वाईट कोण हें कळेनासें होतें. या प्रमाणें समाज खालीवर हेलकावे खाऊन सर्वत्र कंपनी फारच अनियंत्रित वागूं लागून त्यास उठवी पर्यंत त्यांत स्थीरवृत्ति येते. परंतु एकंदरींत या न्याय्य अन्याय्य वर्तनांत सर्व समाजाचा महात्म्यांच्या स्थीरवृत्तीनें, अढळ निश्चयानें, बाणेदारपणानें, प्रामाणिकपणानें फायदाच होत जातो. तथापि समाज बंधनास झुगारणारांस बहिष्कार घालणारांत न्यायप्रेम सरळपणा ही अवश्य पाहिजेत. बहिष्कार घालणारांची वृत्ति कडकडीत प्रामाणिकपणाची पाहिजे. बहिष्कृतांचेच वर्तन त्यांनीं करून चालणार नाहीं. त्यांनीं पूज्यता उत्पन्न केली पाहिजे. त्यांचा बहिष्कृतांस दरारा वाटला पाहिजे—पण बहिष्कृत लोकांची योग्यता कशी असावी हे सांगितलें ह्मणजे बहिष्कार घालणारांची किती असली पाहिजे हें आपोआप आपणांस कळेल. ज्यांस शिक्षा करावयाची त्यांचा अपराध कोणता, त्यांस काय शासन करावयाचें हें कळण्याची योग्यता न्यायाधिशात नसेल अगर ज्यास शिक्षा द्यावयाची त्या विद्यार्थ्यांच्या योग्यतेला योग्य शिक्षक नसेल तर खरा न्याय कसा होणार—खरें शिक्षण कसें मिळणार? तेव्हां बहिष्कार घालणारांचें तेज, त्यांचा जोम बहिष्कृतांच्या योग्यते प्रमाणें नसेल तर तो बहिष्कार निव्वळ थोतांड होय. तो निव्वळ पुळपुळीत. त्याला कंकण मंडित करितो हरता अशा बहिष्कृतांनींच मान द्यावा. असो, तर बहिष्कार घालणारे कसे असावेत ते बहिष्कृत कसे पाहिजेत हें सांगितल्यावर आपणांस सहज कळेल. तर मग विशेषतः आजच्या स्थितींत तरी बहिष्कृत

लोकांनीं आपणास कोणी मान देतो काय, आपला अपमान करतो काय या विचारांस अजिबात फाटा दिला पाहिजे. क्षुल्लक मानापमानांच्या कल्पनेस रजा दिली पाहिजे. कीर्ति अपकीर्ति या संबंधीं पूर्ण अनास्था ठेवली पाहिजे. कोणी कसेंहि वागवो. त्याचा राग लोभ बहिष्कृतांस नको आहे. जनतेपेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत अशी त्यांनीं शत्रु मित्र यांची खात्री केली पाहिजे. शत्रु मित्र यांच्याशीं पूर्ण प्रेमभावानें वागून आपलें मन थोर आहे असें दाखवलें पाहिजे. कोणीहि अपमान केला तरी समाज बंधनें झुगारणाऱ्याशीं शत्रुत्वानें वागण्याचा समाजास हक्क आहे हें न विसरतां बहिष्कृत लोकांनीं शांतपणा क्षमादृष्टि आपल्यांत ठेवलीच पाहिजे. मनाची समता कधींहि सोडून निभाव लागावयाचा नाहीं. इतरांकडून होणाऱ्या अपराधांस समान क्षमा करील परंतु तेंच अपराध बहिष्कृतांनीं करून चालावयाचें नाहीं त्यांच्यावर सर्वांची करडी नजर राहणार व राहि लीच पाहिजे. त्यांनीं दुसऱ्यास प्रामाणिकपणा सरळपणा स्वार्थत्याग यांचा धडा शिकवला पाहिजे. विरुद्ध पक्षाशी टक्कर देण्याचा जोम ज्यांत नाहीं तो बहिष्कृत होण्यास अयोग्य आहे. आपल्यांतील गुणांची किंमत दुसऱ्यास कळो वा न कळो, गुण असतील त्याची महति कोणास वाटो न वाटो, गुण झांकून अवगुणाचीच टीमकी वाजो—बहिष्कृतांचा स्वतःवर पूर्ण विश्वास पाहिजे आहे. सुख दुःख याविषयीं अनास्था, येण्याऱ्या अडचणीबद्दल बेफिकीरी, उपकाराबद्दल आभार, त्रास छळ या मुळें न डगमगणें हें सर्व कांहीं त्याच्यात हावें आहे. मात्र फाजील व्यवहार ज्ञान, मतलब साधणारी दूरदृष्टि, कृतिशून्यता उत्पन्न करणारे विचार यांचा गंधहि नको. तत्वज्ञान दृष्ट्या ते कसोटीस उतरणें कठीण, त्याच्या कृति ह्मणजे संवेदनेचे सर्व खेळ होत त्याचें परीक्षण तर्कशास्त्रदृष्ट्या, शास्त्रदृष्ट्या, तत्वज्ञानदृष्ट्या करून चालावयाचे नाहीं. तें काव्य परीक्षणाच्या, प्रबळ मनोवृत्ति या दृष्टीनें झालें पाहिजे. त्यांच्या कृते जनतेविरुद्धच काय पण मोठे लोक बडे लोक, शहाणे ह्मणून मोडणारे यासहि क्षणभर पसंत पडणार नाहीत. तरी देखील त्यांनीं बहिष्कृतांनीं आपली योग्यता स्थापित केली पाहिजे. खोटेपणा अन्याय यांची त्यांस मनःपूर्वक चीड आली पाहिजे. दुष्टबुद्धीनें दिलेलीं दुःखें सहन करण्याची त्यांच्यात शक्ति पाहिजे. सत्यावर निष्ठा पाहिजे, न्यायावर प्रेम पाहिजे उदात्तवृत्ति, सभ्यता, मनाचा मोठेपणाही असून मित्रपणा व साहसीपणा याची मवळी स्थिति त्यांनीं पत्करली पाहिजे. क्षणैक हिताहिताकडे त्याचे लक्ष नको. आपणास लोक तुच्छ मानतील याबद्दल त्यांनीं पूर्ण तुच्छता दाखवणें जरूर आहे. त्याचे स्वीकृत कार्यीं पूर्ण आत्मार्पण पाहिजे. त्यांच्यांत अढळ निश्चय व अभेद्य, अखंड अश्रांत धीरवृत्ति पाहिजेत. मात्र असे आज कोण आहेत? अमुक मतें प्रतिपादल्यास शिक्षा होईल असें कळतांच मागें पाय घेणारेच पुष्कळ हें खरें; पण थोडे कोणी असतील तर त्यांस बहिष्कार घालणारे पण दरारा वाटेल असेच पाहिजेत. बहिष्कारांत कांहीं जोम पाहिजे—आणि उत्तम मार्ग ह्मणजे बहिष्कृत व बहिष्कार घालणारे या दोघांनीहि कालानुरोधानें वागून समेट केली पाहिजे. मतभेद स्तव बहिष्कार घालण्यापेक्षां नीतिविरुद्ध वर्तनाबद्दल बहिष्काराची समाजाला फार गरज आहे.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 31 1903

The net revenue of the Excise department was, in 1902, Rs. 16,06,085. This shows an ample revenue. It is often interpretend to mean improvement in the general economic condition of the people. We grant it so far that the people are better off than in famine times. But we fail to see any further improvement in the people's condition. We are able to prove this fact if a proof be needed to effect a charge in the present Excise policy.

There is a dark side of the Excise policy of the Government. That policy amounts to a trade in which there are no risks of capital. It purports to find out a spring of income in the midst of the drinking vices of the people. In fact the Government invent a resourceful department to make money out of the drink and the smoke of the people. The vice of intoxication is as old as the mankind itself. The Government profess to control this vice, to bring it to lowest level and to make the mankind wiser, more sober and therefore more economical for all the benevolent acts of the Government. The duty of an astute moralist is before the Government. They introduce so many barriers in the ways of the people. They levy a duty on articles of intoxication. This Excise—tax makes the drink and the smoke as dear and costly as possible; and it is presumed as a matter of fact that the cost of an intoxicating drug or a narcotic article will deter men from giving a full scope to their vices. The dearer the article, the lesser will be the evil. This is in short the main ground of the Excise policy of the Government. The maximum of revenue with the minimum of the vice is therefore apivot upon which all Excise rules and regulations are framed. This maxim is pushed forward with the energies of a martyr. The Government take to themselves the credit of regulating the drinking vices of the people in the most civilized fashion. If the present system does achieve the golden results which the Government claim for themselves we shall have to say that there are no two sides to the picture of the Excise administration of the Government.

But we think that in the cause of redeeming the people from the paths of vice the Government have gone to rather worst extremes in so far as their policy brings misery, starvation and ruin to the numerous families that have to spend their hard-earned wages for the satisfaction of the vices. We think that a stage has come in the growth of the Excise policy whence it is necessary to retrace some steps backward in order to secure the happiness of the masses. We presume that a certain amount of vice will continue to exist in some form or another and it is useless to attempt to bring it under a further restraint. Human nature is prone in a certain measure to this vice; and we shall not do justice to it if we drive hard the Excise policy. To our plain mind, it seems necessary that the pressure of the Excise tax should be reduced to the minimum. There are at work several civilizing agents to bring people to the ways of virtue and soberness. The hard struggle for bread keeps men as much virtuous and free from vice as possible. There is again the spread of education. It is sure to make its mark in the morals of the people and to induce them to abstain from taking to intoxicating drugs. We hope that our remarks will have some weight with the Government.

## वऱ्हाडवृत्त

बदल्या—तहशीलदार मंडळींत खालील प्रमाणें बदल्या होत आहेतः—

| रा० रा० | बदलीची तहशील. |
|---|---|
| कृष्णाजी अनंत. | मोर्शी. |
| लक्ष्मण गोपाळ देशपांडे | चांदूर. |
| सोराबजी शापूरजी | उमरावती. |

रावबहादूर बंधुजी जनार्दन चौबळ एक्स्ट्रा असि० कमिशनर यांस ७ जुलै पासून पेन्शन देण्यांत आल्यामुळें खालील प्रमाणें बदल्या देण्यांत आल्याः—

| रा० रा० | एक्स्ट्रा असि० कमि. वर्ग. |
|---|---|
| मि० सी. एच. प्राइस | १ ला. |
| आरदेसर दिनसाजी चिनाय | २ रा. |
| हैदरअल्ली | ३ रा. |
| सी. शामराव, अव्याची | ४ था. |

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००८= |
| सोनें २४॥ | | चांदी ७३ |
| जवारी | ३०।३५।४० | जवस ९० |
| गहू | | ८५ ते १०० |
| बाजरी | | ५०।५२॥ |
| मीठ | ४।= | रु. मण |
| चणे | ३८– | रु. मण |
| तूप | ८ | रु. मण |
| तेल | ५८= | रु. मण |
| रुई | | ५० |

## चातुर्मासा करितां

खालीं दर्शविल्या प्रमाणें पुस्तकांचे ६ गट केले आहेत. या गटांत प्राकृतग्रंथ पोथ्या, पुराणयुक्त, गोष्टी, कादंबऱ्या, संगित व साधीं नाटकें, फार्स, प्रहसनें, शिवाय हरएक तऱ्हेची पुस्तकें आहेत. करितां त्वरा करा संधी व्यर्थ दवडूं नका.

| गट नं० | पुस्तकें | मूळ.किं.रु. | मिळणा.किं. |
|---|---|---|---|
| १ | १० | ८ | २ |
| २ | २० | १५ | ४ |
| ३ | ३५ | २० | ६ |
| ४ | ४० | ३१ | ८ |
| ५ | ५० | ३० | १० |
| ६ | १०० | ५० | १५ |

किंमती शिवाय पोस्टेज खर्च निराळा पडेल. गट मागविणारांनीं संपूर्ण पत्ता बाळबोध अक्षरांनीं कळवावा.

पत्ताः— सन्मार्ग बोधक मंडळी
कसबा पेठ पुणें–सिटी.

## नोटीस

रा. आंबादास जयराम कासार यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आश्वीन वद्य १० संवत १९५८ रोजीं तुह्मी आह्मा पासून आकोलें येथें शहरांतील यादोराव कोरडे यांचे दुकाना समोरील आमचे मालकीचें दुकान दरमहा रुपये ५ प्रमाणें १२ महिन्या करितां घेतलें सदर्हू मुदत संपताच सदर्हू दुकानचें भाडें दरमहा रुपये १६ प्रमाणें १२ महिन्याचे रुपये १९२ आगाऊ देऊन लेखी भाडेचिठ्ठी करून देण्यास तयार असल्यास तुह्मांस पुढें दुकान दिलें जाईल, नाहीं तर दिलें जाणार नाहीं. तुमची मुदत संपतांच वर लिहिल्या प्रमाणें अगाऊ भाडें १९२ रुपये व लेखी भाडे चिठ्ठी करून देण्यास तुह्मी तयार नसल्यास दुकान खालीं करून द्यावें. तुमचें व आमचें कोणतेही प्रकारें नुकसान होऊं नये ह्मणून तुह्मास अगाऊ नोटीशीनें कळविलें आहे. सदर्हू नोटीस पावले दिवसा पासून आठ दिवसांचे आंत जबाब द्यावा पुढें दुकान दुसऱ्यास भाड्यानें दिलें जाईल. कळावें. तारीख २९ माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

सही
मुकुंदलाल ननामल या दुकानची
मालकीण चुन्नाबाई जवेज
मुकुंदलाल. मुखत्यार
रामकृष्ण नारायण
आकोले द० खु०

## नोटीस

रा. रा. बाळकृष्णसा नारायणसा, सितारामसा गोविंदसा व रामासा चिमणसा जात लाड राहणार मेहेकर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व आह्मी चुलत भाऊ असून आजपर्यंत एकत्र आहोत. व सर्व स्थावर जंगम जिनगीही एकत्रच आहे परंतु तीर्थ स्वरूप नारायणसावजी हे वारल्या पासून आमचे व तुमचे व्यवहारा संबंधानें बनत नाहीं. ह्मणून आपल्या सर्व स्थावर जंगम जिनगीची वाटणी करावी असा आमचा विचार आहे तुह्मी त्रिवर्ग एकत्र राहत असल्यास आमचे कडून कांहीं हरकत नाहीं परंतु आह्मांस या उपर एकत्र राहावयाचे नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसांचे आंत सर्व जिनगीची ह्मणजे स्थावर व जंगम, रोकड, डागडागीनें आसऱ्या वगैरेची वांटणी करून आमच्या हिस्यास येणारी जिनगी आमचे ताब्यांत द्यावी व आमची नोंदलेली पावती घ्यावी. तसें न केल्यास रीतिप्रमाणें तजवीज केली जाईल व खर्च तुह्मास जातीनें द्यावा लागेल. कळावें, तारीख ३० माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

सही
गणपतसा बामनसा तर्फे वकील
V. K. Garde
T. M. Kshirsagar

## वर्तमानसार

दुर्दैवी ह्माळसाबाई मृत झाल्या आणि त्यांच्या बरोबर कै० मल्हारराव गायकवाड यांच्या दुःखद नाटकाची समाप्ती झाली. श्रीमंत मल्हारराव यांस बडोद्याहून मद्रासेस नेलें तेव्हां यांच्या बरोबरच या तेथें गेल्या होत्या या मोठ्या करारी बाणेदार सत्वस्थ व दानशूर होत्या त्यांनी बडोदें त्या एका घोर रात्रीं सोडलें पण पुनःमा बडे द्याला आल्या नाहींत बडोद्याच्या स्टेशना वरून जाण्याचा प्रसंग आला तर त्या आपल्या गाडीच्या खिडक्या बंद करीत! यांनीं आपला उत्तरकाल तीर्थ यात्रा दानधर्म व पुण्याचरण यांत घालविला या नेहमी नवसरीला रहात असत यांच्या चरित्रा बरोबर मल्हाररावांचा अवशिष्ट ग्रंथ आटोपला त्यांच्या वेळीं जो एक मेघ कोसळला त्याच्या खालीं चिरडलेली ही अभागी राजपत्नी मरण पावली खरी पण तिनें आपल्या आयुष्यांत जो विलक्षण करारी स्वभाव दाखविला तो पाहून कोणाचा जवि तळपळणार नाहीं आणि कोणगा घोर उदार आत्म्याला शांति मिळण्या बद्दल ईश्वराचा धावा करणार नाहीं.

प्रोफेसर श्रीधर गणेश जिन्सिवाले एम. ए. हे अर्धांग वायूच्या अपस्माराने मुंबई मुक्कामीं गेल्या १८ वे तारखेला मरण पावले. मरण समयीं यांचे वय ६२ वर्षांचें होतें. यांची पत्नी व एकुलता एक मुलगा हीं दोन वर्षांपूर्वीच प्लेगानें निवर्तलीं होती.

प्रोफेसर जिन्सिवाले हे मोठे वक्ते असत. त्यांस संस्कृत, शास्त्रे, इतिहास इत्यादि विषयांचा नाद मोठा होता. हे आपल्या विद्वत्तेनें लोकमान्य होते. यांचें घराणें जुनाट आहे यांच्याकडे शिंदे सरकाराचा तोफखाना असे. परंतु १८५७ च्या बंडा नंतर ग्वाल्हेरी सुटली. नगरास जिनसीवाल्यांचें हुंडीचे दुकान होतें परंतु यांच्या भाऊबंदांनीं त्यांच्या वृद्ध व अंध पित्यास एका वस्त्रानिशी काढलें. राजश्री श्रीधरपंत उर्फ भय्यासाहेब हे मोठे अभिमानी असत. त्यांनीं ‘ भवती भिक्षां देहि ’ करून विद्याभ्यास केला व मुंबई इलाख्यांत विद्वानामध्यें श्रेष्टतेला पोचले. कांहीं वर्षें हे मुंबईच्या वुइलसन कालेजांत संस्कृताचे अध्यापक होते. अलिकडे १०।१२ वर्षें ते रिकामेच होते.

यांची वाणी फार मोहक असे. ते आपल्या वक्तृत्वानें श्रोतृजन तल्लीन करून सोडीत. यांच्या व्याख्यानांत त्यांच्या मनाचें चित्र वारंवार उमटत असे. वेद पौनिषद आहे हा त्यांचा आवडता विषय होता. ते मोठे धर्माभिमानी होते. यांस देशाभिमान मोठा असे ते स्वभावानें प्रेमळ व शांत असत. ते सत्यवक्ते व स्पष्टवक्ते होते. त्यांच्या स्वभावांत विलक्षण कळकळ असे. यांच्या सारखे गृहस्थ मरणें ह्मणजे देशांचें मोठें नुकसान होय. यांचे विचार परिपक्वतेला पोंचून त्यांचा लाभ देशाला होण्याचा काल जवळ जवळ येतो इतक्यांत असे धपभिरू, करारी, विद्वान, व वक्ते मृत्युमुखीं पडले ही मोठीच हानि होय. हे सामाजिक बाबदींत फार पुढें नसत. सुधारकांच्या अद्वतद्वा वर्तनावर यांची टीका फार कडक असे. ईश्वर यांच्या आत्म्याला उत्तम शांति देवो !

श्री बाबा महाराज यांच्या घराण्यांतील दत्तक प्रकरणा संबंधानें रा. टिळक यांजवरील खटल्याचा निकाल मि० क्लेमेंटस यांनीं आज दोन प्रहरीं सांगितला. रा. बळवंतरावजी टिळक यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली व एक हजार रुपये दंड झाला. जामिना बद्दल मि० न्यूकस यांजकडे अर्ज केला व यांनीं रा. टिळक यांनां जामिनावर खुलें केलें आहे. अपील लवकरच सादर करण्यांत येणार आहे.

वेळ ५–३०. ता. २४ आगष्ट

एक हजार रुपये दंड न दिल्यास आणखी दोन महिने सक्तमजूरीची कैद माजि. स्ट्रेटच्या ठरावांत आहे.

माजि० कोर्टांत लोकांची अतिशय गर्दी झाली होती. कोर्टाच्या भोंवती स्वार व पोलिस शिपाई बंदोबस्ता करितां बरेच होते. माजि० नीं शिक्षा सांगितल्या नंतर रा. टिळक यांना जामिनावर खुलें करण्याचा अर्ज करण्या साठीं ना. मि० खरे डिस्ट्रिक्ट कोर्टांत गेले मि. खरे यांची तक्रार ऐकून घेतल्या नंतर रा. टिळक यांना सोडण्याचें डि० जज्य यानीं कबूल केलें. इकडे अपील अर्जाची सुनावणी चालली असतां रा. टिळक यांना गाडींत घालून पोलीसानें तुरुंगांत नेलें होतें. कोर्टानें आरोपीला आपल्यापुढें आणण्याविषयीं हुकूम केला व जात मुचलका रुपये दहा हजारांचा लिहून घेऊन रा. टिळक यांना जामिनावर खुले केलें. मि० खरे हे डि० जज्यापुढें अपील अर्जाची सुनावणी करीत होते तेव्हां डि० कोर्टांत व सभोंवती इतकी गर्दी झाली होती कीं पोलिसला वरचेवर गर्दी मोडावी लागली. लोकांमध्यें अतिशय चळवळ उडून गेली होती. रा. टिळक यांना डि० कोर्टांत जेलर व नेटिव वार्डर घेऊन आले व यांच्या जातमुचलक्यावर व बॉंडवर सही करण्याला पुष्कळ लोक तयार होते. इं. प्र.

कराची येथील एका एतद्देशीय लोहारानें उत्तम प्रकारची मोटर गाडी तयार केली आहे व त्याचा विचार अशा गाड्यांचा कारखाना काढण्याचा आहे.

नुकतीच एक जाहीर सभा श्रीदेवकीनंदनाचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं भरून संस्कृत शिक्षण देणारें एक कॉलेज मद्रासेस स्थापण्याचा ठराव झाला आणि मि० मुरलीधर यानीं सदर्हू कॉलेजाची इमारत आपल्या खर्चानें बांधून देण्याचें कबूल केलें असें कळतें.

तारेच्या योगानें बातम्या तावडतोब येतात परंतु आतां या बातम्या एका नव्या युक्तीनें कागदांच्या घड्यावर अक्षरानीं टिपल्या जातात, हींच अक्षरें जास्त खोल खोंचल्यासारखीं जातात व असे कागद छापखान्यांत जाण्याचा अवकाश, छापखान्यांत गेल्याबरोबर प्लेटी तयार होऊन एकदम छापण्यास सुरवात होते ज्या ज्या ठिकाणीं तार आफिसें आहेत त्या त्या ठिकाणीं अशी छापण्याचीं सोय असली ह्मणजे बातम्या प्रसिद्ध होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. या तत्वावर पारिसमध्ये नवीन यंत्र एम्. रोझार यानीं तयार केलें आहे.

श्री० छत्रपती महाराज यानीं रत्नागिरीच्या किल्ल्यांतील श्रीभवानीच्या देवालयाच्या जीर्णोद्धारार्थ ३०० रुपये दिले.

उत्तर धृवाकडील एका शोधकानें शेवाळा पासून कागद, काठ्या, सुरीच्या मुठी, तसे चिरीच्या चौकटी वगैरे तयार करण्याची युक्ती शोधून काढली आहे. त्याचप्रमाणें या शेवाळाच्या धुराचे दिवे लावतां येतात व त्या दिव्यांच्या काजळापासून बुटाचे पॉलिस तयार करितां येतें असें यांचें ह्मणणें आहे,

रक्तांत कांहीं विकार झाल्यामुळें एका मनुष्याच्या शरीरावर एकंदर २५ चौरस इंच चकदळें पडलीं. त्यावर बेडकाच्या कातड्यांचें मलम ९६ तासांत पक्कें होऊन चकदळें नाहींशीं झालीं असा प्रकार शिकागोच्या हास्पितळांत झाला.

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं माझी स्वत नामे शाऊनई मर्द सिदाजी पाटील राहणार चोंडी तालुके बाळापूर ही दुसरे लोकाचे फंदांत पडून इस्टेटीची अफरातफर करूं पहात आहे. ही फक्त अन्नवस्त्राची मालकीन आहे करितां ती कोणापाशी आमची इस्टेट गहाण वगैरे लिहून दिल्यास ती कोणी लिहून घेऊं नये घेतल्या माझी इस्टेट जबाबदार न होतां ज्याचा तो जबाबदार होईल. कळावें, तारीख २८।८।०३ इ०

सही.

अमृता वल्लद सिदाजी पाटील
अ० पा० करणार आई
गवनाई मर्द सिदाजी पाटील राहणार चोंडी
तालुके बाळापूर निशानी खुद्द.

---

## नोटीस

बेशमी– शाऊनई मर्द सिदाजी पाटील राहणार चोंडी पोस्ट आलेगांव ता० बाळापूर ईसः–

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा व माझा नवरा सिदाजी पाटील हा मयत होऊन सुमारें दोन महिने झाले. आपला नवरा मेल्या नंतर आपल्या दोघीच्या मतानें आपला दीर रामजी याचा मुलगा अमृता हा दत्तक घेतला अलिकडे तूं वाईट लोकांचे नादीं लागून जीनगीची अफरातफर करण्याचा तुझा इरादा आहे आणि असें झालें ह्मणजे दुसरा गंधर्वाचा नवरा करून जाण्याचा तुझा हेतू आहे. पण असें करणें तुला योग्य नाहीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस जास्त मानगडींत पडूं नये. तूं उत्तम रीतीनें राहिल्यास जन्मभर अन्नवस्त्राची तुला कमती पडणार नाहीं. तुला दुसरा गंधर्वाचा नवरा करणें असल्यास तुझे अंगावर असलेले आमचे चांदीचे डागीने सुमारें ६५।६० तोळ्याचे हे ठेऊन देऊन खुशाल दुसरा घरठाव करावा. त्यास आमची मनाई नाहीं. आमची इस्टेट तूं कोणास गहाण अगर बक्षीस लिहून देऊं नये लिहून दिल्यास तूं व जो लिहून घेईल तो असे दोघेही जबाबदार धरले जाल. मी व माझी इस्टेट जबाबदार होणार नाहीं. कळावें. तारीख २८ माहे आगष्ट सन १९०३ इ०

सही

अमृता वल्लद सिदाजी पाटील अज्ञान
पालन करणार आई गवनाई
मर्द सिदाजी पाटील राहणार
चोंडी ता० बाळापूर
निशाणी खुद्द हातची
बांगडी.

---

## नोटीस

रा. रा. महादेव गंगाधर मराठे, वकील राहणार आकोला यांस:—

खाली सही करणार यांजकडून जाहिर नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आमचे नवे घरांत भाड्यानें राहता. हें घर आतां तुम्हाकडे ठेवण्याची माझी इच्छा नाहीं ह्मणून मी मागेंच तुम्हास घर खालीं करण्या संबंधानें दोन वेळ कळविलें होतें. तर तुम्ही मेहेरबानी करून तारीख १५ सप्तेंबरच्या आंत घर खालीं करावें. तसें करण्यास चुकाल तर कोर्टा मार्फत घर खालीं करून घेऊं. या नोटीशीचा खर्च व फिर्याद संबंधी इतर खर्च तुम्हावर पडून जितके दिवस तुम्ही आमच्या नोटिशीला न जुमानतां राहाल तितकें दिवसाबद्दल दररोज १ रुपया प्रमाणें भाडें वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख २४ माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

सही

व्यंकटेश कृष्ण मुनशी
पेष्ट इनस्पेक्टर आकोला.

---

## नोटीस

ग. रा. गोपाळ नारायण पंडित हेड कानस्टेबल पोलिस सुपरिंटेंडेंटचे आफिस राहणार आकोला यांसः—

खाली सही करणार यांजकडून जाहिर नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे नवे घरांत भाड्यानें राहतां. हें घर आतां तुह्मांकडे ठेवण्याची माझी इच्छा नाहीं, ह्मणून मी मागेंच तुह्मास घर खालीं करण्या संबंधानें दोन वेळा कळविलें होतें तर तुह्मी मेहेरबानी करून तारीख १५ सप्तेंबरच्या आंत घर खालीं करावें. तसें करण्यास चुकाल तर कोर्ट मार्फत घर खालीं करून घेऊं. या नोटीशीचा खर्च व फिर्याद संबंधी इतर खर्च तुह्मावर पडून जितके दिवस तुह्मी आमच्या नोटिशीला न जुमानता राहाल तितके दिवसाबद्दल दररोज ८ आणे प्रमाणें भाडें वसूल करण्यांत येईल कळावें. तारीख २४ माहे आगष्ट सन १९०३ इसवी.

सही

व्यंकटेश कृष्ण मुनशी
पोष्ट इनस्पेक्टर आकोला